शिक्षण महर्षी

# विश्वनाथ तुकाराम पाटील



# शिक्षण महर्षी

## विश्वनाथ तुकाराम पाटील

लेखक : दिनकर द. पाटील

लेखन काल :
गणेश चतुर्थी
२२ ऑगस्ट ते
१२ ऑक्टोबर २००१

# ताराराणी विद्यापीठ प्रकाशन

● प्रकाशक :

ताराराणी विद्यापीठ

राजारामपूरी, कोल्हापूर

● मुद्रक :

श्री. जयसिंगराव पोवार

श्री मुद्रणालय

११६ 'ए' वॉर्ड, शिवाजी पेठ,

कोल्हापूर-४१६०१२


फोन : ६२०६९६, ६२३४५६




कै. डॉ. व्ही. टी. पाटील



कै. सौ. सरोजिनीदेवी विश्वनाथ पाटील



पूज्य काकाजी यांचे शिगांव येथील घर



पूज्य काकीजी यांचे बेनाडी येथील घर

# ''शिक्षण महर्षी : विश्वनाथ तुकाराम पाटील''

**प्रास्ताविक :**

ख्यातनाम सिने दिग्दर्शक, ग्रामीण कथाकार व चित्रपट निर्मति, पट्टीचे संवाद लेखक, दिनकर द. पाटील यांचे ''शिक्षण महर्षी-विश्वनाथ तुकाराम पाटील'' हे कदाचित शेवटचे लिखाण. वयोपरत्वे दिनकरराव आज विकलांग आहेत. केवळ गुरुदक्षिणा म्हणून ज्यांनी दिनकररावांना ऐनउमेदीत घडविले, पालन पोषण केले, मार्गदर्शन केले त्या त्यांच्या ''मामांचे'' हे चित्र, त्यांनी आठवणींच्या स्वरुपात रेखाटले आहे. हे चरित्र नसून ''चित्र'' आहे असा उल्लेख मुखपृष्ठावर केलेला आहे. या आठवणी लिहिताना दिनकररावांची स्मृती बऱ्यापैकी शाबूत दिसते. आठवणी लिहितांना स्मृती दगा देण्याची शक्यता अधिक. दिनकररावांच्या बाबतीत हा प्रकार विशेष घडला नाही. सुरुवातीलाच इसापनीतीतल्या ''चार आंधळे व एक हत्ती''(दिनकरराव तीनच आंधळ्यांचा उल्लेख करतात) या कथेचा उल्लेख करुन दिनकररावांनी त्यांचे मामा त्यांना कसे दिसले याचे एका मर्यादित चौकटीत चित्र रेखाटले आहे. हे सम्यकदर्शन नसेल पण स्पष्ट प्रांजल आहे. काही कटु पण सत्य घटनांचा उल्लेख आहे. करवीर नगरीतील रणरागिणी ताराराणीचे स्मारक म्हणून केवळ स्त्री शिक्षणासाठी बालवाडी पासून पीएच.डी. पर्यंतची सोय असलेले ताराराणी विद्यापीठ व भुदरगडसारख्या डोंगराळ भागात खेडोपाडी पसरलेल्या ग्रामीण भागातील बहुजन समाजाचा कायापालट घडवून आणणारे गारगोटीचे ''मौनी विद्यापीठ'' ही काकांच्या शैक्षणिक कर्तृत्वाची दोन उत्तुंग शिखरे, जणू कांचनगंगा व गौरीशंकर. पण जेंव्हा काकांना गारगोटीतून हुसकावून लावण्याचा पध्दतशीर पुणेरी कट शिजला व तडीस नेला तेव्हां दिनकररावांचा संताप उफाळून येणे साहजिकच आहे. सत्य लोकांना कळले पाहिजे, म्हणून हे कटु कर्तव्य दिनकरराव करतात. असो. या आठवणी, कांही या घटनेसाठी लिहिलेल्या नाहीत. या आठवणीतून व्ही. टी. काका बालपणी शिगांव, बेनाडी या खेड्यात घडले कसे याचे दिनकररावांच्या वैशिष्ट्यपूर्ण वाचनीय शैलीत येथे चित्रण आहे. खरे म्हणजे व्ही. टी. काकांचे या दोन खेड्यात घालवलेले जीवन ''पाटलाच्या पोराला''

शोभण्यासारखे आहे. हा ''पाटलाचा पोर'' खेडं सोडून शिक्षणासाठी कोल्हापूर, पुण्याला आला, वकील झाला, सार्वजनिक जीवनात, निवडणुकांत, राजकारणात यशस्वी झाला, राजदरबारी प्रतिष्ठा वाढली. पण या सुखासीन जीवनाचा, मतलबी राजकारणाची, व्ही. टी. ना त्यांच्या सोज्वळ, श्रध्दाळू, निरागस स्वभावामुळे उबग आली आणि व्ही. टीं. च्या आयुष्यातील मन्वंतराला सुरुवात झाली. ''पाटलाच्या पोराला'' एक वेगळी वाट सापडली. ''पाटलाच्या पोराचं'' रुपांतर (मेट मार्फसिस) शिक्षण महर्षीत कसे झाले, याची कथा या आठवणींत वाचायला मिळते.ही वाट स्वेच्छेने स्वीकारलेली. कदाचित राजाराम महाराजांचे ते उपेक्षित ताराराणीच्या स्मारकासंबंधीचे प्रसिध्द उद्‌गार कारणीभूत झाले असतील. काकांना त्यांच्या आयुष्याचे मिशन सापडले, पण ही वाट वेगळी होती. ही वाट काटेरी होती, वेदना देणारीही होती, पण काकांची नजर आपल्या मिशन पासून विचलीत झाली नाही.

व्ही. टी. काकांनी आपल्या आयुष्यात अनेक संस्था उभ्या केल्या, विविध क्षेत्रात उभ्या केल्या, पण त्या संस्थांकडे कधी आसक्तीच्या नजरेने, मालकी हक्काच्या मनोवृत्तीने पाहिले नाही. या संस्था काकांची सत्तास्थाने अगर लाभस्थाने नव्हती. ती सेवास्थाने होती, ती पूजास्थाने होती, जनता जर्नादनाची पूजा होती. एका ठिकाणची पूजा संपली तर दुसरीकडे पूजा मांडता येते. व्ही. टी. काकानी शिक्षण संस्था काढल्या, बंद केल्या. दुसऱ्यांना दिल्या, द्याव्या लागल्या आणि हे सर्व स्थितप्रज्ञासारखे काकांनी सहन केलं. याचं कारण त्यांना त्या संस्थावर मालकी नको होती. त्या संस्थांबद्दल काळजी जरुर होती, पण ती मालक म्हणून नव्हे तर जनक म्हणून. कुसुमाग्रजांची एक कविता ''अहि नकुल'' काकांचा दृष्टिकोन स्पष्ट करते. साप व मुंगूस यांच्या लढाईत जीवघेण्या संघर्षानंतर मुंगूस सापावर विजय मिळवते, पण तेथे क्षणभरही न थांबता नवीन विजयासाठी(नवीन ट्रॉफी मिळविण्यासाठी) दुसरीकडे जाते. त्याच्या पाठीमागे मात्र इतर कुत्री, मांजरे त्या ''ट्रॉफीचे'' लचके तोडण्यात, त्यावर स्वतःची मालकी सिध्द करण्याच्या खटाटोपात गुंतलेली असतात. आज सार्वजनिक क्षेत्रात, मग ते शिक्षण असो, सहकार असो, राजकारण असो, आपण निर्माण केलेल्या संस्था अगर दुसऱ्यांच्या बळकावून घेतलेल्या संस्था, आपल्या ताब्यात राहिल्या पाहिजेत यासाठीच कार्यकर्त्यांची सारी शक्ती खर्च होत असते. त्यांचे संस्थेच्या ध्येय धोरणांशी कांही देणेघेणे नसते. सार्वजनिक संस्था ही सेवा केंद्रे

असली पाहिजेत, प्रकाशाची बेटे असली पाहिजेत, समाजाच्या जीवनाला आवश्यक तो प्राणवायु पुरविणाऱ्या हिरवळी असल्या पाहिजेत, नवविचाराची, ध्येयवादाची प्रक्षेपण केंद्रे असली पाहिजेत. अशा संस्था खरंतर तेथे काम करणाऱ्या सेवकांना, शिक्षकांना आपल्या वाटल्या पाहिजेत, पण या सेवकांत, शिक्षकांत ही संस्था माझी आहे ही भावना (सेन्स ऑफ बिलांगिंग) निर्माणच होत नाही. शिक्षक, सेवक, वेतनोपजीवी बनतात व चालकात मालकी वृत्ती बळावते. मालक व सेवक असे व्दैत निर्माण होते. चालकात गटबाजी निर्माण होते. शिक्षण संस्थात अव्दैतांचे नाते निर्माण झाले पाहिजे, मालक-चाकराचे नव्हे. या दोन घटकातील सततच्या संघषपिक्षा सहकार्यच शिक्षणाला पोषक ठरणार आहे. संघर्षात शिक्षणाचा पहिला बळी पडत असतो. बहुतेक शिक्षण संस्थातील आजची परिस्थिती भारत-पाक सीमेवरील परिस्थितीची आठवण करुन देते. अशा संस्थात विद्यार्जन क्वचितच घडते.

या छोट्याशा चित्रातून ''शिक्षण महर्षी'' व्ही. टी. पाटील यांचे यथार्थ दर्शन घडविण्यात दिनाकर द. पाटील कमालीचे यशस्वी झाले आहेत. ताराराणी विद्यापीठाचा कार्यकारी अध्यक्ष या नात्याने आणि 'शिक्षण वाचले तरच समाज वाचेल' यावर नितांत विश्वास असलेला एक शिक्षक या नात्याने, मी दिनकररावाना शतश: धन्यवाद देतो.

**रा. कृ . कणबरकर,**

कार्यकारी अध्यक्ष, ताराराणी विद्यापीठ,

कोल्हापूर.

# शिक्षण महर्षी

**चौकट :**

शिक्षण महर्षी विश्वनाथ तुकाराम पाटील यांना मी माझ्या काकी भागीरथीबाई आत्माराम यांचे बंधू म्हणून मामा म्हणतो. मामांच्या अनेकविध कार्यावर आजवर वेळोवेळी लिहिलं आहे. 'हा गंध चंदनाचा' या नावाचा एक गौरव ग्रंथही प्रसिद्ध झाला आहे. तद्वत, त्यांच्या जीवनसाथी कमला तथा सरोज यांच्या जीवनावरही 'भावसुगंध' नावाची पुस्तिकाही प्रसिद्ध झाली आहे. असं असताना मामांच्या जीवनावर चरित्रात्मक नवे पुस्तक लिहिण्याचं प्रयोजन काय?

सांगतो, मामांच्या जीवनावरला गौरव ग्रंथ वाचून मला तीन आंधळे आणि एक हत्ती या इसापकथेची आठवण झाली. एक आंधळा , ज्याच्या हाताला शेपूट लागली, म्हणतो 'हत्ती दोरीसारखा आहे', तर दुसरा आधंळा हत्तीचे कान चाचपून म्हणतो, 'हत्ती सुपासारखा आहे', तिसरा हत्तीचे पाय कवटाळून म्हणतो, 'हत्ती खांबासारखा आहे'. तिघांचा तर्क खोटा नाही तरी ते ऐकून हत्तीचं सम्यक दर्शन होत नाही.

ते घडणं मामांच्या बाबतीत जरा कठीणच आहे. तरी मी त्यांच्या सहवासात बालपणापासून असल्याने मामांच्या शिक्षणाची प्रगती, त्यांचा वकिलीचा व्यवसाय, कोल्हापूर नगरपालिका व इलाखा पंचायतीची त्यांनी भूषवलेली अध्यक्षपदे मी घडताना पाहिली आहेत. काही गोष्टी मला अज्ञात आहेत. त्यावर मी कसलंही भाष्य केलेलं नाही. तरी मला जे त्यांचं दर्शन घडलं, ते प्रांजळपणे वाचकांसमोर ठेवण्याचा हा माझा प्रयत्न आहे.

पुस्तकाला नाव मी दिलं आहे, 'शिक्षण महर्षी विश्वनाथ तुकाराम पाटील'. त्याखाली खुलासाही केला आहे, 'हे चित्र आहे-चरित्र नव्हे'. या खुलाशाचं प्रयोजन एकंच-चित्रकार काय किंवा फोटोग्राफर काय, जेव्हा समोरच्या माणसाचं चित्र रेखाटतो, तेव्हा त्यानं ते एकाच बाजूनं पाहिलेलं असतं. मग ते प्रोफाईल असो, फ्रंट असो वा बॅक असो. ते चित्र पाहून आपण म्हणतो, 'वा, काय सुरेख चित्र आहे'. कारण एका बाजूनं दिसलं तरी ते चित्र त्या व्यक्तीचं सम्यक दर्शन घडवीत असतं. दुसरी बाजू न पाहताही आपण समजू शकतो. मामा मला जसे दिसले, जसे भावले, त्याप्रमाणे मी हे त्यांचं चरित्र लिहिलं आहे. मला आशा आहे, माझं हे शब्दचित्र मामांचं यथार्थ दर्शन घडल्याचा प्रत्यय

वाचकांना येईल. हे रेखाटण्याचाही हेतू एकच - मामांनी मला घडवलं आहे. कवी कालिदासानं दिलीप राजाचं वर्णन केलं आहे, 'स पिता पिरस्तासायां केवलं जन्म हेतवः ॥

याप्रमाणे माझ्या वडिलांनी मला केवळ जन्म दिला. याचं कारण, त्यांचं अर्ध आयुष्य घरच्या एका खटल्यासाठी कोर्टकचेऱ्या यातच गेले. काळ्या मातीवर त्यांचं एवढं प्रेम की, त्यासाठी त्यांनी पाण्यासारखा पैसा खर्च केला. योगायोगानं त्याच सुमाराला 'कसेल त्याची जमीन' हा कुळकायदा आला. आता मुंबईत राहून आम्ही जमिनी कसणार कशा? परिणामी जमीन गेली, गाव गेलं. मी नावचाच पाटील झालो. अशावेळी मामांनीच माझं जीवन प्रवाही केलं. ते विशुद्ध राखलं. त्याचे अंशतः तरी ऋण व्यक्त करावे, म्हणून मी हे चरित्र लिहिलं आहे. नशिबानं अशी काही थोर माणसं मला भेटली, त्यांच्या ऋणांत राहण्यातच मला धन्यता वाटते.

हे चित्र पाहताना एखाद्याला वाटेल, मामांचा जीवनप्रवास हिरवळीवरून झाला, पण हिरवळीतच विषारी साप पडलेले असतात. त्यांचा दंशही मामांनी पचवला. मौनी महाराजांच्या समाधीचा प्रसाद घेऊन मौनी विद्यापीठच बळकावू पाहणारे नराधमही मामांना भेटले. पण मौनी महाराजांचा प्रसाद कृतघ्न माणसांना पावत नाही, याचा प्रत्ययही त्यांना आला. देव तारी त्याला कोण मारी? म्हणतात ते खोटं नाही. असो.

हे चरित्र लिहीत असताना मला वेळोवेळी जरूर ते संदर्भ आणि तपशील पुरवल्याबद्दल माझे विधीबंधू आप्पासाहेब भा. जाधव आणि ताराराणी विद्यापीठाचे प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार र. पाटील यांचाही मी आभारी आहे. वयपरत्वे आताशा माझी स्मृती माझ्याशी लपंडाव खेळते आहे. माझे हे अखेरचं लेखन! डॉ. क्रांतिकुमार यांच्या हार्दिक मदतीमुळेच पूर्ण करू शकलो, ही परमेश्वरी कृपा किंवा त्याचीच ही प्रेरणा म्हणा. ती शब्दबद्ध करून या चरित्राची प्रेस कॉपी तयार करून देणारे माझे मुंबईचे मित्र मॅजेस्टिक टाईपरायटर्सचे मालक श्री. वसंतराव बर्वे यांचेही मी आभार मानतो.

**दिनकर द. पाटील**
शंकर शेट भुवन,
२९६ जावजी दादाजी मार्ग,
मुंबई-४०० ००७

# शिक्षण महर्षी

## १. रम्य ते बालपण!

कोणा एका चरित्रकारानं म्हटलंय, 'बालपणी वयाच्या आठ-दहा वर्षांपर्यंत जे संस्कार बालमनावर घडतात, तेच त्याच्या आयुष्याला आकार देतात'.

या दृष्टीनं प्रस्तुत चरित्रनायकाचा विचार करताना आपणांस विसाव्या शतकाच्या सुरुवातीचा वेध घ्यावा लागेल, नि तोही एका खेड्यात जाऊन! विश्वनाथ तुकाराम पाटील यांचा जन्म नागपंचमीचा-दिनांक तीस माहे सात एकोणिसशे सालचा. जन्मगाव शिगांव, ता. वाळवा, जि. सांगली. नागपंचमीवरून आठवण झाली. नागाबद्दल बऱ्याच आख्यायिका प्रसिद्ध आहेत.

एक म्हणजे नाग विषारी असला, तरी त्याच्या शेपटीवर पाय पडल्याशिवाय तो चावत नाही. आत्मरक्षणाचा त्याचा तो पवित्रा असतो. यासाठीच तो माणसांपासून शक्य तो दूर असतो. रानात तो आपली वारूळं बांधून राहतो, पिकांना उपद्रव करणारे उंदीर मारून तो आपली गुजराण करतो. साहजिकच, शेतकऱ्यांना तो आपला मित्र वाटतो. आपला अन्नदाता म्हणून तो नागाची पूजा करतो. त्यासाठी तर श्रावणात नागपंचमीचा सण साजरा केला जातो. इतर आख्यायिकाही बोलक्या आहेत. असं सांगतात की, इंदूरचे पहिले राजे यशवंतराव होळकर हे पहिले धनगर! रानात बकरी चरायला सोडून एका झाडाखाली ते झोपले असताना एका नागाने त्यांच्या मस्तकावर आपल्या फणेचं छत्र धरलं आणि होळकर सामान्य धनगराचे एक राज्यकर्ते झाले.

राजर्षी शाहू छत्रपती महाराज यांच्याबद्दलही अशीच एक आख्यायिका सांगतात. बालपणी बावड्याच्या बंगल्यावर ते झोपले असताना एका नागाने आपल्या फणेचं छत्र त्यांच्या मस्तकी धरले आणि ते पुढे जागिरदाराचे छत्रपती झाले.

विश्वनाथच्या डोक्यावर नागाने आपली फणा धरली नाही, तरी जन्म नागपंचमीचा म्हणून राज्यपद नाही, तरी राजवैभव त्याच्या वाट्याला येणार नाही कशावरून? अर्थात या अज्ञाताच्या गोष्टी. उद्या काय होणार, हे आज कळलं तर माणसाचं जीवन नीरस होईल

म्हणून माणसाचं अदृष्ट परमेश्वरानं त्याला न दिसणाऱ्या कपाळपट्टीवर लिहून ठेवलं आहे, असं राम गणेश गडकरी म्हणतात. आपली कपाळपट्टी विश्वनाथला दिसली नाही, तरी इतरानाही ती कधी वाचता आली नाही. म्हणून तो जन्मगावी एक पाटलाचा पोर म्हणून लहानाचा मोठा होत होता.

त्यावेळी आपला देश ब्रिटिश अंमलाखाली होता, तरी खेडेगावी तो अंमल पाटील-तलाठीच गाजवित होते. शिगावही याला अपवाद नव्हतं. वारणा नदीच्या काठी वसलेलं ते एक खेडेगावच होतं. आता खेडेगाव म्हटल्यावर ग्रामदेवतेचं मंदिर, चावडी, शाळा ही आलीच. पाटलांचा वाडाही तोलामोलाचा होता. प्रथमदर्शनी भव्य प्रवेशद्वार, आत प्रवेश करताच ऐसपैस चौक आणि त्यासमोरच साधीसुधी तीन घरं-एकाच जाप्त्यात दाटीनं उभी ! डाव्या बाजूला ज्ञानोजी पाटील-हेच गावकामगार होते. मधोमध तुकाराम पाटील आणि उजव्या बाजूला रघुनाथ पाटील-नांगरे पाटील म्हणून ओळखले जात होते.

विश्वनाथच्या वडिलांचं पूर्ण नाव तुकाराम बळवंत पाटील, आईचं नाव भागीरथीबाई. तिला चंद्राबाई, रामराव, विठ्ठलराव, राधाबाई, कृष्णाबाई, काशीबाई, विश्वनाथ आणि गोदुबाई अशी आठ मुलं! तीन भाऊ आणि पाच बहिणी. 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' हा लग्नात दिलेला आशीर्वाद फळाला आल्याचं दाखवीत होते. पैकी कृष्णाबाई या बेनाडी गावचे वतनदार पाटील आत्माराम यांना दिल्यावर भागीरथी आत्माराम झाल्या. सारं घर असं गजबजलेलं असतानाही दुर्दैवानं विश्वनाथची आई त्याच्या वयाच्या चौथ्या वर्षी आणि वडील आठव्या वर्षी गेल्याने, विश्वनाथ पोरवयातच पोरका झाले. तरी म्हणतात ना, 'माय मरो, पण मावशी न मरो' या न्यायानं विश्वनाथच्या आत्या गोजराबाई खोचीला दिल्या होत्या, त्या अकाली विधवा झाल्या तेव्हा माहेरी येऊन भावंडांच्या आई बनल्या. त्या वारकरी पंथाच्या होत्या. इतक्या निष्ठावंत, की शिगांव ते पंढरपूरची त्यांची दर एकादशीची वारी कधी चुकली नाही.

आत्याच्या या सेवाव्रतानं घराला एक शिस्त लागली. वडील बंधू विठ्ठलराव यांना वडील अचानक गेल्याने घराकडे लक्ष द्यावं लागलं आणि घर म्हटल्यावर एक का काम असतं? घरात पाणी आणण्यापासून, शेताकडे जाणे, मशागत करणे, धान्याच्या कणग्या भरणे, शहरात बाजारात जाऊन जरूरीपुरते खरेदी करता येते-पण खेड्यात वर्षभराची बेगमी करावी लागते. या उसाभरीत विठ्ठलरावांची शाळा झाली झाली, नाही नाही अशातलीच गत झाली.

साहजिकच, विश्वनाथनं तरी शाळा शिकावी म्हणून त्याचं नाव गावच्या शाळेत

घालण्यात आलं. शाळा कसली? गावातल्या पडक्या देवळात भरणारी-तीही चौथीपर्यंत! तरी शाळेत जायचं कुणी? 'लिवणं, पुसणं ही बामनांची कामं, असतात हुशार- होतात पास. आपल्याला पास होऊन कुठं कारकुनी करायची आहे?' ही वृत्ती. त्यामुळे विश्वनाथ शाळेच्या वाटेला कधी गेलाच नाही. तरी शाळेचे मास्तर एकदम कडक होते. ते गैरहजर मुलांची चौकशी करीत, प्रसंगी चार मुलं पाठवून त्याला उचलून शाळेत आणीत व आणल्यावरही तोंड वाकडं दिसलं तर थोबाडीत मारून ते सरळ करीत. नाईलाजानं विश्वनाथ शाळेत जाऊ लागला. त्याला वाटलं, बोलून चालून चौथीपर्यंतची शाळा. तीन-चार वर्षे काय बघता बघता जातील.

आणि तसंच झालं. विश्वनाथ दरवर्षी परीक्षेत पास होत गेला. कधी नंबराने पास झाला नाही, तरी पाटलाची पोरं नापासही होत नाहीत. परीक्षा संपताच त्याला हायसं वाटलं-आता मास्तर तरी काय करणार? पूर्वी तीन तास तरी शाळा होती, आता बारा तास उनाडकीला मोकळे! उनाडकी तरी कशी म्हणायची म्हणा, आपण नेहमी पाहतो, रानात कुणाचं गुऱ्हाळ सुरू झालं की मळेकरी आपणास गुऱ्हाळाला बोलावतो. खास उभारलेल्या मांडवात घोंगडं अंथरूण बसायला सांगतो. समोर चरकात रस गाळला जात असतो. त्यातला ताजा रस आलं-लिंबू पिळून प्यायला देतो. एवढंच नव्हे, तर घरी जाताना उसाची मोळी डोकीवर ठेवतो. पुण्या-मुंबईला याची कोण किंमत! पण म्हणतात ना, पिकतं तिथं विकत नाही.

याच न्यायानं एखाद्या बांधावरल्या आंब्याच्या झाडाच्या चार कैऱ्या पाडल्यावर काय बिघडलं? पण नाही-नेमका त्याचवेळी शेताचा मालक यायचा आणि विश्वनाथचा कान धरून घरी कागाळी करायचा, 'आवरा तुमच्या पोराला'.

विश्वनाथला कळायचं नाही, उघड्या रानातल्या आंब्याचे चार आंबे तोडले, तर ती चोरी कशी? तरी कोणाची तक्रार नको म्हणून त्यानं आपला मोर्चा चिंचेच्या झाडाकडे वळवला. गाभुळलेल्या चिंचा कोणाच्या तोंडाला पाणी आणत नाहीत? म्हणतात ना, कोल्ह्याला द्राक्षे आबंट! कारण त्याची उडी मांडवावरल्या द्राक्षांपर्यंत पोचायची नाही. चार पाय असले तरी कोल्ह्याला हात कुठं असतात? देवानं विश्वनाथला चांगले दोन हात दिले होते. दोन पायही होतेच. चिंचेच्या झाडावर तो तरातरा चढायचा आणि माणूस हा माकडाचा वंशज आहे हे सिद्ध करायचा. झाडावर बसून चिंचा खाणे हा त्याला छंदच लागला. या छंदापायी एकदा तो झाडावरून पडला, तरी आयुष्यातला पहिला धडा शिकला, पडेल तोच चढेल! अपयश ही यशाची पहिली पायरी आहे.

तिसरा छंद म्हणजे गावाला नदी असल्याने पाणवठ्याला बायका यायच्या आणि घागरी भरून घरी न्यायच्या. नऊवारी लुगड्यात त्यांच्या अंगावरले सारे गोलघुमट उठून दिसायचे. विश्वनाथला वाटायचं, बाई पाहवी तर एकाच पोझमधील, 'घट डोकीवर, घट कमेरवर'. कमरेवरल्या घागरीमुळे ती एका बाजूला झुकायची, ती पोझ त्याला आवडायची. घागरीतलं पाणी उचंबळून तिचा नितंब ओलाचिंब व्हायचा. त्यातून दिसणारा तिच्या नितंबाचा रंग विश्वनाथला तिच्या तोंडाच्या रंगाइतकाच गोरापान वाटायचा. तो पाहून त्याला काव्यही सुचायचं-'भिजलं लुगडं चिकाटलं'. खरंच, या शिमग्याच्या सणानं किती तरी कवींची स्फूर्ती जागी होत आली आहे नाही? पण तो बायकांना आंबटशौक वाटायचा आणि त्या घरी येऊन विश्वनाथविरुद्ध कागाळी करायच्या! रोजच्या या कागाळ्या ऐकून आत्या बिचारी हैराण व्हायची. या पोराला आवरायचं तरी कसं?

याच सुमाराला दुर्दैवानं एक दुर्घटना घडली. बेनाडीला दिलेल्या भागीरथी बाईंचे पती आत्माराम पाटील अकाली वारले. त्यातच पाठोपाठ गावात प्लेगची साथही सुरू झाली. त्याला भिऊन भागीरथीबाईंनी गणपतीला घेऊन रयताच्या गाडीनं शिगांव गाठलं. झालं-भागीरथीबाईंचं पांढरं कपाळ बघून घरात रडारड सुरू झाली. तरी विश्वनाथला एक नवं खेळणं सापडलं. त्याचा स्वभाव कितीही खोडसाळ असला तरी लाघवी होता. लहान मुलं त्याला फार आवडायची. गणपतीलाही मामाचा एकदम लळा लागला. विश्वनाथ धाकट्या भाच्याला हाताला धरून गरागरा फिरवायचा, गणपतीला ते एकदम आवडायचं, तर कधी खांद्यावर घेऊन नाचायचा. गणपती त्यावेळी म्हणे, 'बघा, मी किती मोठा झालो'.

त्याच्या बालमुखातून एक चिरंतन सत्य प्रकट व्हायचं. कुणीतरी खांद्यावर घेतल्याशिवाय माणूस मोठा होत नाही. जगातली सारी मोठी माणसं पाहा, समाजानं त्यांना खांद्यावर घेतले आहे म्हणून ते मोठे झाले नाहीत का? विश्वनाथ गणपतीला घेऊन गावभर हिंडायचा. वेळी-अवेळी घरी यायचा. त्याचा तो रोजचा नित्यक्रम झाला होता.

एक दिवस बातमी आली, बेनाडीचा प्लेग हटला. पण गणंपतीला लागलेला मामाचा लळा न हटला, एवढ्या वाढीला लागला की, बेनाडीला परत जायलाच तो तयार होईना. यावर शेवटी एकच तोडगा निघाला. विश्वनाथलाच बेनाडीला नेलं तर? विश्वनाथचं शिक्षण चौथीनंतर थांबलंच होतं. बेनाडीला सातवीपर्यंत शाळा आहे. तिथं विश्वनाथचं प्राथमिक शिक्षण तरी पूर्ण होईल.

हा निर्णय पक्का झाला. मात्र विठ्ठलरावांनी सवारी बांधून बैलगाडीची जोडणी केली आणि एक दिवस त्यात बसून भागीरथीबाई मुलासह बेनाडीच्या वाटेला लागल्या.

विश्वनाथ पायीच त्या गाडीपाठी वाट चालू लागला. भागीरथीबाई म्हणाल्या, 'गाडी हाय आयती, चालतोस कशाला?'

विश्वनाथ म्हणाला, 'या सकाळच्या वेळी? उन्हं तापल्यावर बघू'.

## २. प्राथमिक शिक्षण :

विश्वनाथ बहिणीसह बेनाडीला आला आणि त्याची जीवनाची दिशाच बदलली. शिगांवात तो पाटलांच्या वाड्यात रहायचा तेव्हा पाटीलकीच्या तोऱ्यात हिंडायचा. बेनाडीला त्यानं पाहिलं, एकापेक्षा एक आलिशान वाड्यांतून बेनाडीकर पाटील राहात होते.

गावात प्रवेश करताच डाव्या बाजूला तुकाराम पाटलांचा बैठा वाडा चांगला ऐसपैस होता, तर उजव्या बाजूला लक्ष्मण पाटलांचा वाडा भव्य कमानीच्या तटबंदीत एखाद्या बालेकिल्ल्याप्रमाणे बंदिस्त होता. त्याच्या समोरच नारायण पाटलांचा वाडा-साधाच पण एकमजली होता. त्याच्या समोर पाटलांचा मोठा वाडा होता. दगडी चिरेबंदी प्रवेशद्वार, आत मोठा चौक, चौकासमोरच आत्माराम पाटलांचा जाप्ता, ते गेल्यामुळे आल्या आल्या विश्वनाथचाच तिथं मुक्त वावर सुरू झाला. उजव्या बाजूला दाजी अर्जुन पाटील रहात होते, तर डाव्या बाजूला धोंडीदादा आणि हरिदादा हे दोन बंधू रहात होते. वाड्याच्या शेजारीच पूर्वेला आबा पाटलांचा नवा वाडा नुकताच बांधून पूर्ण झाला होता. तिथं त्यांचे एकुलते एक चिरंजीव श्रीपतराव रहात होते.

गावात बहुसंख्य लिंगायत लोक असले तरी पाटलांच्या वाड्याच्या दक्षिणेस ब्राह्मणांचेही वाडे ऐसपैस होते. गावात वाड्यांना तोटा नव्हता. लिंगायत पाटलांचा वाडा, बाळगोंड पाटलांचा वाडा, गुर्जरांचा वाडा-एवढंच नव्हे तर दक्षिणेला महारवाडाही होता. असं असलं तरी गावात एकोपा होता. एकमेकांत स्पर्धा असली, तरी वैर नव्हतं. शिक्षण प्रसार फारसा नव्हता. साहजिकच, गावात ब्राह्मणच काय ते थोडेफार सुशिक्षित होते. गावचं ग्रामदैवत चौंडेश्वरी गावच्या प्रवेशालाच होते, तरी प्रमुख मारुतीचं मंदिर, चावडी समोरच होतं. शिवाय लिंगायतांचं दैवत बसवेश्वराचं देऊळ गावाच्या मध्यभागी होतं. मारुतीच्या देवळामागे मोठं तळे होतं. पावसाळ्यात ते काठोकाठ भरायचं तेव्हा गावची स्नानं आणि धुणी तळ्याकाठीच व्हायची. समोरच सिद्धेश्वराचं देऊळ, समोर मोठा पिंपळ आणि मागे गावची मराठी शाळा. शाळा मराठी सातवीपर्यंत होती आणि तिचा लौकिकही चांगला होता. याला प्रमुख कारण म्हणजे, शाळेचे हेडमास्तर शंकरभाऊ कुलकर्णी ऊर्फ शंकर काका!

शंकरकाकांचं आमच्या घरी रोज येणं-जाणं होतं. त्याचप्रमाणे बाळाजीपंत कुलकर्णी रोज घरी येत. गावातील ब्राह्मण मराठे यात हार्दिक सहकार्य असायचं. अशाच एका बैठकीत शंकरकाकांच्या लक्षात आलं, नवीनच आलेला विश्वनाथ चांगला देखणा आणि काहीसा थोराड असूनही शाळेला का येत नाही? शंकरकाकांनी विश्वनाथला विश्वासात घेऊन-शिगावला तो चौथी पास होताच-बेनाडीच्या शाळेत त्याला पाचवीत दाखल करून घेतलं.

शाळा रोज दोन वेळा भरे. सकाळी सात ते दहा आणि दुपारी दोन ते पाच. मधल्या सुट्टीत आंघोळी पार पडायच्या त्या तळ्यात किंवा विहिरीत. गावात त्याकरिता हरेकांच्या मळ्यात चिरेबंदी विहिरी होत्या. सबळाच्या मळ्यातील आमची विहीर तर तळ्यासारखी ऐसपैस होती. तद्वत खालच्या बाजूची सुतारकीच्या मळ्यातील विहीरही चिरेबंदी होती. विश्वनाथ या विहिरीवर आळीपाळीनं यायचा आणि आपली पोहण्याची हौस भागवून घ्यायचा. नंतर घरी आलं की जेवण आणि थोडासा अभ्यास झाला न झाला तोच दुपारची शाळा सुरू!

सायंकाळी पाचला शाळा सुटली की बाजूच्या पटांगणांत परवचा सुरू. दुतर्फा उभे राहून मुलं भजनाच्या तालात म्हणायची, 'बे एके बे, बे दुणे चार'. साहजिकच, मुलांचे पाढे नकळत पाठ होत ते औटकीपर्यंत! 'एक औट साडेतीन, बे औट सात'. ते संपले रे संपले, 'शाळा सुटली, पाटी फुटली' म्हणून मुलं पळत घरी जाऊन दप्तरं टाकून गावदरीत खेळायला जमत. तिथंही शंकरकाका येऊन मुलांना 'खो खो', 'आट्यापाट्या' खेळ शिकवत, तर कधी शेजारच्या कुन्नूरच्या वेदगंगा-दूधगंगाच्या संगमावर विशाळी यात्रा भरे. त्यालाही ते मुलांना घेऊन जात. गावाशेजारीच 'मल्ल्याचा' डोंगर आहे. तिथं श्रावणात मोठी यात्रा भरते. येरवीसुद्धा दर सोमवारी भाविकांच्या रांगा मुंग्यांच्या रांगांप्रमाणे वरखाली करताना दिसत.

त्या डोंगराबद्दलही एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. लंकेच्या राम-रावण युद्धात लक्ष्मण जखमी झाला. त्याला जीवदान देणारी वनस्पती द्रोणागिरी पर्वतावरच उपलब्ध झाली होती. ती आणण्यासाठी रामाने आपला भक्त मारुतीला पाठवले. मारुती द्रोणागिरीवर गेला खरा, त्याला हवी ती वनस्पती ओळखता येईना म्हणून त्याने द्रोणागिरीच उचलला आणि तो घेऊन लंकेला जाण्याकरिता उड्डाण केलं. त्यातला एक खडा वाटेत पडला-तोच मल्ल्याचा डोंगर! कारण आसपासचा सारा प्रदेश सपाट असताना, एक मल्ल्याचा डोंगरच काय तो मध्येच एकटा उभा आहे. या गोष्टी बुद्धीला पटोत न पटोत, श्रद्धेला पटतात. त्या श्रद्धेनेच विश्वनाथही दर सोमवारी तो डोंगर चढायचा, डोंगरावरील देवस्थानाचं दर्शन

घ्यायचा आणि डोंगर उतरायचा. त्याला निसर्गाची आवड होतीच. त्यामुळे दर सोमवारी तो तिथं देवदर्शनाला जायचा. अर्थात धाकट्या गणपतीला घेऊन!

रात्रीचा त्याचा कार्यक्रम ठरून गेला होता. गावदरीनजीकच्या तुकाराम पाटलांच्या वाड्यात रोज दिमडी भजन व्हायचं. 'दत्ता तुझे सगुण रूप मनहार', मध्यंतरी 'विचूं चावला-चावला गं बाई' म्हणून सोंगही रंगायचं. ते पाहताना विश्वनाथाची हसता हसता पुरेवाट व्हायची.

त्याचप्रमाणे दाजी अर्जुन पाटलांच्या माडीवरही रोज रात्री थोडा वेळ भजन व्हायचं. एकादशीला तर रात्रभर भजनाचा जागर व्हायचा. टाळ मृदंगाच्या तालात 'सुंदर ते ध्यान, उभा विटेवरी' सुरू व्हायचं. विश्वनाथला ते ऐकायचा नादच लागला. भजनात 'वारीयानें कुंडल हाले, डोळे मोडीत राधा चाले' ही गौळण व्हायची. टाळ मृदंगाच्या तालात ती ऐकताना विश्वनाथ भान हरवून जायचा. रोज ती ऐकून विश्वनाथला संत साहित्याची गोडीच लागली म्हणा ना.

तद्वत नव्या वाड्यात तो गेला की, श्रीपतरावदादा त्याला कर्ण्याच्या ग्रामोफोनवर सुंदराबाईच्या लावण्या ऐकवत. त्या ऐकतानाही विश्वनाथ टिचक्यांचा ताल धरत डुलायचा. या संस्कारांनी त्याची कविवृत्ती जागृत व्हायची. शिगावला शिमग्याच्या सणात उठलेली कवित्वाची उबळ, बेनाडीला योग्य ती दिशा मिळताच तो कविताही लिहू लागला.

शंकर भाऊही कवी होते. त्यांच्या काही कविता त्यावेळच्या 'अमृत' मासिकातून प्रसिद्धही होत. त्यांनी विश्वनाथला विविध वृत्तांची आणि छंदांची माहिती देऊन विश्वनाथच्या कवितांना वळण लावले. विश्वनाथ पुढं कॉलेजात कवी म्हणून मान्यता पावला. याचं श्रेय तो कृतज्ञ बुद्धीनं आपले पहिले गुरू शंकरभाऊ कुलकर्णी यांनाच देतो.

त्यांच्या देखरेखीखालीच विश्वनाथ पाचवीत दाखल झाला होता. बघता बघता तीन वर्ष उडून गेली आणि विश्वनाथ मराठी सातवी पास झाला. या तीन वर्षात तो बेनाडीशी इतका एकरूप झाला की, बेनाडी सोडून जायची कल्पनाही त्याला सहन होईना. कृष्णाला दोन आया होत्या. एक जन्मदात्री देवकी, तर दुसरी जीवनदात्री यशोदा. विश्वनाथालाही शिगाव आणि बेनाडी दोन्ही गावं आपल्या मातृभूमी इतकीच प्रिय झाली होती. याची साक्ष म्हणजे नंतर शिक्षणाकरिता तो कोल्हापूरला राहिला तरी सुट्टीत ज्या ओढीनं तो शिगांवला जायचा, त्याच ओढीनं बेनाडीला भेट द्यायचा. शिगावात त्याचा जन्म झाला होता, तर बेनाडीनं त्याला शिक्षणाची गोडी लावून जीवनाची दिशा दाखवली होती. विशेष म्हणजे, दिशा दाखवणाऱ्या होकायंत्राची भूमिका पार पाडली होती शंकरकाकांनी!

विश्वनाथ जात्याच हुशार असल्याने हरेक परीक्षा तो चांगल्या तऱ्हेनं पास झाला. सातवीला त्यावेळी मुलकी परीक्षा म्हणत. ती पास होताच शंकरभाऊंना वाटलं, विश्वनाथनं इंग्रजी शिक्षणही सुरू करावं. त्याकरिता प्रमुख प्रश्न होता भावाच्या इंग्रजी शिक्षणाचा खर्च करायला त्याचे वडीलबंधू तयार होतील का?

बघूया तरी प्रयत्न करून म्हणून शंकरभाऊंनी शिगांवला जाऊन विठ्ठलरावांची भेट घेतली आणि त्यांना पटवून दिलं की, विश्वनाथ हुशार आहे, तो उद्या पदवी परीक्षा पास होईल, तर बेनाडीकर सदाशिव पाटलांप्रमाणे घराण्याचं नाव काढील. सदाशिवराव हे बेनाडीकर कृष्णाजी पाटील व दत्ताजीराव पाटील यांचे कनिष्ठबंधू. घरात एखादा तरी पदवीधर असावा म्हणून घरच्या वडील भावांनी त्यांना पुण्यातून फर्ग्युसन कॉलेजातून 'बी.ए.' पास व्हायला लावलं होतं. कॉलेजात असताना ते वर्तमानपत्रांतून लिहीत असत. 'विजयी मराठा' या तेव्हाच्या पत्रातून त्यांचा एक लेख प्रसिद्ध झाला होता. 'गोरक्षण की गोभक्षण?' तो वाचून राजर्षी शाहू छत्रपतींनी त्यांना हेरलं आणि क्षात्रजगद्गुरु म्हणून आपलं गुरूपद बहाल केले. हा इतिहास त्यावेळी ताज़ा होता. तो ऐकून विठ्ठलरावांनी धाकट्या भावाच्या शिक्षणाकरिता होईल तो खर्च करायचं मान्य केलं मात्र...

शंकरभाऊंनी पडत्या फळाची आज्ञा म्हणून विश्वनाथचं नाव येता येता कोल्हापूरच्या मराठा बोर्डिंगमध्ये दाखल केलं आणि विश्वनाथला तिथं दाखल करून बेनाडीला परतले. आजच्या बाजारी जगात कोणी गुरू आपल्या शिष्याकरिता एवढी आत्मीयता दाखवतो? आजच्या कलियुगात सोडाच-पूर्वीच्या द्वापार युगातही एकलव्याने द्रोणाचार्यांना गुरू मानून त्यांच्या प्रतिमेसमोर धडे घेऊन धनुर्विद्या हस्तगत केली. तरी त्याची गुरूदक्षिणा म्हणून द्रोणाचार्यांनी एकलव्याच्या उजव्या हाताचा अंगठा कापून मागितला होता. हेतू हाच की तो क्षत्रिय नव्हता. क्षत्रियेतरानं धनुर्विद्या शिकणं हे तेव्हा निषिद्ध होतं. आजही विद्यार्जन व विद्यादान ही ब्राह्मणांची मक्तेदारी आहे. असे असताना एका ब्राह्मण गुरूने-शंकरभाऊंनी-ब्राह्मणेतर विश्वनाथबद्दल एवढी आत्मीयता दाखवली, हे कुणाला खरं तरी वाटेल का?

विश्वनाथनंही ज्याच्या लाडामुळे आपलं शिक्षण सुरू झाले त्या गणपतीला कृतज्ञतापूर्वक शाळेत बिगरीत बसवूनच बेनाडी सोडून कोल्हापूरची वाट धरली.

### ३. इंग्रजी शिक्षण :

विश्वनाथ बेनाडीला मराठी सातवी परीक्षा पास झाला. सातवीला त्यावेळी मुलकी परीक्षा म्हणत. बेनाडीला इंग्रजी शाळा नसल्याने विश्वनाथ त्याकरिता कोल्हापूरच्या 'मराठा बोर्डिंग'मध्ये दाखल झाला.

वास्तविक त्याकाळी मराठी चौथीनंतर इंग्रजी शिक्षण सुरू होत होतं. ते पाहून विश्वनाथला वाटलं, आपण बेनाडीला न जाता इंग्रजीकरिता परस्पर कोल्हापूरला आलो असतो तर? एव्हाना आपण इंग्रजी चौथीत गेलो असतो. शिगांवला तो चौथी पास झालाच होता, पण ही अक्कल त्याला केव्हा आली? शंकरभाऊंनी त्याला बोर्डिंगमध्ये दाखल केलं तेव्हा. आता त्यावर उपाय काय? तीन वर्ष वाया गेली खरी. ती भरून काढायाची कशी? इच्छा आहे तिथं मार्ग आहे. त्यावरही त्याला उपाय सापडला. त्यावेळी मुलकी परीक्षा पास झालेल्या विद्यार्थ्यांकरिता एका वर्षात तीन इयत्ता करवून घेण्याचे क्लासेस होते. त्या क्लासेसमध्ये विश्वनाथनं आपलं नाव घातलं आणि तो एका वर्षात तीन इयत्ता करून चौथीत दाखल व्हायला पात्र झाला. विश्वनाथला आता अभ्यासात रस वाटू लागला होता. त्यानं राजाराम हायस्कूलमध्ये चौथीत नाव दाखल करून उत्साहानं आपलं इंग्रजी शिक्षण सुरू केलं.

बोर्डिंगमध्ये सारेच विद्यार्थी काही अभ्यासू नसतात. काही टवाळ पोरंही असतात. शिष्टपणानं त्यांना डावलूनही चालत नाही. विश्वनाथनं त्यातूनही सोपा मार्ग शोधला. सारे विद्यार्थी झोपल्यावर रात्री उठून तो अभ्यास करायचा आणि दिवसभर टोळभैरवीत सामील व्हायचा. साहजिकच तो दोन्ही वर्गात लोकप्रिय झाला. बोर्डिंगमध्ये राहण्याचा त्याला आणखी एक फायदा झाला तो म्हणजे त्याचा मित्रपरिवार वाढून लोकसंग्रहही वाढीस लागला.

सुदैवानं मराठा बोर्डिंगच्या आसपास अनेक बोर्डिंग्ज होती. सारस्वत बोर्डिंग, जैन बोर्डिंग, लिंगायत बोर्डिंग, मुसलमान बोर्डिंग, फार काय अस्पृश्य बोर्डिंगही होतं आणि हरेक बोर्डिंगमधला एखादा तरी विद्यार्थी त्याच्या वर्गात असायचाच. त्या सर्वांशी विश्वनाथची मैत्री जुळली. याच्या जाती-धर्माच्या भावना नष्ट होऊन तो सर्वधर्मसहिष्णू झाला. विश्वनाथ आपल्या अभ्यासाबाबतही दक्ष असल्याने तो शाळेतल्या स्कॉलर वर्गात मोडत होता. साहजिकच, हरेक परीक्षा पास होत बघता बघता तो मॅट्रिकची परीक्षा पहिल्या झटक्यात पास झाला ते साल १९२३ चं होतं.

मॅट्रिक म्हणजे त्याकाळी काय विचारता? एखादा मुलगा जर सांगू लागला की, 'काका! मी बी. ए. झालो'.

तर ऐकणारा विचारायचा, 'बी. ए. झाला असशील रे, मॅट्रिक पास झालास का सांग!' यावरून तेव्हाची मॅट्रिकची महती लक्षात येईल आणि ती अगदी सार्थ होती. कारण कितीतरी मुलं मॅट्रिक होताच कुठे ना कुठे नोकरीला लागायची. विश्वनाथला तर ते सहज

शक्य होतं, कारण तो पहिल्या वर्गात पास झाला होता. पण विश्वनाथला नोकरी करायचीच नव्हती. त्याला स्वतंत्रपणे काही व्यवसाय करायचा होता आणि त्याकाळी करण्याजोगा बिनभांडवली धंदा एकच होता वकिलीचा! पण त्याकरता 'एलएल.बी.' पास व्हायला पाहिजे आणि एलएल.बी. म्हणजे 'बी.ए.' नंतरची परीक्षा.

त्याकरिता विश्वनाथनं कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजात प्रवेश केला. त्याकाळी कोल्हापुरात तेच एक कॉलेज होतं म्हणा. विश्वनाथनं मोठ्या उत्साहानं राजाराम कॉलेजात प्रवेश केला. तेव्हा कॉलेजचे प्रिन्सिपॉल होते डॉ. बाळकृष्ण. मी अनेक प्रिन्सिपॉल पाहिले, पण डॉ. बाळकृष्णांसारखा दुसरा प्रिन्सिपॉल मला दिसला नाही. ते आर्यसमाजी होते. कॉलेजच्या पोर्चमध्ये मोटारीतून उतरले की, भरपूर उंचीचे, डोक्याला त्यांचा खास पद्धतीचा फेटा, नेहमी सुटा-बुटात पाहिले की विद्वान कसा असावा याची प्रथमदर्शनीच कल्पना येईल. आवाजही भारदस्त, विद्वतापूर्ण भाषणांना साजेसा! कॉलेजात प्रवेश करणाऱ्या विद्यार्थ्यांचं ते प्रमुख आकर्षण असायचं.

त्यांचाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून विश्वनाथनं कॉलेजात प्रवेश केला. कॉलेजच्या सभागृहातील तो मेन हॉल पाहूनच विश्वनाथ पार भारावून गेला. कॉलेजची पहिली परीक्षा काय-ती कॉलेजचीच असते. त्यात सहसा कोणी नापास होत नाही. विश्वनाथ अभ्यासू असल्याने इंटरचीही परीक्षा तो पहिल्या झटक्यात चांगल्या मार्कांनी पास झाला.

दरम्यान, पंचगंगेच्या पुलाखालून बरंच पाणी वाहून गेलं. बेनाडीला काकीचा मुलगा गणपतीही चौथी पास झाला. साहजिकच, त्याच्याही इंग्रजी शिक्षणाचा प्रस्ताव समोर आला. आपल्या लाडक्या मामांच्या प्रमाणे, त्यांच्यासह तोही बोर्डिंगमध्ये राहू शकला असता, पण आमच्या वडिलांनी आण्णांनी विचार केला, गणपतीपाठोपाठ आपल्या मुलांच्याही इंग्रजी शिक्षणाचा प्रस्ताव उद्या येणारच. त्या सर्वांना बोर्डिंगमध्ये ठेवण्यापेक्षा एखादं घर भाड्यानं घेऊन कोल्हापूरला स्वतंत्र बिऱ्हाड केलं तर? विश्वनाथराव कॉलेजात आहेतच-त्यांचं मार्गदर्शन मुलांना मिळेल, देखरेखही राहील. ही योजना सर्वांना पसंत पडली आणि विश्वनाथनी सर्वांकरिता म्हणून शनिवार पेठेतलं टाऊन हॉलनजीकच्या मारुतीच्या देवळाजवळंच दत्तोबा करजगार यांचं तिमजली घर भाड्यानं घेतलं. गाडीबरोबर नळ्याची यात्रा या न्यायानं आम्ही सर्व मुलं तिथं रहायला आलो. विश्वनाथ आमचे पालक झाले!

माफ करा. आतापर्यंत मी त्यांचा निर्देश त्यांच्या नावानं केला. यापुढं आम्ही एक कुटुंबीय झाल्याने त्याना मी काकीचे बंधू म्हणून गणूदादाप्रमाणे (काकीचा मुलगा) मामा

म्हणून निर्देश करीत आहे. आम्ही कोल्हापूरला येताच मामांनी गणूदादाचं नाव राजाराम हायस्कूलमध्ये इंग्रजी पहिल्या वर्गात घातलं. असं असताना आण्णांनी आपल्या मुलांची नावं विद्यापीठ हायस्कूलमध्ये कशी घातली? या प्रश्नाचं उत्तर मला अद्याप सापडलेलं नाही. कदाचित असंही असू शकेल, विद्यापीठाचे संस्थापक वा. द. तोफखाने मास्तर यांनी आपली संस्था 'भक्ती ईश्वराची, सेवा मानवाची' या ध्येयानं सुरू केली होती. आमच्या वडिलांना ते ध्येय भावलं असावं! त्यांनी आमची नावं विद्यापीठात दाखल केली. तेव्हा मी मराठी चौथीत होतो. माझा भाऊ जयसिंग माझ्याखाली एक वर्ष म्हणजे मराठी तिसरीत होता. तिसरा भाऊ विश्वास अगदीच लहान होता. मराठीचे वर्ग बाजूच्याच म्हणजे महालक्ष्मी मंदिरानजीकच्या माडीवर होते. मराठी शाळेचे हेडमास्तर होते महाजन मास्तर.

शाळेला मी नेहमी भाऊसिंगजी रोडने जायचा-यायचा. जुन्या राजवाड्याची भव्य कमान राजवैभवाची साक्ष देत असे. मधोमध मोठं घड्याळ आणि दोन्ही बाजूंना टोले वाजवणाऱ्या मोठ्या घंटा! त्या पहात असता पोलिसांच्या शिट्या ऐकू येत. त्याबरोबर लोक दुतर्फा उभे राहून बघत. राजाराम महाराजांचा चार घोड्यांचा रथ - समोर बसलेले राजाराम महाराज येताना दिसले. शिवछत्रपतींचा वारस मी प्रथम पाहिला. मी मोठ्या आदरानं त्यांना त्रिवार मुजरा केला. महाराजांचा रथ कमानीत प्रवेश करताच वरच्या राजमार्गाची नौबत झडायची. तो प्रकार पुन्हा महाराज वाड्यातील भवानी मातेचं दर्शन घेऊन परतताना व्हायचा. आतील बाजूला दोन्ही बाजूच्या पिलखान्यात दोन हत्ती डुलताना दिसले. खरंच, राजवैभव काही वेगळंच! उगीच नाही राजाला देवाचा अवतार मानत!

राजवाड्याच्या कमानीच्या डाव्या बाजूलाच राजाराम कॉलेज होतं. मामा एव्हाना ज्युनियर बी. ए. मध्ये होते. ज्युनियर बी. ए.चं वर्ष म्हणजे काय, कॉलेज जीवन जगण्याची पर्वणीच! कॉलेज सुरू होताच कॉलेजच्या निवडणुका होत. मामा त्यात कॉलेजच्या नियतकालिकेचे राजारामीयनचे संपादक म्हणून निवडून आले. मला वाटलं, मामांच्या भावी जीवनाची ही नांदीच होती. कारण त्यानंतरही मामांनी ज्या-त्या निवडणुका लढवल्या, त्यात ते एकदाही हरले नाहीत!

कॉलेजचं नियतकालिक 'राजारामियन' वर्षातून दोनदा प्रसिद्ध होत असे. राजारामियनचे संपादक होताच मामांची प्रतिभा नव्यानं जागृत झाली आणि वर्षभरात ते कवी म्हणून कॉलेजात मान्यता पावले.

कॉलेजात तेव्हा गॅदरिंगला एखादं नाटक बसवण्याची प्रथा होती. मामांनी कॉलेजच्या नाटकांतही काम केलं. मामा वरेरकरांचे " सत्तेचे गुलाम " हे नाटक कॉलजनं सादर केलं.

त्यात मामांनी केशोपंताची खलपुरुषाची भूमिका वठवली होती. मामा एकदम देखणे असल्याने ते खलपुरुष कसे काय शोभतील? याबद्दल अनेकांनी शंका व्यक्त केली. तरी मामांनी ती अस्थानी ठरवली. त्यानी दाखवून दिलं की, खलपुरुष सुंदर चेहऱ्याचाही असू शकतो. चेहरा हा काळजाचा आरसा असतो असं म्हणतात. पण मामांनी दाखवून दिलं, सुंदर चेहरा हा उलट्या काळजाचा मुखवटाही असू शकतो. मामा नट म्हणूनही कॉलेजात मान्यता पावले.

सर्वांना वाटत होतं, सिनियर बी. ए. च्या वार्षिक परीक्षेतही ते कॉलेजला नाव मिळवून देतील. पण झालं उलटच - मामांच्या मनात काय आलं कळत नाही. सिनियर बी. ए. करता ते मुंबईला गेले. तेथल्या विल्सन कॉलेजच्या हॉस्टेलमध्ये राहून विल्सन कॉलेजमधून बी. ए. झाले. त्यांना वाटलं असावं, आजवर शिगांव, बेनाडी असा खेड्यांचा प्रवास झाला. कोल्हापूर तरी काय, मोठ्या खेड्यासारखच होतं. त्याबाहेर पडून एकदा तरी जिवाची मुंबई करुन पहावी. नाहीतरी, त्याकाळी कॉलेजच्या साऱ्या परीक्षा मुंबई विद्यापीठामार्फत होत होत्या. कुठल्याही कॉलेजात गेलात तरी पदवी परीक्षा मुंबई विद्यापीठाचीच असायची.

आम्हां मुलानांही मुंबईची वारी कशी घडली पाहा. काय झालं; बालवीर चळवळ (बॉय स्काऊट) तेव्हां नुकतीच सुरु झाली होती. त्याचा गणवेश ठरलेला होता. खाकी सदरा, त्याच रंगाची चड्डी, गळ्यात हिरवा स्कार्फ, काखेत दोरी बांधलेली शिट्टी आणि छातीवर किलवर आकाराचं पदक ! हरेक शाळातून अशा बालवीरांची पथके तयार झाली. परोपकाराची आणि स्वालंबनाची संदेश देणारी अशी ती पथके होती. रविवारच्या सुट्टीत त्यांचे कँपफायर सारखे कार्यक्रमही होत. बालवयात शिस्तीची शिकवण अनायासे मिळत असे.

मला आठवतं अखिल भारतीय बालवीरांची " जांबुरी " तेव्हा मुंबईत भरली होती. वरळीच्या बी. डी. डी. चाळी तेव्हाच बांधून तयार झाल्या होत्या. त्यामधून आमची राहाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. मधोमध जे मैदान आहे, तिथं त्या रॅलीचा सोहळा पार पडला. माझी आठवण धड असेल तर डॉ. अनी बेझंट त्याकरता हजर होत्या. आजही ते मैदान जांबुरी मैदान म्हणून ओळखलं जातं. मी विद्यापीठातून व गणूदादा राजाराम हायस्कूलमधून त्याकरता हजर झालो होतो. स्काऊटच्या वेषात मणूदादा एकदम चिमखडे दिसत. मला पटका कधीच चांगला बांधता आला नाही. गणूदादा तो छान बांधायचा. आम्ही कोल्हापूरला परत आलो.

दरम्यान मामाही बी. ए. ची परीक्षा देऊन कोल्हापूरला आले होते. निकाल लागायला अवधी असला, तरी सर्व जाणून होते - मामा बी. ए. पास होणारच. बरेच दिवसांनी मामा आल्याने आक्का जणु त्यांच्या तैनातीलाच लागल्या. काय करु काय नको? असं त्यांना होऊन गेलं. आम्हां मुलांना त्यात काही वाटलं नाही. तरी घरच्यांनी ओळखलं की हे उभयतांच प्रियाराधन आहे. घरी सर्वांना हे मान्यच होतं. म्हणतात ना, मियां - बिवी राजी, तो क्या करेगा काजी?

इथं तर काजीच मियाबीबींचा पक्षपाती होता. आण्णांनी हे लग्न आधीच ठरवलं होतं. त्यांना आपला जावई लक्ष्मीधर नको होता, धैर्यधर नको होता, त्याना जावई पाहिजे होता पदवीधर ! त्यांची धारणा होती, कितीही खर्च झाला तरी शिक्षण हीच न संपणारी दौलत आहे. चर्चा सुरु झाली, हे लग्न कुठं करावं? कारण घरासमोरचा रस्ता अरुंद होता. त्यावर जगद्गुरुनी सुचवलं, '' आमच्या दरवाजासमोर करु या'' पण नाही. आण्णांचा आग्रह एकच, हे लग्न बेनाडीलाच करायचं. आपल्या घरचं हे पहिलं लग्न आहे, हे आमच्या दारातच वाजलं पाहिजे.

**४. शुभमंगल :**

मामांचं आणि आक्काचं लग्न ठरलं, तेव्हा मला वाटलं, ''मामांना बाकी लायक बायको मिळाली.'' मामांना लहानपणी शाळेचं वावडं होतं, तर आक्काचं नी शाळेचं वाकडंच होतं. शाळेची वेळ झाली की आक्काचं डोकं दुखायचं, तर कधी पोटात दुखायचं, ताप मात्र त्यांना कधी आला नाही. कारण तो हातांना जाणवतो, थर्मोमीटरनं मोजता येतो.

तो ताप झाला नरसिंग काकांच्या डोक्याला. नरसिंग काका हे आमच्या घरचे कारभारी. डोकं, पोट दुखायची सोंगं संपल्यावर आक्कांनी नवीन युक्ती शोधून काढली. शाळेला जाताना ऐनवेळी त्यांचं पाटी-दप्तर कुठं सापडायचं नाही. ते शोधून काढत नरसिंग काका. आक्कांना पटलं, पाटी-दप्तर लपवण्यात काही अर्थ नाही. त्यावर त्यांनी शेवटी रामबाण उपाय शोधून काढला. घराशेजारीच गांवदरीत दोन उकीरडे होते. पावसाळ्यात ते पाण्यानं भरत. अशा वेळी आक्का आपलं दप्तर उकीरड्यात फेकून देत. मग ते नरसिंग काकांना सापडणार कसं? वर्षअखेर ते सापडायचं खताच्या गाड्या भरताना, तेही कुजून खत झालेल्या अवस्थेत!

वास्तविक, आण्णा एवढे शाळेचे भक्त. पण त्यांनीही आक्कांच्या पुढं हात टेकले. शेवटी वैतागून म्हणाले, ''राहू दे, पोरीची शाळा. दिसायला गोरीगोमटी आहे. कोणीही पसंत करील.'' कन्याधन परक्याचं, ते ज्याचं त्याच्याकडे पोचतं केलं की झाले. बापाची

जबाबदारी संपली.

आक्का घरकामात मात्र पारंगत होत्या. वाड्यात काकींच्या माजघरात गौरी बसत. तेव्हा वाड्यातल्या बायका जमायच्या, गौरीसमोर खेळायच्या. आक्का फुगडी, झिम्मा, घोडा-घोडा सुरेख खेळायच्या. अंगानं सडपातळ असल्याने एकदम चपळ होत्या. स्वैपाक करण्यात तर पटाईत. काटवटीत कणीक मळून घेतल्यावर हातावरली भाकरी करावी त्यांनीच! तव्यात दुतर्फा भाजून चुलीसमोर शेकायला ठेवल्यावर एकदम टम्म फुगायची - रुसल्या पोरीच्या गालावानी. त्यावर टिचकी मारली की आंतून वाफा निघत. त्यात तूपाची धार ओतून खाल्ली की, नुसती भाकरी सुद्धा खमंग लागायची.

मामा तेव्हापासून बेनाडीला होते. साहजिकच, त्यांना आक्कांच्या भाकरीची चटकच लागली होती. आता तर काय, जन्माची साथसंगत मिळणार होती. आण्णांनी हे लग्न बेनाडीला करायचं ठरवलं. सर्वांना सांगितलं, आमच्या घरचं हे पहिलं लग्न. आपल्या दारातच वाजलं पाहिजे. पण अंतस्थ हेतू निराळाच होता. गावात लिंगायत पाटील व मराठा पाटील यात नेहमी स्पर्धा असायची ना?

बाळू म्हादगोंड पाटलाघरचं एक लग्न नुकतच पार पडलं होते. त्याकरता त्यांनी बेनाडीच्या चारी दिशांना चार कमानी उभारून त्या सजवल्या होत्या. लग्न लागल्यावर रात्रीच्या वरातीकरता सुळकूडच्या पाटलांचा घोडा आणला होता. बेनाडीला एकही घोडा नव्हता. नाही म्हणायला, पोलीस पाटलांचा रघु एक घोडा गल्लीबोळतनं दामटायचा. पण तो घोडा कसला? एक तट्टू होतं. गावकऱ्यांना उमद्या घोड्याचं दर्शन घडलं, ते बाळू म्हादगोंड पाटलाघरच्या लग्नात. लग्न उरकल्यावर म्हादगोंड पाटील मोठ्या अभिमानानं विचारत सुटले, ''एवढ्या दणक्यात लग्न गावात झालंय का कुणाचं?''

ते आव्हान आण्णांनी स्वीकारलं होतं. त्यांनी दारात लग्नाकरता मांडव उभा केला. त्यांच्या पांढऱ्या शुभ्र चांदणीखाली आंब्याच्या ढाळ्या आणि हंड्या झुंबरं लावली. मांडवाची कमान तर बघण्याजोगी होती. गावाच्या चारी दिशांना चार कमानी तर उभारल्याच, पण सौंदलग्यापासून बेनाडीचा रस्ता फुटतो, तिथंही एक कमान उभारली, त्याचप्रमाणे कुन्नूरच्या वाटेवरही एक कमान उभी करुन त्यावर पाट्या लावल्या, ''बेनाडीकडे.''

म्हादगोंड पाटलाघरच्या लग्नातली वरात घोड्यावरून निघाली होती. आण्णांनी आक्का-मामांच्या वरातीकरता जगद्गुरूंचा हत्ती मागवून घेतला. गांवदरीत लिंबाच्या झाडाखाली आधल्या दिवशी तो डुलू लागला मात्र हत्ती पाहण्यासाठी सारा गाव जमा झालाच, शेजारच्या आडी, कुन्नूर, बारवाड, भिवशी गावांचे लोकही हत्ती बघायला लोटले!

लग्नाकरता क्षात्रजगद्गुरू तर होतेच, पण मामांच्या मित्रपरिवारांच्या मोटारींनी सारी गावंदर भरुन गेली. गोरज मुहूर्तावर ''शुभमंगल सावधान'' म्हणून आक्का-मामांच्या मस्तकी अक्षता पडल्या. त्या रात्री हत्तीच्या पाठीवर चांदीचा हौदा चढवून नवपरिणितांची वरात निघाली, खरंच, आक्का-मामा त्यात राजाराणीसारखे शोभत होते.

सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे, बेनाडीचा नकाशा कोणत्या इंजिनियरनं आखला होता, देव जाणे! एक रस्ता काही सरळ नाही. एक तर सारे रस्ते बोळासारखे अरुंद आणि वळण एकदम काटकोनचं! हत्ती त्यावरुन जाणार कसा? त्याकरता आण्णांनी काही घरांची कोपरे मोडले (नंतर ते बांधूनही दिले म्हणा). वरातीकरता आण्णांनी खास मिरजेचा पितळी बॅण्ड आणला होता. त्या बॅण्डच्या तालात वरातीचा हत्ती एकदाचा मारुतीच्या देवळासमोर आला. शिडीवरुन नवपरिणित वधु-वर उतरले आणि त्यांनी देवदर्शन घेतलं.

त्यावेळी समोरच्या पटांगणांत वरातीवेळचं दारुकाम असं काही झालं म्हणता-मध्यान रात्रीपर्यंत देवळासमोर औट उडत होते, भुसनळी फुलत होती, बाण वेडीवाकडी वळणं घेता घेता आकाशात फुटत. तेव्हा त्यांची जी शोभा व्हायची, ती पाहून वाटायचं, आकाशीच्या नक्षत्राखाली नवी नक्षत्रंच उगवली आहेत. ती पाहून त्यावेळी मला गंमत वाटली, तरी आता वाटतं, मामांचा जन्म नागपंचमीचा. मामा राजा झाले नाहीत, तरी हत्तीवरल्या हौद्यांत आक्का-मामा राजा-राणीसारखे शोभत होते.

लग्नसोहळा तीन दिवस चालला होता. तीन दिवस गावातल्या चुली बंद होत्या. दत्तू पाटलानं गावजेवणच घातलं होते. त्यावेळी ''लक्षभोजन'' हा शब्द माहीत नव्हता. नाहीतर त्याच शब्दांत या लग्नाचं वर्णन करावं लागलं असतं. अखेर लग्नाचं सूप वाजलं, तेव्हा आण्णा प्रत्येकाला विचारत सुटले, ''म्हादगोंड पाटलांना विचारा, असं लग्न झालंय का कधी गावात? छत्रपतींचा हत्ती राजाला पाठीवर घेतो, माकडाला नाही.''

खरंच, चार दिवस मजेत गेले. आम्हां मुलांना तर ती दिवाळीच वाटली. आणि एक दिवस नको ती घटना घडली. गावात एकाएकी कॉलऱ्याची साथ सुरू झाली आणि त्यात पहिला बळी पडला तो गणूदादांचा.

काकीच्या मस्तकी जणूं आकाशातली कुऱ्हाडच कोसळली. दुदैवानं आधीच त्या नवरा गेल्यामुळे विधवा झाल्या होत्या. आता हातातोंडाला आलेला एकुलता एक मुलगा गेला. त्याला उराशी धरून काकींनी जो हंबरडा फोडला, तो ऐकून आमची काळजं फाटून गेली. काकींना पुत्रशोक आवरणं अशक्य झालं. काकींना हा दु:खावेग कितीतरी दिवस, दिवस का महिने आवरता आला नाही.

तरी हरेक दु:खावर कालहरण हाच रामबाण उपाय होय. काकींच्यावर दैवी आपत्ती कोसळली होती. त्या दु:खातून लौकर बाहेर पडण्यासाठी मामांनी एक सहलच ॲरेंज केली. एक मिनी बस भाड्यानं घेऊन आम्ही निघालो. मी त्यावेळी लहान असल्याने सहलीचा संगतवार वृत्तांत देऊ शकत नाही, तरी एक आठवतं;

घटप्रभा नदीचा गोकाक जवळचा धबधबा. आजवर मी शाळेच्या ट्रीपवर असताना गावा शेजारचा उजळाईचा धबधबा काय तो पाहिला होता. त्या मानानं गोकाकचा धबधबा कितीतरी मोठा होता.

पाठोपाठ पाहिला तो शरावती नदीचा गिरसप्पाचा धबधबा. मी पाहिलेला तो सर्वात उंच धबधबा! युरोपमधला ''नायगारा फॉलस्'' त्याहून मोठा असेल, पण रुंदीनं. उंचीनं नसावा, अशी माझी समजूत आहे. गिरसप्पा धबधब्याच्या पार तळापर्यंत आम्ही जाऊन पाहिलं. सूर्याच्या तिरप्या किरणांनी निर्माण केलेली इंद्रधनुष्ये अजूनही डोळ्यासमोर तरळतात.

अशा तऱ्हेने आम्ही दक्षिणेची सफरच केली म्हणा ना. हंपी, बदामी ही शहरं पाहिली. त्यांच्या परिसरातले शिलाखंड एकेक हत्तीच्या आकाराचे ! बालाजी, तिरुपती मंदिराचा विस्तार काय वर्णावा? त्या देवळावरली गोपूरं एकापेक्षा एक भव्य आणि कलाकृतींनी सजलेली.

तेथून आम्ही गोकर्णालाही जाऊन आलो. गोकर्णाच्या निर्मितीची आख्यायिका मोठी रंजक आहे. रावण शंकराला प्रसन्न करवून घेऊन, त्यानं दिलेलं शिवलिंग घेऊन चालला असता, त्याला वाटेत लघुशंका करावीशी वाटली. हातात शिवलिंग घेऊन लघवीला कसं बसायचं? त्यावेळी गणपती, एका मुलाचं रुप घेऊन तिथं आला. रावणानं त्याच्या हाती शिवलिंग देऊन लघुशंका होईतो, ते सांभाळायला सांगितलं.

रावण म्हणजे दशमुख ! दहा माणसांचं बळ त्याच्या अंगांत. साहजिकच, त्याची लघुशंकाही त्याला साजेशीच असणार ! बराच वेळ वाट पाहून गणपती म्हणाला, '' आटपा लौकर, पिंडी फार जड आहे हो. हात अवघडले माझे''.

'' झालंच, '' म्हणून रावण उठत असताना गणपतीनं हातातील शिवलिंग खाली ठेवलं ! झाली पंचाईत? रावणानं ते दोन हातांनी पकडून उचलण्याचा प्रयत्न केला. पण ते जे रुतून बसलं, ते हालता हालेना. रावणानं सारी ताकद पणाला लावली, तेव्हा त्या पिंडीवरला उंचवटा पिळला जाऊन, तो गाईच्या कानाच्या आकाराचा झाला, पण पिंडी

हालता हालेना.

तेव्हांपासून ते शिवलिंग स्वयंभू समजून, त्यावर नंतर लोकांनी मंदिर उभारलं. ते गोकर्ण मंदिर म्हणून प्रसिद्ध आहे. या आख्यायिका बुद्धीला पटोत न पटोत.श्रद्धाशील मनाला अर्थपूर्ण वाटतात. परतीच्या वाटेवरला एक घाट तर एवढा चढा आहे की, तो चढताना देव आठवतो. म्हणून तर त्याला देवमनी घाट म्हणत असतील. असो, मामांच्या सह घडलेल्या दक्षिण सहलीची आठवण ही अशी आहे. त्यानंतर एवढा प्रवास मी कधीच केला नाही. मामांच्या निसर्ग प्रेमानं घडला म्हणून झाला. नाहीतर आमची मजल काय - पन्हाळा, खंडाला आणि लोणावळा. फार तर माथेरान ! डोक्यावरुन पाणी.

**५) बी. ए., एल.एल. बी. - वकील :**

आम्ही सहलीहून परत आलो आणि मामांना वेध लागले 'एलएल.बी. होण्याचे.

'आता काय होतोय हा 'एलएल.बी' असंही काहीजण कुजबुजू लागले. त्यांची शंकाही चुकीची नव्हती. लग्न झाल्यावर कुणी शिक्षण घेतलंय का? सडा होता तेव्हा बी. ए. झाला. आता बायको घरात आल्यावर काय व्हावं यानं एलएल.बी? बायकोनं अभ्यास करू द्यायला पाहिजे ना?

पण लोकांची ही शंका अस्थानी होती. एक तर, कोल्हापुरात तेव्हा लॉ कॉलेज नव्हतं. ते कालपरवा झालं. आमच्या डोळ्यांसमोर. म्हणजे एलएल.बी करता मामांना मुंबई किंवा पुण्यालाच जाणे क्रमप्राप्त होतं. मामांनी 'बी.ए.' करता मुंबईची निवड केली होती. कोल्हापुरात आर्टस् कॉलेज असताना 'एलएल.बी' करताही ते मुंबईलाच जातील, असा अनेकांचा कयास होता, पण मामांनी निवड केली पुण्याची. चौपाटीचा समुद्र पाहिला होता. बघू या तरी मुळा-मुठेच्या संगमावर काही पुण्य पदरात पडतं का?

पुण्याचा तेव्हा लौकिकही चांगला होता. विद्यानगर म्हणून पुणे तेव्हा ओळखलं जात होतं. तिथल्यासारख्या शिक्षणसंस्था इतरत्र कुठंच नव्हत्या. पुणेकरही अभिमानानं म्हणत, 'पुणे तेथे काय उणे?' काय नव्हतं पुण्यात? भावे हायस्कूलसारखी माध्यमिक शाळा होती. हुजूरपागेसारखी मुलींची शाळा होती. फर्ग्युसन कॉलेज, परशुरामभाऊ कॉलेजसारखी नामवंत कॉलेजीस होती, त्याचप्रमाणे पुण्याचं लॉ कॉलेजही लोकमान्यता पावलं होतं.

मामांनी पुण्याच्या लॉ कॉलेजमध्ये आपलं नाव दाखल केलं. राहण्याच्या जागेचीही वानवा नव्हती. 'To Let' अशा पाट्या अनेक बंगल्यावर लटकत होत्या. जेवण्याकरिता

काय-बादशाही बोर्डिंगच्या शाखा गावात आणि डेक्कन जिमखान्यावरही होत्या. डेक्कन जिमखान्यावरलं 'लकी रेस्टारंट' नवागताचं स्वागत करायला अहोरात्र खुलं असायचं. जिमखान्यावरच एखादी खोली भाड्यानं घेऊन ते राहिले असावेत.

पुण्यात मामांनी आपली पथारी पसरली. मात्र-त्यांनी पहिली चढाई केली असणार ती सिंहगडावर! घोरपडीच्या सहाय्यानं ज्या बुरूजावर तानाजी मालुसरा चढला असेल, त्या बुरूजावर बसून 'कोंडाण्याचा सिंहगड' कसा झाला, या ऐतिहासिक घटनेचं 'रि प्ले' त्यांनी मिटल्या डोळ्यांनी पाहिला असणार! पुण्यातली दुसरी प्रेक्षणीय स्थळं म्हणजे पर्वती आणि तळ्यातला गणपती. या तर त्यांच्या रोजची पायपीट करण्याच्या जागा असणार!

कसबा पेठेतील भवानी मातेचं दर्शन घेताना, शेजारच्या शिवाजी महाराजांच्या वास्तव्यानं पुनीत झालेला लाल महालही त्यांना मंदिराइतकाच पवित्र वाटला असणार! त्याच्या खिडकीतून पळ काढताना शाहिस्तेखानची बोटं शिवाजी महाराजांनी तोडली, ती खिडकीही मामांना देवाच्या गाभाऱ्याएवढी पवित्र वाटून पुण्यात मस्तकं टेकायचं तरी कुठं कुठं? पुण्याचा सांस्कृतिक वारसा आहेच तसा संपन्न! असं एक क्षेत्र नाही की जेथे पुण्यानं आपला ठसा उमटवलेला नाही.

पुण्याचं प्रधान आकर्षण म्हणजे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक! ब्रिटिश सत्तेच्या एक शतकाच्या गुलामगिरीला हादरा देणारा पहिला ललकार त्यांनी केला, 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच!'

त्याकरिता त्यांनी स्वतःचं पत्रही सुरू केलं होतं आणि ते घरोघर इतकं पोचलं होतं की, रोज सकाळी उठल्याबरोबर लोक चौकशी करीत, 'काय म्हणतो केसरी?'

खरंच, टिळकांच्या पत्राचं नावही किती सार्थ होतं नाही? 'केसरी' डरकाळी फोडतो आणि ती इतकी वीरश्रीयुक्त असते की, तिचा धाक ब्रिटिश सत्तेलाही वाटत होता. टिळकांचा राहता गायकवाडवाडा म्हणजे इतिहासकाळी देशाला दरारा दाखवणाऱ्या शनवार वाड्यासारखाच होता-अगदी हाकेच्या अंतरावर. शनवारवाडा ही टिळकांची राजधानी होती.

मामा रोज 'केसरी' वाचू लागले. पुण्यात वाचायचं तरी किती? टिळकांचे एकेकाळचे सहकारी गो. ग. आगरकर यांचा 'सुधारक'ही केसरी एवढाचं लोकप्रिय होता. आगरकरांनी सामाजिक सुधारणांचा जणू वसाच पत्करला होता आणि तो वसा त्यांचा 'सुधारक' निष्ठेनं पाळत होता.

तद्वत, विष्णूशास्त्री चिपळूणकर हे मराठी भाषेचे शिवाजी या पदवीला पोचले होते आणि ते आपली लेखणी 'निबंधमाला ' या आपल्या पत्रातून समशेरीप्रमाणे परजत होते. हे कमी पडलं म्हणूनच की काय, 'भालाकार' भोपटकरही आपल्या भाल्याची फेक रोज करीत होते. ही सारी ब्राह्मणमंडळी विद्यार्जन आणि विद्यादान यांचा जन्मजात हक्क मिळाला असल्याने अधिकारीवाणीनं लिहीत होती. हातातल्या लेखणीची एकमेकांशी लढतही होती तत्त्वनिष्ठेसाठी?

त्यांनाही ललकारणारे महात्मा जोतिबा फुले याचवेळी उदयाचली वर वर येत होते. त्यांच्या मते ब्रिटिश राज्यामुळे देशाला गुलामगिरी आली, तरी त्यांनी केलेल्या सार्वत्रिक शिक्षणप्रसारामुळे शिक्षण समाजाच्या सर्व थरात पोचले होते. महात्मा फुल्यांनी पहिला प्रहार केला तो वेद प्रतिपादित चार्तुवर्णावर! ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र ही उतरंड जातीनिहाय रचणारे ब्राह्मण कोण? 'चार्तुवर्ण्यं मया सृष्ट्यम गुणकर्म विभागश:' या भगवंतांच्या आदेशानुसार हिंदू समाजरचना कर्मानुसार नव्याने केली पाहिजे. त्यांनी आपल्या 'सत्यधर्म' या पत्राने शिक्षणाचे वाघिणीचे दूध समाजातील सर्व घटकांना पाजून 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हती' या आदेशाने शिक्षणाला वंचित झालेल्या स्त्रियांच्या उद्धाराकरता शाळा सुरू केली. त्यात शिक्षिका म्हणून आपल्या धर्मपत्नीला सावित्रीबाईंना शिकवून तयार केले. तेव्हा 'शांतम् पापम्' म्हणून ब्राह्मणांनी एकच कलकलाट केला. सावित्रीबाईंचा तर इतका छळ केला की, त्या शाळेला निघाल्या की त्यांच्यावर शेणफेक करायलाही त्यानी कमी केलं नाही. म्हणून सावित्रीबाईंनी शाळेत दुसरं लुगडंही ठेवलेलं असायचं.

एकाचवेळी एकाच पुण्यात किती चळवळी सुरू झाल्या. विशेष म्हणजे त्या सर्व समाजाच्या जागृतीच्या दृष्टीनं सारख्याच महत्त्वाच्या ठरल्या.

याच सुमाराला महात्मा गांधीचांही उदय झाला आणि त्यांच्या मिठाच्या सत्याग्रहाने स्वातंत्र्याची चळवळ घरोघर पोहोचली. रोज आपण मीठ खातो आणि मिठाला जागणे हा आपला धर्म आहे. मिठाचा सत्याग्रह सुरू करणारे महात्मा गांधी खरोखरीच माणसांचे मनोधर्म जाणणारे म्हटले पाहिजेत. याच सुमाराला महर्षी कर्वे यांची हिंगण्याची मुलींची शाळाही स्त्री शिक्षणाचं कार्य न बोलता करीत होती.

'एलएल.बी'च्या अभ्यासाकरता दोन वर्षे पुण्यात राहिल्यावर पुण्यातील या विविध चळवळींचा मामांच्या मनावर चांगलाच परिणाम झाला. एलएल.बी या पदवीनं ते 'वेल रेड' तर झालेच, पण पुण्यात होणारी रोजची प्रबोधनपरे भाषणे ऐकून ते बहुश्रुतही झाले. त्यांना तीव्रतेनं वाटू लागलं, आपण ज्या समाजातून वर आलो, त्या समाजाकरिता काही

करणं हेच आपलं आद्य कर्तव्य आहे आणि ते साध्य करण्याकरिता आर्थिकदृष्ट्या सबळ आणि स्वतंत्र होणं जरूर होतं. त्याकरिता काही काळ तरी वकिली केलीच पाहिजे, एलएल.बीची परीक्षा संपताच ते कोल्हापूरला परत आले. आपण पास होणार याची त्यांना खात्रीच होती. आल्या आल्या त्यांच्या ध्यानी आलं, वकिली करण्याच्या दृष्टीनं शनवारातलं आपलं घर गैरसोयीचं आहे. तळमजल्यावर प्रथमदर्शनी एकच खोली आहे. ती सर्वांची बैठकीची खोली असल्याने वकिलीचे ऑफिस करण्यास गैरसोयीची आहे. शिवाय ती लहान होती. त्यांनी तात्काळ ते घर सोडलं आणि शुक्रवार पेठेतील वायंगणकर इंजिनियर यांचं तिमजली घर भाड्यानं घेतलं. आम्हा मुलांच्या दृष्टीनं त्यात फारसा फरक पडला नाही. दोन-तीन गल्ल्या पश्चिमेला गेलो इतकंच. एक गोष्ट मात्र चांगली झाली. आम्ही काहीशा आडवाटेला होतो ते गावातल्या एका प्रमुख रस्त्यावर आलो-पंचगंगेच्या वाटेवर जिनं कोल्हापूरला दक्षिण काशी म्हणून माहात्म्य मिळवून दिलं.

**६) कोल्हापूरचे नगराध्यक्ष :**

मामा शुक्रवार पेठेतील वायंगणकर यांच्या वाड्यात राहायला आले. वाडा चांगला तिमजली होता. वाड्याच्या प्रवेशद्वाराच्या दोन्ही बाजूला दगडी कट्टे होते. एवढे ऐसपैस की त्यावर बसून आम्ही सायंकाळी गप्पा मारीत असू. अंगणात छोटीशी बाग होती. उजव्या बाजूला पाण्याचा नळ आणि छोटासा हौद होता, तर डाव्या बाजूला लहानशी खोली होती, ती नोकरवर्गासाठी असावी.

तिला लागूनच वाड्याचं प्रवेशद्वार. आल्या आल्या त्यावर पाटील झळकली, 'व्ही. टी. पाटील-बी. ए., एलएल.बी., वकील'. आत सोफा होता, तो सर्वांच्या बैठकी करताच होता. त्याच्यामागे माजघर, ते बायकांनी आपल्या ताब्यात घेतलं. त्याच्या शेजारीच छोटीशी खोली होती. ती कोठी म्हणून वापरली जायची. माजघराच्या मागल्या जागेत देवाची स्थापना केली, तर त्याच्या मागील जागेत जिन्याजवळ स्वयंपाक घर. समोर ऐसपैस चौक, पाण्याचा नळ आणि त्याच्यामागे न्हाणीघर, संडास.

पहिल्या मजल्यावर समोर मामांनी आपलं ऑफिस थाटलं, तर तिथंच एका कपाटाचा आडोसा करून कारकुनाची बैठक करण्यात आली. आतल्या बाजूला माजघराच्याही मागे जागा होती, ती आम्हा मुलांसाठी ठरली. त्याच्यासमोर पत्र्याची गच्ची होती. सर्वात वरच्या मजल्यावर मागच्या जागेत मामांनी आपलं शय्याघर थाटलं आणि तिच्या जवळच्या जागेत खास बैठकीची सजावट करण्यात आली. समोर मोठी गच्ची होती. तिथं मामा-आक्का सायंकाळी हवेला बसत.

अशी घराची शिस्तवार मांडणी झाली खरी! शेजारी मामांना कुजबुजू लागले, 'कशाला घेतलीत ही जागा? वाडा बाधिक आहे. इंजिनियर वायंगणकर इथं रहायला आले, तोच त्यांचा अंत झाला'.

मामांचा असल्या गोष्टीवर विश्वास नव्हता. जन्माला येणारा हरेक माणूस मरणारच. त्यानं केव्हा मरावं, हे त्याच्या शरीर धर्मावर अवलंबून असतं. त्याचा जागेशी संबंध लावणं चुकीचं आहे.

तरी आमची आजी जेव्हा लगेच गेली, तेव्हा लोकांनी ऐकवलंच, 'आला पडताळा? आल्या आल्या आजी गेल्या'.

मामा हसले. 'त्या शनवारात असतानाच आजारी होत्या. डॉक्टरांच्या औषधाला कंटाळल्या होत्या'. म्हणायच्या, 'आता काय मी ह्यातनं बरी होत नाही. देवा, सोडव रे मला ह्यातनं'.

आजीची ती हाक देवानं शुक्रवारात आल्यावर ऐकली. त्यांची सोडवणूक केली.

यावर काय बोलणार शेजारी? त्यांना हळूहळू दिसू लागलं, मामा शुक्रवारात आले आणि त्यांची भरभराट सुरू झाली. आल्या आल्या मामांच्याकडे एक गाजलेली खुनाची केस आली. सुनावणीच्या वेळी कोर्टात माणसांची ही गर्दी! ती कोर्टात मामांनी जिंकली. मग काय, Nothing Succeed like Success या मामांचा बोलबाला साऱ्या शहरात झाला. तेव्हा घरमालक वायंगणकर मामांना म्हणाले, 'तुम्ही आमचा वाडा भाड्यानं घेतलात, माझ्या मुलाची गाडी शेजारी गॅरेजमध्ये पडून आहे तीही घेऊन हाका ना'.

त्यांनी किंमतीचा प्रश्नच काढला नाही. आपल्या मुलाची 'फोर्ड' लायक माणसाकडे जावी या हेतूनं. त्यांनी नाममात्र किंमतीला मामांना विकली. आता गाडी म्हटल्यावर तिची देखभाल आलीच. त्याकरिता मामांनी एक ड्रायव्हर ठेवला आणि स्वतःही ड्रायव्हिंग शिकले.

तेव्हापासून मामा स्वतःच्या गाडीनं कोर्टात जाऊ-येऊ लागले. माझ्या मते, सुटाबुटात मालकीच्या गाडीनं कोर्टात येणारे-जाणारे मामा हे कोल्हापुरातले पहिले वकील होते. अशा तऱ्हेनं मामांचा वकिलीचा जम चांगलाच बसला. अशिलांची त्यांच्याकडे रीघ लागली. कोल्हापुरातील ते एक नामवंत वकील म्हणून ओळखले जाऊ लागले.

छत्रपती राजाराम महाराजांच्या कानावर मामांचा बोलबाला गेला. त्यांनाही बरं वाटलं, एक मराठा वकील नव्यानं कोल्हापुरात स्थायिक होतो आहे. त्यांनी मामांची चौकशी केली, तेव्हा त्यांना कळलं की, व्ही. टी. पाटील हे क्षात्रजगद्‌गुरूंचे जावई होत. मग काय,

महाराजांची मर्जीच बसली त्यांच्यावर. त्यांनी जगद्गुरूंना सांगून मामांना नव्या राजवाड्यावर बोलावून घेतलं आणि त्यांची करिअर पाहून त्यांना आपल्या वाड्यावर चांगल्या पगाराची नोकरीही देऊ केली. पण मामांनी ती विनम्रपणे नाकारली. ते आदराने म्हणाले, 'महाराज, आपली कृपा आहे हीच मला पुरेशी आहे. आयुष्यात नोकरी करायची नाही' असं मी ठरवलंय. वकिलीही फार दिवस करणार नाही. सामाजिक कार्याला वाहून घेण्याचा माझा विचार आहे'.

याचा प्रत्ययही लगेच आला. वकिली चांगली चालली. पैसाही हातात खेळू लागला. मग त्यांना स्वस्थ कसं बसवणार? कोल्हापूर नगरपालिकेच्या निवडणुका जाहीर होताच मामांनी उमेदवारीचा अर्ज भरला.

मामांचा मित्रपरिवार होताच दांडगा. तोही कामाला लागला. घराचं रूपांतर निवडणुकीच्या कार्यालयात झालं. प्रचारमोहीम जारीनं सुरू झाली. त्यांचे प्रतिस्पर्धी होते वसंतराव बागल. बागल कुटुंब हे तेव्हा कोल्हापुरातील एक प्रतिष्ठित कुटुंब होतं. वसंतरावांचे वडील खंडेराव बागल यांचं 'हंटर' नावाचं स्वतःचं वृत्तपत्र होतं. त्यांचे वडीलबंधू माधवराव बागल हे कोल्हापुरात नामवंत चित्रकार म्हणून प्रसिद्ध होते. शिवाय, तेव्हाच्या राजकारणातही ते उतरले होते. निरनिराळ्या नियतकालिकांतून ते कथा-लेखन करीत. तरी लेखणीपेक्षा त्यांची वाणी अधिक प्रभावी होती. तेही आपल्या भावाचा प्रचार करू लागले. कोल्हापुरातील महालक्ष्मी मंदिरातला रामाचा पार आणि गंगावेशीत त्यांची भाषणे ऐकायला शेकडो लोक जमत.

लोकही कुजबुजू लागले, व्ही. टी. पाटील काय किंवा वसंतराव बागल काय, दोघेही तुल्यबळ आहेत. कोण जिंकणार, कोण हरणार यावर भाकितं सुरू झाली. निवडणूक संपताच एक दिवस निकाल जाहीर झाला. मामा बहुमताने विजयी झाले. मामांचा सार्वजनिक जीवनात हा पहिला प्रवेश! तो आला, त्यानं पाहिलं आणि त्यानं जिंकलं. या स्वरूपाचाच नव्हता का? मामांच्या सार्वजनिक जीवनाची ही विजयी सलामी होती. १९३० ते १९३२ मामा कोल्हापूर नगरपालिकेचे लोकनियुक्त सभासद होते. त्यानंतर त्यांनी १९३३ ते १९३८ ही पाच वर्षं नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून भूषवली.

मामांनी कॉलेजात असताना नाटकातही काम केलं होतं. ते नाट्यक्षेत्र मामा विसरले नव्हते. याचाही अनुभव आला तो किती अनपेक्षितपणे. एके दिवशी रात्री मी अभ्यासाला म्हणून पुस्तिकाचं पान उघडलं, तोच तबला-पेटीच्या स्वरात ऐकू आलं, 'नमन नटवरा - विस्मय कारा'. मग काय, आमचं अभ्यासात लक्ष कसं लागावं? मी त्या स्वरांच्या दिशेनं

गेलो तो शेजारच्या गल्लीत एका दारावर बोर्ड लावलेला दिसला. 'व्ही. टी. पाटील यांच्या आश्रयाखालील' ललितकुमार नाटक मंडळी'.

मला पाहताच नाटकाचे तालीम मास्तर शंकरराव पन्हाळकर बाहेर आले आणि त्यांनी मला एका खुर्चीवर बसवलं. हा मान मला मामांच्यामुळेच मिळाला होता. मी पाहिलं, एक मुलगा गात होता. 'टकमक पाही सूर्यरजनी मुख' आणि एक आंधळे तबलजी बुवासाहेब त्याला गाणं शिकवत होते. या कुमार मंडळींनी तीन नाटकं बसविली. 'मानापमान, संशय कल्लोळ आणि कुंजविहारी'. कृ. प. खाडिलकर, गो. ब. देवल आणि मामा वरेरकर अशा तीन भिन्न प्रकृतीच्या नाटककारांची तीन नाटकं मला ऐकूनच पाठ झाली.

मामा नगराध्यक्ष असल्याने त्यांना पॅलेस थिएटरात नाटकं करणाऱ्या नामवंत नाटक कंपन्यांचेही पास येत. मामांना प्रत्येक नाटकाला जायला जमायचं नाही. अशावेळी त्यांच्या पासवर मी पहिल्या रांगेत बसून अनेक नाटकं पाहिली. मा. दीनानाथ, बालगंधर्व, बापूराव पेंढारकर, बापू माने यांची ही अनेक नाटकं पाहिली. त्यांचे संस्कार माझ्यावर झाले आणि त्या भरात मीही तीन नाटकं लिहिली. 'पैसे झाडाला लागतात, दसरा उजाडला आणि पाहुणा आला रे आला' या नाटकांच्या प्रयोगाकरिता मी पार इंदौरपर्यंत दौरा केला, पण दौऱ्याकरिता होणारी धावपळ मला मानवणारी नव्हती म्हणून मी चित्रकथा-लेखनावर लक्ष केंद्रित केलं. सिनेमाक्षेत्रातही मी स्पृहणीय यश मिळवू शकलो. याचं श्रेय मी मामांनाच देतो.

मामांचा विशेष हा की, ते कोणत्याही क्षेत्रात जावोत, त्यांच्या पाऊलखुणा त्यात उमटलेल्या दिसतील. मामा कोल्हापूर नगरपालिकेचे अध्यक्ष होते त्या काळातील त्यांच्या कार्याच्या अक्षरखुणा म्हणजे त्यांनी फुलवलेल्या सार्वजनिक बागा. कोल्हापुरात तेव्हा टाऊन हॉल ही एकच सार्वजनिक बाग होती. मामांनी तिच्या जोडीलाच गंगावेशीत दुसरी बाग फुलवली. हरेक वॉर्डात एखादी बाग फुलवण्याचा त्यांचा मनोदय होता. आज सर्रास ऐकू येणारे 'पर्यावरण प्रदूषण' हे शब्द तेव्हा कोणाला माहीतही नव्हते. तरी मामा त्याबद्दल अत्यंत जागरूक होते. स्वतःच निसर्गप्रेमी असल्याने कोल्हापुरात त्यांनी अनेक बागा फुलवल्या. अनेकांच्या आखणी केल्या. त्या आज फुला-फळांनी डवरल्या आहेत. मला वाटतं हीच मामांची कोल्हापुरातील चिरंतन स्मारकं होत.

**७) छत्रपतींचा पाहुणचार - झुणका भाकर!**

तसं छत्रपती राजाराम महाराजांचं दर्शन आम्हाला रोज घडत होतं. रोज ते नेमाने सकाळी जुन्या राजवाड्यातील भवानी मातेच्या दर्शनाला यायचे-जायचे. दोन्ही वेळेला

कमानीवरल्या माथ्यावर नौबत झडायची. ती ऐकूनही आम्हाला कळायचं-महाराज आले, महाराज गेले.

नवरात्रांत तर रोज भवानी मंडपात कसले ना कसले कार्यक्रम असायचे. महाराज त्यावेळी अगत्यपूर्वक हजर असत. रोज सकाळी दांड-पट्याचा खेळ व्हायचा. तो खेळ खेळता एका झटक्यात समोरच्या बकऱ्याचं मुडकं उडवण्याचा खेळ पहायला तर अतोनात गर्दी व्हायची. भाव तसा देव म्हणतात, ते अगदी खरं! भवानी माता हे मराठ्यांचं दैवत असल्याने देवीला मांसाहारी नैवेद्य असायचा, तर शेजारीच कोल्हापूरची आदिमाता महालक्ष्मी हिला ब्राह्मणांची पूजा-अर्चा असल्याने तिला पुरणपोळीचा नैवेद्य लागतो.

महाराजांचं दर्शन आम्हाला शिलंगणाच्या वेळीही व्हायचं. जुन्या राजवाड्यातून शिलंगणाचा लवाजमा निघायचा, त्यात हत्ती काय, घोडे काय, उंट काय. ही साऱ्यांची मिरवणूक निघायची त्यावेळी महाराज चांदीच्या अंबारीत बसलेले आम्हाला दिसायचे. दसरा चौकात ती पोहोचली की, बंदुकांच्या फैरीत सोनं लुटायचा कार्यक्रम व्हायचा. त्यावेळी चौकासमोरच राव पी. सी. पाटील यांचा बंगला होता. तिथून हा कार्यक्रम आम्ही पाहात असू.

मराठ्यांचा हा राजा असा रोज दर्शन देत असला तरी कोणाच्या घरी जाताना दिसला नाही. गरज तरी काय? महाराजांच्या दर्शनाकरिता नव्या राजवाड्यावर सर्वांना मुक्तद्वार होतं. महाराजांचे सरदार-दरकदार त्यावेळी नेमानं हजेरी लावायचे. आमचे मामाही त्यावेळी अगत्यपूर्वक महाराजांचं दर्शन घेतं. आता तर काय, ते नगराध्यक्ष होते. राजधानीचे पहिले नागरिक म्हणून त्यांचा मान पहिला होता.

एकेदिवशी मामांनी आम्हाला आश्चर्याचा धक्काच दिला. सांगत आले, 'छत्रपती परवा दिवशी आपल्या घराला भेट देणार आहेत' मामा नगराध्यक्ष झाल्याने महाराजांनी त्यांना ऐकवलं होतं, 'पाव्हणं, एकदा दाखवा तरी आम्हाला तुमचा वाडा'.

'वाडा कसला महाराज?' मामा विनयानं उत्तरले होते. 'आहे आपलं साधं घर'.

'साध्या घरातून असाधारण माणसं निर्माण होतात. आमचे पिताजी शिकारीला गेल्यावर शेतकऱ्यांच्या घरची चटणी-भाकरी चवीनं खात'!

मामा काय बोलणार यावर? शाहू महाराज जंगलात गेल्यावर भुकेला कोंडा म्हणून चटणी भाकरी खात होते, तर राजाराम महाराज आपल्या राजधानीत नगराध्यक्षांच्या घरी जेवायला येण्याची इच्छा व्यक्त करीत होते. बाकी गरीब काय किंवा अमीर काय, राजाला

प्रजा सारखीच.

छत्रपतींनी एवढी आत्मीयता व्यक्त केल्यावर काय? मामांना तो आपला सन्मान वाटला. आक्का तर काय, अन्नपूर्णाच होत्या. त्यांनी जेवणाचे अनेक प्रकार केले. घडीच्या चपात्या, गोळ्याचा पुलावा, खिमा, तांबडा रस्सा, पांढरा रस्सा हे तर कोल्हापूरचं खास वैशिष्ट्य! पंचपक्वानांचा घमघमाट घरभर दरवळला. छत्रपती येणार म्हणजे ते एकटे येणार थोडेच! बरोबर चार-पाच निवडक मंडळीही होती. त्यांच्या जेवणाची व्यवस्था तिसऱ्या मजल्यावरच टेबल-खुर्च्या मांडून केली. टेबलावर सफेद चादर, मध्ये फ्लॉवर पॉट, बाजूला फळांचं डिश, महाराज आले. स्थानापन्न झाले. त्यांना वाढण्याची कामगिरी मामांनी नगरपालिकेचे नोकर सखाराम व गोविंद या दोन शिपायांवर सोपवली. त्यांनी सारी ताटं मांडली. छत्रपती जेवायला बसले. जेवणाचा घमघमाटच तोंडाला पाणी सुटल्यासारखा होता. सारी मंडळी छत्रपतींनी घास घेण्याची वाट पाहू लागली. त्याशिवाय आपण कसं सुरू करायचं? मामा छत्रपतींना म्हणाले, 'महाराज, करा सुरुवात'.

महाराजांनी ताटावर नजर टाकली आणि ते म्हणाले, 'हे काय पाव्हणं? असल्या जेवणाचा कंटाळा आला म्हणून आम्ही आलोय झुणका-भाकर खायला'.

झालं छत्रपतींची इच्छा. साऱ्याजणांनी आपापले हात आवरले. त्यासारखी नोकरांनी मांडलेली ताटं उचलली आणि खाली आणली. आक्कांनी ताबडतोब चुलीवर तवा चढवून भाकऱ्या करायला घेतल्या. काकींनी स्टोव्ह पेटवून झुणका गरगटायला घेतला. आक्का भाकरी करण्यात तरबेज होत्या. त्यांनी भाकऱ्या भाजल्या तरी साऱ्या मंडळींना पुरेशा भाकऱ्या करायला वेळ कुठं होता? म्हणून आक्कांनी मागल्या दारानं आम्हा मुलांना गल्लीत पाठवलं आणि घराघरातल्या ताज्या भाकऱ्या आणायला सांगितलं. गल्लीत जाऊन आम्ही भाकऱ्या मागायचा अवकाश. आपल्या भाकऱ्या छत्रपतींना वाढल्या जाणार या कल्पनेनंच हरकून सर्वांनी चुलीवरल्या अवघ्या भाकऱ्या देऊ केल्या.

नव्यानं नवी ताटं मांडण्यात आली. झुणका-भाकर ताटात दिसल्यावर सर्वांची जेवणं सुरू झाली. महाराजांना आक्कांच्या भाकऱ्या फार आवडल्या. एवढ्याशा थोडक्या वेळात एवढ्या भाकऱ्या कुणी बनविल्या? म्हणून महाराजांनी खास चौकशी केली. मामांनी आक्कांचं नाव सांगून आक्कांना वरती बोलावून घेतलं. आक्कांनी महाराजांना वाकून नमस्कार केला. महाराजांनी तारीफ करताच आक्कांच्या अंगावर मूठभर मांस चढलं! गल्लीतील लोकांनाही केवढा आनंद झाला. आपल्या भाकऱ्या छत्रपतींनी खाल्ल्या. मामांच्याबद्दलही लोकांना अभिमान वाटू लागला. मामांनाही पटलं, राजाराम महाराज हे

शाहू महाराजांचे वारस शोभतात खरे. त्यांना ठाऊक होतं, वाड्यावर रोज दोन जेवणं होत असतात. एक खाशी आणि दुसरी खर्ची- त्याचा प्रत्यय आज आम्हाला पहायला मिळाला.

जेवणं झाली. पानसुपारी होताच छत्रपती जायला उठले. त्यांना पहायला दारात लोकांची तोबा गर्दी उसळली होती. त्यातून वाट काढीत छत्रपती आपल्या घोडागाडीनं गेले. आम्ही मुलं त्याचीच वाट पहात होतो. महाराज जाताच आम्ही मुलांनी जेवणावर असा ताव मारला म्हणता-दोन दिवस आम्हाला ते जेवण आम्ही आवडीनं खाल्लं. महाराजांच्या निमित्तानं आमची दसरा-दिवाळी साजरी झाली.

**८. इलाखा पंचायतीचे अध्यक्ष :**

कोल्हापूरचे नगराध्यक्ष झाल्यापासून मामांच्या यशाचा वारू जो दौडत सुटला, त्याला प्रतिबंध असा कुठंच झाला नाही. अश्वमेधाच्या घोड्याप्रमाणे तो अष्टदिशांना दौडत सुटला. दिग्विजयाच्या या यशाने प्रेरित होऊन त्यांनी इलाखा पंचायतीची निवडणूक लढवण्याचंही ठरवलं. ठरवल्याप्रमाणे निवडून येऊन ते इलाखा पंचायतीचे अध्यक्षही झाले. साहजिकच, त्यांनी जिल्ह्याच्या हरेक भागाला भेटी देऊन, त्या त्या भागांची पाहणी केली. त्याची सुरुवात पन्हाळ्यापासून झाली.

उन्हाळ्याच्या सुटीत शाळा बंद असायच्या. अशावेळी मामा सहकुटुंब पन्हाळ्याला भेटी देत. त्यावेळी आमचा मुक्काम एखाद्या शाळेत असे. मामांचं निसर्गप्रेम आम्हालाही प्रेरणा देई. मी सकाळी उठून चहापाणी झालं की, बाहेर पडायचो आणि पायी पन्हाळ्याच्या हरेक स्पॉटवर जायचो. कधी तीन दरवाजा, बाजूची अंधारबाव, तर कधी पुसाटीचा बुरूज, वाघ दरवाजा, एजंटसाहेबांचा बंगला. या वास्तू मला इतिहासकाळात घेऊन जात. शिवरायांच्या पदस्पर्शानं पुनीत झालेला पन्हाळा, संभाजी महाराजांच्या वास्तव्यानं समृद्ध झालेला पन्हाळा, ताराराणीनं आपली राजधानी केलेला पन्हाळा. पन्हाळ्याची अशी विविधं रूपे मला दिसायची.

आज पन्हाळा एक हिल स्टेशन झाले आहे. म्हणून अनेकांनी तिथं आपले बंगले उभे केलेत. इतिहासप्रेमी भालजी पेंढारकर, चित्रपती व्ही. शांताराम, कोल्हापूरला येऊन मारवाड्याचे मराठा झालेले मदन मोहन लोहिया यांचे बंगले तिथे आहेत. तरी पूर्वेच्या उतरत्या तटावर जी बंगली मामांनी बांधली, तिची सर एकाला नाही. पन्हाळ्याचं ते एक प्रेक्षणीय स्थळ होऊन राहिलं आहे. शाळेत रहात असताना मला भावला तो नायकिणीचा सज्जा! असं सांगतात की, तिथं नर्तकी नाचायची, तो तिचा नाच एजंटसाहेबांच्या बंगल्यावरूनही दिसत असे. पन्हाळ्याच्या प्रवेशालाच रस्त्याच्या डाव्या बाजूला साधूबाबाचं

तळं आहे. त्याचप्रमाणे वरतीही मध्यावर एक छोटासा तलाव आहे. मी अनेकदा त्या तलावात पोहलो आहे. नंतर दिग्दर्शक झाल्यावर अनेक चित्रपटांचं चित्रणही केलं आहे.

पन्हाळ्याच्या पूर्वेला वाडी रत्नागिरी नावाचा जोतिबाचा डोंगर आहे. त्या देवस्थानावरही आम्ही अनेकदा मुक्काम केला आहे. देवस्थानाजवळच्या माचीवर आमचा मुक्काम असायचा. जोतिबा हे आमचं कुलदैवत असल्याने आमचे एक पारंपरिक गुरव तिथं आहेत. त्यांच्याकडे सोबत आणलेला शिधा दिला की, ते पुरणपोळीचा नैवेद्य तयार करायचे. तो देवाला दाखवून, दर्शन घेऊन आम्ही परतायचो. बेनाडीला आमच्या वाड्यात त्यावेळी सासणकाठी उभी करायची. चैत्राच्या जत्रेत ती दरवर्षी जोतिबाला आणली जायची आणि 'जोतिबाच्या नावानं चांगभलं' म्हणत ती देवाच्या दारातही नाचवली जायची.

समोर उतारावरच यमाईचं देऊळ आहे. त्याच्या पाठच्या भिंतीवर एक चित्रं होतं. बहिणीला लाथ मारल्याने भावाच्या पायात किडे पडतात, ते देवीला पिठाचा नैवेद्य दाखवला की ती पाय तंदुरुस्त करते. बहिणीचा आदर करण्याची शिकवण, यात्रेकरूंना नकळत दिली जात असे.

'जोतिबाचा नवस' हा चित्रपट मी लिहिला. त्यावेळी संवादाच्या स्क्रीप्टमध्ये मार्जिनमध्ये कोणता शॉट कसा घ्यावा? कॅमेरा कुठं ठेवावा? अशा सूचनाही मी लिहिल्या होत्या. त्या वाचून दिग्दर्शक कमलाकर तोरणे मला विचारायचा, 'एवढ्या बारीक तपशीलवार सूचना तुम्ही कशा काय देऊ शकता?'

मी त्याला सांगायचा, 'कारण एकच, जोतिबाच्या डोंगराची कथा मला खडान्‌खडा माहिती आहे. मी त्या डोंगरावर काही दिवस राहिलो आहे. त्याचप्रमाणे पन्हाळाही मी सकाळ-संध्याकाळ पायी तुडवला आहे. असा तसा नाही, मामांच्या साक्षीनं, त्यांच्या निसर्गप्रेमाच्या वेडानं'!

पन्हाळा, जोतिबाप्रमाणेच आमचा मुक्काम राधानगरीलाही असायचा. प्रथम मला त्या राधानगरी या नावाबद्दल कुतूहल वाटायचं. राधेचा आणि या गावाचा संबंध काय? तेव्हा मामांनी सांगितले की, जयसिंगपूरप्रमाणे ही नगरी प्रथम राजर्षी शाहू महाराजांनी वसवली असून त्यांनी आपल्या लाडक्या लेकीचं आक्कासाहेब महाराज यांचे नाव या गावाला दिलं आहे. संस्थांनी राजवटीमुळे असेल, राधानगरीच का, कोल्हापुरातही नव्या वस्त्या राजपुरुषांच्या नावांनी वसवल्या आहेत. लक्ष्मीपुरी, शाहूपुरी, राजारामपुरी, ताराबाई पार्क-यात विशेष काही नाही. पुण्याच्या जवळची काही गावांची नाव पाहा ना! संभापूर, शिवापूर ही छत्रपतींच्या पराक्रमाची चिरंतन स्मारकं होत.

राधानगरीतही आम्ही कित्येक दिवस राहिलो आहे. मामांच्यासह हिंडून तिथली स्थळंही पाहिली आहेत. त्यांनीच आम्हाला सांगितलं, राधानगरीचं धरण शाहू महाराजांच्या कारकीर्दीत सुरू झालं, ते पूर्ण केलं राजाराम महाराजांनी. त्या धरणामुळे जो तलाव वरच्या बाजूला तयार झाला तो लक्ष्मीतलाव या नावानं ओळखला जातो.

तलावाच्या पायथ्याशीच विद्युत निर्मितीसाठी एक पॉवर हाऊस तयार करण्यात आलं. कोल्हापुरात तेव्हा टाऊन हॉलनजीक एक पॉवर हाऊस होतंच. पण ते लहान असल्याने वीजनिर्मितीला मर्यादा होती. कधी कधी व्होल्टेज कमी-जास्त व्हायचं. त्यामुळे स्टुडिओतील चित्रणाला खंड पडायचा. राधानगरीच्या वीजपुरवठ्याने तो दूर झाला. आता तर काय, कोयनेचा वीजपुरवठा सुरू झाला आहे. बापट कँपवर तो घेऊन तेथून तो शहराला पुरवला जातो. त्यातही एक दोष आहेच. लोड शेडिंगच्या पद्धतीमुळे अनेकदा शहराचा वीजपुरवठा खंडित होतो. तो पूर्ववत व्हायला तासन् तास अंधारात वाट पहावी लागते. या गोष्टीचं ज्ञान मला मामांच्या सहवासात असताना झालं.

तरी मामांच्या इलाखा पंचायतीच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीतील महत्त्वाची घटना म्हणून मी सांगेन मामांनी तयार केलेला गारगोटी ते पाटगाव हा रस्ता! शिवरायांचे गुरू मौनी महाराज, त्यांचा मठ पाटगावला आहे. त्या पीठावर शाहू महाराजांनी आमचे चुलते सदाशिवराव बेनाडीकर यांना क्षात्रजगद्गुरू म्हणून नेमले. मामा त्यांच्यासह जेव्हा पाटगावला गेले तेव्हा त्यांनी पाहिलं, एवढं मोठं देवस्थान केवळ रस्ता नसल्यामुळे उपेक्षित राहिलं आहे. आधीच गारगोटी हा भाग डोंगराळ असल्याने काहीसा उपेक्षितच आहे. तेथून पाटगावला बैलगाडीनं जावं लागे. छत्रपती शिवाजी महाराजांनी पाटगावच्या मौनी महाराजांचं दर्शन घेऊन त्यांच्या आशीर्वादानं प्रेरित होऊनच दक्षिणेची मोहीम यशस्वी करून तो भाग स्वराज्यात सामील केला. अशा राष्ट्र पुरुषाच्या पदस्पर्शानं पुनीत झालेला मार्ग चांगला बांधून रोजच्या दळणवळणात आणला-आणि त्याचं विजयमार्ग असं नामांकन करून पाटगाव गारगोटीच्या रोजच्या दळणवळणात आणला. गारगोटीलाही अनेक सुधारणा करून भुदरगड तालुका मामांनी समृद्ध केला. त्यामुळे त्या भागातील जनता मामांना देवासमान मानते. मामांच्या इलाखा पंचायतीच्या कारकीर्दीतील विजयमार्ग म्हणजे मामांचं या भागातील चिरंतन स्मारकच म्हटलं पाहिजे. मामांच्याबरोबर मी अनेकदा पाटगावला गेलो आहे, तेथे राहिलो आहे. अर्थात जगद्गुरूंचे थोरले चिरंजीव रामराव हेही आमच्याबरोबर असायचे. त्यांनी मठाच्या प्रांगणातच एका बाजूला बैठी इमारत बांधून, राहण्या-जेवण्याची सोय केली आहे. मौनी महाराजांच्या मठासमोरच्या ऐतिहासिक वास्तूंना

बाध न आणता!

अशा तऱ्हेनं आम्ही मामांच्यासह रहात असतानाच एक घटना घडून आली. मामांनी साईक्स एक्स्टेशनवर आपल्या मालकीचा नवा बंगला बांधायला सुरुवात केली होती. तो पूर्ण झाला. मामांनी या बंगल्याचं नाव-सहसा आपल्या आई-वडिलांची नाव देण्याची प्रथा आहे-'मातृस्मृती', 'पितृछाया, आशीर्वाद' अशा स्वरूपाची. परंतु मामांना आपल्या आईवडिलांचा सहवास फारसा न लाभल्याने असेल त्यांनी आपल्या नव्या वास्तूला नाव दिलं 'सरोज'.

आमच्या आक्काचं लग्नानंतरच नाव-लग्नाआधी त्या कमळाबाई म्हणून ओळखल्या जात होत्या. (त्या नावाचीही स्मृती मामांनी आपल्या 'ताराराणी' परिसरातला कॉलेजला 'कमला कॉलेज' नाव देऊन आपल्या पत्नीप्रेमाची स्मृती कायम राखली आहे). 'सरोज'च्या वास्तूपूजेलाही आम्ही गेलो होतो, पण....

आण्णांनी आपल्या मुलांकरिता रविवार पेठेत एक लहानसं घर भाड्यानं घेतलं. एव्हाना आम्ही कॉलेजात जात होतो. कॉलेज तेथून अगदी जवळच होतं. एकाच गोष्टीचं वैषम्य वाटलं. मामांच्या पालकत्वाला आम्ही दुरावलो. तरी मामांच्या बंगल्यावर आमचं येणं-जाणं होतंच. रक्ताची, मायेची नाती तुटता तुटत नाहीत हेच खरं!

भाड्याच्या घरात राहिल्याने असेल, मामांच्याप्रमाणे आम्हीही घरे सारखी बदलत गेलो. रविवार पेठेतून शुक्रवार पेठेत, जैन मठाजवळ असे करत आम्ही उत्तरेश्वरावरील नारू मामांच्या घरात रहायला आलो. नारू मामा हे तेव्हा राजाराम महाराजांच्या मर्जीतले होते. त्यांनी नवे घर बांधल्याने आपले जुने घर आम्हास भाड्यानं दिलं होतं. ते घर मला अनेक अर्थांनी लाभदायक ठरलं!

**९. चहाच्या कपातील वादळ :**

मी उत्तरेश्वरावर रहात असताना एके दिवशी मला मामांचा निरोप आला, 'मला ताबडतोब भेट'.

मला कळेना, एवढं कसलं तातडीचं काम काढलंय मामांनी? मी त्यांना भेटलो, तेव्हा ते म्हणाले, 'काय आरंभलंयस काय तू हे?'

मी ओळखलं, माझं प्रेमप्रकरण त्यांच्या कानावर गेलंय. मी प्रांजळपणे कबूल केलं, मला एक मुलगी आवडलीय आणि मी तिच्याशी लग्न करावं म्हणतो. त्याचं असं झालं होतं. मी एका शाळेच्या व्याख्यान स्पर्धेचा परीक्षक होतो. त्या स्पर्धेत मुलींच्या

शाळेतील सुमन शिंदे नावाची मुलगी प्रथम आली होती. मी तिचा ठावठिकाणा शोधला आणि तिला घरी गाठून तिच्यासमोर माझ्या प्रेमाचा प्रस्ताव मांडला. तिनंही तो मान्य केला. साहजिकच, आमचं एकत्र भेटणं, हिंडणं, फिरणं सुरू झालं. ते मामांच्या कानावर गेलं असावं. मी प्रांजळपणे त्यांना सांगून टाकलं, मी सुमन शिंदेशी लग्न करावं म्हणतो'.

'तुला ठाऊक आहे ना?' मामांनी मला विचारले, 'काकी तुला दत्तक घेऊ इच्छितेय'.

'माझी त्याला ना नाही'.

'पण त्यांची एक अट आहे'.

मी ओळखलं, काकींना एका दगडात दोन पक्षी मारायचे होते. एक मला दत्तक घेणं आणि दुसरं-आपल्या पुतणीला सून करून घेणं. त्यांची पुतणी मला अनुरूप नव्हती असं नाही. ती दिसायला चांगलीच होती. गोरीपान! पण देहाच्या सौंदर्यापेक्षा मला अभिप्रेत होतं, मनाचं-बुद्धीचं सौंदर्य. काकीच्या पुतणीचं शिक्षण काही झालं नव्हतं. सुमन मोठी सुशिक्षित होती अशातला भाग नाही. पण ती वर्गात स्कॉलर म्हणून ओळखली जात होती. लग्नानंतरही ती कॉलेजात जाऊन पदवीधर होण्यासारखी होती. ही सारी माहिती मी मामांच्यासमोर मांडली.

'तुझं ठीक आहे', मामा म्हणाले, 'तू प्रेमाचा विचार करतोस. तुझे अण्णा विचार करतात काकींच्या उत्पन्नाचा!' त्यांची दहा-बारा एकर जमीन होती. मनात आणलं तर बसून खाता आलं असतं. पण त्याकरता एका मुलीशी प्रतारणा करणं मला पसंत नव्हतं.

मामांचाही तसा सल्ला नव्हता. ते निर्णायक स्वरात म्हणाले, 'माझं ऐकणार'?

'मी तुमच्या शब्दाबाहेर नाही'.

'आज तू ज्युनियर बी.ए.ला आहेस. लग्नाची घाई करशील तर आण्णांचा राग तुला ठाऊक आहे'.

'त्यांनाही ठाऊक होईल मुलाचं प्रेम'.

'तुला घराबाहेर काढायलाही ते कमी करणार नाहीत. म्हणून सांगतो, तू अगोदर ग्रॅज्युएट हो आणि नंतर लग्न कर. आण्णांनी घराबाहेर काढलं तरी कुठंही पोटापुरतं मिळवू शकशील'.

मामांचा सल्ला मला पटला. मी त्यांना कबूल केलं. ग्रॅज्युएट झाल्याशिवाय मी

लग्न करणार नाही. आण्णांच्या कानावर हे गेलं तेव्हा त्यांनाही हायसं वाटलं. त्यांना वाटलं हा काय ग्रॅज्युएट होतोय? एफ.वाय.ला कोणी नापास होत नाही, त्याकरिता दोन वर्ष घेतली यानं. इंटरलाही एकदा वन्समोअर घेऊन पास झाला. बी. ए. ला किती 'वन्समोअर' घेणार आहे देव जाणे!

सुमनला वडील नव्हते. कोल्हापुरात ॲडव्होकेट दाभोळकर यांच्यासह पहिल्यांदा जे मराठा वकील झाले त्यात सुमनचे वडील पांडुरंग शिंदे हे वकील होते. पण त्यांचा अकाली अंत झाल्याने सुमन पोरकी झाली होती. तिचे आजोबा तिचा सांभाळ करीत होते. घरची एकदम गरिबीची होती. आजोबांनी अनेकदा पाहिलं होतं, लग्नाच्या वाटेवर कितीतरी प्रेमप्रकरणं बारगळतात तसे नातीचं झालं तर?

पण ती पाळी माझ्यावर आली नाही. सुमनच्या पायगुणानं असेल, मी पहिल्या वर्षीच सीनियर बी. ए. पास झालो. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला. माझा लग्नाचा निर्णय कायम आहे हे पाहून आण्णा मला म्हणाले, 'आपण शहाणे झालात. मला तोंड दाखवू नकोस'.

हे सारं मा. विनायक यांच्या कानावर गेलं-ते शाळेत माझे शिक्षक होते. तेव्हा त्यांनीच पुढाकार घेऊन आमचं लग्न नरसोबाच्या वाडीला जाऊन केलं. वाडीला जाण्याचा हेतू एकच होता-क्षेत्रात मुहूर्ताची गरज नसते. हंस कंपनीचे मॅनेजर बाबासाहेब पाटील म्हणून होते. त्यांना तर काय, हरके चित्रपटात एक लग्न लागतंच. त्यामुळे लग्नाची व्यवस्था करणं हा त्यांचा हातचा मळ होता. कंपनीच्या स्टेशन वॅगननं आम्ही वाडीला गेलो आणि मी चतुर्भुज होऊन आलो. लग्नाला माझे बंधू जयसिंगराव, बेनाडीचे आनंदराव तेही अगत्यपूर्वक हजर होते. लग्नाहून परतताना मुसळधार पाऊस सुरू झाला. कोणीतरी म्हणालं, 'हा शुभ शकून आहे'.

माझ्यापुढं प्रश्न उभा राहिला, आता जायचं कुठं? आक्कांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही मामांच्या बंगल्यावर गेलो. आक्का-मामा आमची वाटच पहात होते. आक्कांनी आम्हाला आपल्या देवघरात नेलं, सुमनच्या ओटीतला नारळ आक्कांनी देवासमोर ठेवला आणि सुमनचे हात पाहून आक्का म्हणाल्या, 'पाटलाची सून बाई तू. मुंड्या हातानं कशी येतेस?'

असं म्हणून आक्कांनी आपल्या हातातले सोन्याचे बिलवर काढून सुमनच्या हातात चढवलं आणि सुमनला सालंकृत केली.

आम्ही माडीवरल्या हॉलवर आलो. चहा-पाणी होता होता मामा म्हणाले, 'मी तुम्हाला इथंच ठेवून घेतलं असतं, पण तुझा आण्णा माझ्या नावानं ओरडले-मामाचीच फूस आहे लेकाला'.

काय बोलणार मी तरी? कुठं जायचं मी ठरवलं नव्हतं. मामाच म्हणाले, 'असं कर, चार दिवस तू विनायककडेच रहा. तोवर सगळं काही शांत होईल. चहाच्या कपातलं वादळ-किती दिवस टिकणार आहे?'

त्याप्रमाणंच झालं. मी विनायकांच्या घरी सुमनसह प्रवेश केला. त्यांचा उंबरठा ओलांडताना मला कलपनाही नव्हती की, मी सिनेमासृष्टीत प्रवेश करीत आहे. बरोबर चार दिवसांनी'

विनायकराव रोजच्या शूटिंगकरिता स्टुडिओत गेले होते. मी आणि सुमन माडीवर बोलत बसलो असताना खालून सौ. सुशिलावैनींचा निरोप आला. 'खाली या. तुम्हाला भेटायला तुमचे तात्या आलेत'.

मी खाली जाऊन पाहिलं-तात्या दाराजवळच्याच झोपाळ्यावर बसले होते. मी त्यांना वाकून नमस्कार करताच ते मला म्हणाले, 'तू लग्न केलंस म्हणे'.

'हो'.

'दाखव तरी मला माझी सून'.

मी सुमनला खाली बोलावून घेतलं. आल्याबरोबर तिनंही तात्यांना वाकून नमस्कार केला. तिला पाहून तात्या म्हणाले, 'छान आहे की! उगंच का तुझा आंण्णा ओरडतोय? चल बघू घरला'.

'आण्णांनी सांगितलंय, मला तोंड दाखवू नकोस'.

'मी सांगून आलोय त्याला. काय काम आहे तुझं इथं? तू बेनाडीला जा कसा. घरची शेतीवाडी बघ'.

नोकराला पाठवून वहिनींनी टांगा आणवला. त्यात बसून आम्ही शुक्रवारातल्या उत्तरेश्वरावर आलो. बघतो तो आण्णा घरात दिसले नाहीत. त्यांचा कोट आणि कोशा पटकाही रोजच्या खुंटीला नव्हता. ते नेहमी प्रवेशघरातल्या खोलीतच रहात होते. तात्यांनी हाक मारली, 'बायक्का, ही बघ तुझी सून घेऊन आलोय मी'.

मी आणि सुमननं जोडीनं आईला नमस्कार केला. त्याबरोबर तिनं आम्हा उभयतांना

जवळ घेतलं. मात्र-एकदम रडायला लागली. मीही रडू लागलो. मला प्रथम प्रत्यय आला. माणूस दुःखानंच रडतो असं नाही, तो आनंदानंही रडतो. मामांनी सांगितल्याप्रमाणे झालं. चहाच्या कपातील वादळ शांत झालं.

त्याच आठवड्यात काकीनीही आपला हेका अंमलात आणला. त्यांनी आपल्या दुसऱ्या पुतणीचं माझे बंधू जयसिंगशी लग्न करून त्याला दत्तक घेतला. लग्नाचा सोहळा आणि दत्तक विधी एकाच वेळी शाहूपुरीतील राधाकृष्ण मंदिरात पार पडले. त्याकरिता मी सहकुटुंब हजर होतो.

आक्का-मामाही अगत्यपूर्वक हजर होते.

**१०. रयत सभा :**

कोल्हापूर नगरपालिका व इलाखा पंचायत अशा संस्थांचे अध्यक्ष असताना मामांना सामाजिक जीवनात रस वाटू लागला. मला वाटतं, सार्वजनिक सेवेचीही माणसाला नशा चढत असावी. त्या नशेत मामांनी कोल्हापूरच्या सामाजिक सेवेचा जणू वसाच पत्करला. पदरचं खाऊन लष्करच्या भाकऱ्या थापटण्यासारखं हे असलं तरी ते कोणीतरी करावं लागतं हेही खरं!

सेंट्रल हेल्थ सिलेक्शन कमिटी, सिटी ॲम्ब्युलन्स को अर, डिस्ट्रीक्ट स्कूल बोर्ड, सिटी स्काऊट असोसिएशन आदी संस्थांचे अध्यक्षपदही मामांनी भूषवलं. त्यामुळेच त्यांना समाजाच्या विविध थरातील प्रश्नांची ओळख झाली आणि ते सोडवण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्या प्रयत्नात त्यांच्या ध्यानी आलं, पैशाचं पाठबळ असल्याशिवाय काही करता येत नाही. 'बोलाचीच कढी, बोलाचाच भात, जेवुनिया तृप्त कोण झाला?' या तुकाराम महाराजांच्या वचनाचा त्यांना प्रत्यय आला, पदोपदी घेतला. त्यासाठी त्यांना पहिली गरज भासली ती सर्वसामान्य लोकांना आर्थिक मदत करण्याची काहीतरी व्यवस्था झाली पाहिजे. पैशाची गरज कोणाला नसते? ती भागवताना कितीतरी गरजू सावकारी पाशात अडकले जात होते. त्यांच्या चक्रवाढ व्याजानं नादार होत होते. 'मित्रासाठी पदर मोड कर, परंतु जामिन राहू नको' या आदेशानं गरीब गरजूंना कर्ज मिळणेही कठीण होत होतं. त्याकरिता तारण द्यायचं म्हणजे दागिने काय किंवा राहतं घर काय गेल्यातच जमा होत असे. गरिबांची ही परवड थांबविण्यासाठी सर्वसामान्य लोकांना आर्थिक मदत करण्याची काहीतरी व्यवस्था झाली पाहिजे या ध्येयानं 'मराठा को-ऑपरेटिव्ह बँक' स्थापन करण्याची योजना त्यावेळी काही आखीत होते. मामांचा त्या योजनेतील सहभाग लक्षणीय आहे.

या ध्येयानं प्रेरित होऊन राजर्षी शाहू महाराजांच्या कारकीर्दीत ना. भास्करराव जाधव यांनी सुरू केलेली 'अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक' सुरू होतीच. तिलाच पूरक म्हणून 'मराठा को-ऑपरेटिव्ह बँक' सुरु झाली. मामांच्या हेही ध्यानी आलं की रोजच्या गरजेच्या वस्तू रास्त किंमतीत मिळण्याचीही सोय झाली पाहिजे. त्याकरिता 'शेतकरी सहकारी संघ' स्थापन झाला. त्या उपक्रमात मामा एक संस्थापद-सदस्य होते. हा काळ साधारणतः १९३२ ते १९४० च्या सुमारचा असावा.

दरम्यान, एक महत्त्वाची घटना घडून आली. बॅ. वि. दा. सावरकर, लोकमान्य टिळक, महात्मा गांधी यांच्या चळवळी घरोघरी पोचल्या. त्याबरोबर स्वातंत्र्याचं वारं देशभर वाहू लागलं. आजवरची सरंजामशाही जाऊन लोकशाहीचा उदय होत होता. ही लाट कोल्हापूर संस्थानावरही आदळली. काळाची ती गरजही होतीच!

मामांनी राजकारणात प्रवेश केला तो या निमित्तानं. त्याचं असं झालं. खालसा मुलखातली सुरू होणारी जबाबदार राज्यपद्धतीची मागणी करण्यासाठी कोल्हापुरातही 'प्रजा परिषद' नावाची एक संस्था स्थापन झाली. प्रजा परिषदेचे नेते होते रत्नाप्पा कुंभार आणि माधवराव बागल. त्यांनी मोठी चळवळ उभारून छत्रपतींच्या संस्थांनी सत्तेलाच आव्हान दिले. संस्थान म्हटल्यावर त्यात काही दोष असणारच. कोणत्याही राज्य संस्थेमध्ये ते असतात तसे ते कोल्हापूर संस्थानच्या राजवटीमध्येही होते. नाही म्हणणे मानभावीपणाचे ठरेल. कोल्हापूरच्या आसपासही अनेक संस्थानं होती. ती काय सारी कोल्हापुरापेक्षा निराळी होती? पण तिकडे कोणी डोकावलंही नाही. कोल्हापूर हे दक्षिणेतील एकमेव मराठा संस्थान होतं. तिथं एका मराठ्यालाच पुढं बदनाम करण्याचा प्रजा परिषदेचा डाव होता.

एक गोष्ट सूर्यप्रकाशाएवढी स्पष्ट होती. राजर्षी शाहूंच्या आणि त्यांच्या पश्चात राजाराम महाराजांच्या कारकीर्दीत दलितोद्धाराचे, सामान्य माणसाच्या अस्मितेचे आणि माणुसकीचे जे रक्षण झालं, जे समाज प्रबोधनाचे कार्य झाले, ते करायला प्रजा परिषदेच्या पुढाऱ्यांना सात जन्म घ्यावे लागले असते. आजही राजर्षींचा आदर्श राज्यकर्त्यांनी डोळ्यांसमोर ठेवण्यासारखा आहे. तो जनतेसमोर मांडून जनतेला वेळीच सावध करणे जरूर होते. त्यासाठीच मामांनी 'रयत सभा' नावाची एक संस्था स्थापन केली.

प्रजा परिषदेचे अध्वर्यू रत्नाप्पा कुंभार आणि माधवराव बागल हजारो लोकांचा मोर्चा घेऊन कोल्हापूरला येत. तो मोर्चा स्टेशनवरच अडवणे किंवा राजवाड्याच्या वाटेवर त्यावर घोडी घालून उधळणे छत्रपतींना अशक्य नव्हते. पण प्रजावत्सल राजाराम महाराजांनी ते केलं नाही. त्यांनी त्या मोर्चाचे राजवाड्यावर स्वागतच केलं आणि त्यांना प्रथम पोटभर

जेवू घालून नंतर ते त्यांच्या सामोरे गेले! महाराजांच्या या आत्मीयतेनं मोर्चाची हवाच निघून गेली. महाराजांनी सांगितलं, जबाबदार राज्यपद्धती ही लोकशाहीची पहिली गरज आहे. आज-उद्या ती आपोआप येणार आहे. त्यासाठी दक्षिणेतील एकमेव मराठा संस्थान बदनाम करण्याची जरूरी काय?

'हे हेरूनच उद्या'ची नवी लोकशाही कशी असावी याचा प्रयोग आपल्या संस्थानात शाहू महाराजांनी सुरू केला होता. राजाराम महाराजांनी तो तसाच पुढे चालवला होता. पण हे सारं बहुधा दृष्टिआड करून रयत सभेचे प्रवर्तक म्हणून-मामांना छत्रपतींचे हुजरे म्हणून हिणवण्याचा प्रयत्न तथाकथित देशभक्तांनी आरंभला.

मामांना त्यात कमीपणा वाटला नाही. त्यांनाच का, अवघ्या लोकांना ठाऊक आहे. देशभर मोगली अंमल चालू असताना स्वराज्याची संकल्पना प्रथम मांडली ती शिवछत्रपती शिवाजी महाराज यांनी! ते स्थापन केल्यावर त्यांनी त्याला शिवशाही किंवा मराठशाही असं नाव दिलं नाही. त्यांनी नाव दिलं 'हिंदवी स्वराज्य'! वास्तविक, त्यावेळी देशात अनेक राज्यं होती आणि ती त्या त्या राज्यकर्त्यांच्या नावानं ओळखली जात होती. मोगलशाही, कुतुबशाही, आदिलशाही एवढंच कशाला, स्वराज्यानंतरचे पेशव्याचं राज्यही पेशवाई म्हणून इतिहासात नोंदवलं गेलं.

हिंदवी स्वराज्याच्या रक्षणार्थ शिवरायांचे पुत्र संभाजी महाराज यांनी आत्मबलिदान पत्करलं. त्यांच्या पश्चात छत्रपतींचे सुपुत्र राजाराम महाराज यांनी रणांगणी 'हतोवा प्राप्स्यसि स्वर्गम्' म्हणून स्वर्गवास स्वीकारला तेव्हा मराठ्यांचं राज्य संपलं म्हणून औरंगजेब बादशहा जातीनं अफाट फौजेसह दक्षिणेत उतरला. त्याला शिवरायांच्या सुनेनंच प्रतिकार करून औरंगजेब बादशहाला इथंच आपली कबर खणायला लावली.

मला वाटतं, ताराराणीनंतर छत्रपती शोभले ते शाहू महाराजच! शिवरायांचा लढा स्वातंत्र्यासाठी होता म्हणून ते शत्रूंशी लढले. समतेचा लढा स्वकियांशी लढावा लागतो. शाहूंनी त्यासाठी संस्थानाबाहेरही जाऊन उगवत्या लोकशाहीच्या स्वागतासाठी लोकांना जागृत केलं. कामगार-शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून दिली. त्यांना संघटना बांधून, त्यांचं प्रतिनिधीत्व संसदेत पोहोचलं पाहिजे, असा त्यांना सावधवजा इशारा दिला.

त्याचा उपहास करून लोकमान्य टिळक जाहीर सभेत विचारू लागले, 'शेतकरी संसदेत जाऊन काय नांगर हाकणार आहे? का कामगार तिथं जाऊन कुदळ मारणार आहे?'

शाहूंनीही त्यांना त्यांच्याच भाषेत चोख उत्तर दिलं, 'ब्राह्मणांत सारेच काही आचार्य

नाहीत, आचारी पाणकेच जास्त आहेत. ते संसदेत जाऊन काय थाळ्या वाजवणार आहेत?' भारत जागा झाला आहे. शिक्षणानं शहाणा झाला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसारखे नवे पंडित शंकराचार्यांच्या पंक्तीला बसण्याइतके विद्वान झाले आहेत. विशेष म्हणजे डॉ. आंबेडकर ही शाहू महाराजांचीच निर्मिती होती.

हे सारं जनतेसमोर ठेवून छत्रपतींच्या राजवटीची महती सर्व थरांत पोहोचवणं हे कार्य मामांनी केलं. रयत सभा ही त्यांनी त्यासाठीच स्थापन केली होती. मामांचा हा राजकारणातला प्रवेश होता. याची मामांनाही त्यावेळी कल्पना नव्हती. तरी तो होत होता. रयत सभा ही मामांच्या राजकीय जीवनाची नांदी ठरली. कशी ते यथावकाश पुढे येईलच.

**११. औट घटकेची पत्रकारिता :**

रयत सभेच्या निमित्तानं मामांनी राजकारणात प्रवेश केला. तेव्हा त्यांना प्रकर्षाने जाणवलं की, राजकारण करायचं तर आपलं असं एखादं वृत्तपत्र असलेलं बरं. त्यावेळी कोल्हापुरात अनेक पत्रं होती. सत्यवादी, सेवक, विद्याविलास, ज्ञानसागर, समाज-पण ही सारी साप्ताहिकं होती. अर्थात त्याला कारण होतं त्यावेळी वृत्तपत्राचं कंपोझिंग (अक्षर जुळणी) खिळे जोडून हातानं करावं लागे आणि ते ट्रेडलवर छापलं जात असे. पण पुढं ऑफसेट पद्धतीची प्रिंटिंग मशीन्स आल्यावर कंपोझिंग टाईपरायटरप्रमाणे होऊ लागलं. त्याबरोबर दैनिक सत्यवादी व पुढारी पत्रे आघाडीवर आली.

विद्याविलास व ज्ञानसागर ही ब्राह्मणी वर्तमानपत्रं होती. त्यात येणाऱ्या बातम्या संपादकांच्या जातीचा रंग घेऊन येत. सेवक, समाज, सत्यवादी मात्र बहुजन समाजाची पत्रं होती. साहजिकच त्यात बहुजन समाजाच्या प्रश्नांचा ऊहापोह होत असे. ग. गो. जाधव आणि शंकर ब. भोसले हे सेवकचे दोघे मालक होते. तरी सेवकच्या संपादनात ग. गो. जाधवांचा हात अधिक होता. कारण ग. गों. ना पत्रकारितेचा पूर्वानुभव चांगला होता. पुण्याचे जवळकर यांच्या तालमीत ते तयार झाले होते. मामांनी त्यांना कोल्हापुरात नवे दैनिक काढण्याची कल्पना ऐकवली. ती ग. गो. व शं. ब. या दोघांनाही आवडली. साहजिकच 'सेवक'ला रजा देऊन नव्या दैनिक 'पुढारी'चा जन्म झाला. 'पुढारी'चे कल्पक म्हणून 'पुढारी'चे पहिले संपादक मामा झाले. त्यांनी आल्या आल्या 'पुढारी' पुण्या-मुंबईच्या पत्राप्रमाणे अद्यावत वाटला पाहिजे म्हणून त्यात रोजच्या घडामोडीवर आधारित एखादं व्यंगचित्र देण्याची प्रथा सुरू केली. मला आठवतं कागलचे एक चित्रकार घाटगे नावाचे होते. ते 'पुढारी'करता रोज एक व्यंगचित्र रेखाटू लागले.

त्याच सुमाराला आचार्य अत्रे मा. विनायक यांच्या एका चित्रपटाच्या लेखनाकरिता

कोल्हापूरला आले होते. मामांनी मला सांगितलं, 'आचार्य 'पुढारी'करिता एखादा लेख देतात का पहा'. मी त्याप्रमाणे अत्र्यांना भेटलो, तेव्हा त्यांनी तात्काळ एक गोष्ट लिहून माझ्या स्वाधीन केली. 'पुढारी'त ती प्रसिद्ध झाली. 'मोरूची मावशी'. यावरून ती कथा अत्र्यांच्या डोक्यात किती फिट्ट बसली होती पहा. प्रथम त्यांनी 'पुढारी'करिता ती कथा लिहिली. नंतर त्याच कथेवर एक चित्रपट तयार केला आणि पाठोपाठ एक नाटकही तयार केलं. मामांनी 'पुढारी'च्या आधुनिकीतेकरिता हरेक प्रयत्न केले. त्याप्रमाणे तो प्रसिद्ध होऊ लागला-तो इतका लोकप्रिय झाला की, मुंबई म्हणजे 'लोकसत्ता', पुणे म्हणजे 'सकाळ' आणि कोल्हापूर म्हणजे 'पुढारी' अशी समीकरणे रूढ झाली. अर्थात याचे श्रेय ग. गो. जाधव यांनाही दिलंच पाहिजे. आज 'पुढारी' हे कोल्हापुरातील एक प्रमुख पत्र असून कोल्हापूरचं ते मुखपत्र म्हणून ओळखलं जातं.

तरी संपादक म्हणून रोज 'पुढारी'च्या ऑफिसात बसून काम करणं मामांना शक्य नव्हतं. रोजचा वकिलीचा वाढता व्याप व सार्वजनिक जीवनाचा हव्यास याकरिता दिवस पुरेनासा झाला म्हणून मामांनी 'पुढारी' पत्र ग. गो. जाधव यांच्या हवाली करून ते आपल्या सार्वजनिक सेवेकरिता मुक्त झाले. त्यांना विश्वास वाटत होता ग. गो.चा 'पुढारी' काय किंवा बाळासाहेब पाटलांचा 'सत्यवादी' काय दोन्ही पत्रं आपलीच आहेत.

त्यांच्या पाठबळावरच 'कोल्हापूर जिल्हा लोकल बोर्डावर' ते अध्यक्ष म्हणून निवडून आले. एवढंच नव्हे, तर कोल्हापूर संस्थान विधानसभेचे सभासदही झाले. या दोन्ही क्षेत्रांतील त्यांची कामगिरी लक्षणीय असली, तरी मामांच्या हातून आकाराला आलेली 'प्रिन्स शिवाजी एज्युकेशन सोसायटी' मी मामांची एक महनीय सेवा मानतो. त्या सोसायटीच्या बळावर त्यांनी शिक्षणक्षेत्रात उमटवलेला महत्त्वाचा ठसा म्हणजे रंकाळा वेशीचे पाटणकर हायस्कूल! माझे मित्र मामा लिंग्रस हे त्या शाळेचे हेडमास्तर होते, तर सुप्रसिद्ध कथाकार शंकर पाटील हे त्या शाळेत शिक्षक होते. या संस्था स्वावलंबी होताच मामा त्यापासून दूर झाले. तरी त्यांच्या शैक्षणिक कार्याची नोंद घेताना त्यांचा निर्देश अपरिहार्य आहे.

मामा पाटणकर हायस्कूलपासून स्वतःहून दूर झाले, याचं महत्त्वाचं कारण म्हणजे त्यांच्या डोळ्यासमोर अंगीकृत शिक्षण कार्यासाठी याहीपेक्षा मोठं क्षेत्र आवाहन करीत होतं. कोणत्याही ध्येयाच्या पाठशिवणीत माणसाला वाटतं, डोळ्यासमोर दिसणारं क्षितीज गाठलं की झालं! या कल्पनेनं तो पहिल्या क्षितिजापाशी पोचतो न पोचतो, तोच त्याला नवं क्षितीज आवाहन करताना दिसू लागतं. हे मृगजळामागे धावणाऱ्या हरिणाप्रमाणंच

मामांना शिक्षणाची नवी नवी क्षितिजं आवाहन करीत होती.

कोल्हापुरात तेव्हा अनेक शाळा होत्या. मुलींची मात्र एकच शाळा होती आणि तिथलं शिक्षण हे इतर शाळांप्रमाणे परीक्षार्थी होतं, तिथली मुलगी मॅट्रिक व्हायची, पण पुढं कॉलेज शिक्षणाचं काय? राजाराम कॉलेजसमोरच होतं, तिथं मुली जातही होत्या. त्याच्यापुढे काय? कुठं जायचं आणि काय करायचं?

या व अशा प्रश्नांची उत्तरं देण्यासाठी एखादी स्वतंत्र शिक्षण संस्था असावी, असं मामांना तीव्रतेने वाटू लागले. त्यांची धारणा होती मुलगा सुशिक्षित झाला तर तो एकटाच शहाणा होतो. तेच मुलगी सुशिक्षित झाली, तर सारं घर शहाणं होतं. त्याचबरोबर अशा मताचेही काहीजण होते की, त्यांना वाटाचयं मुलीनं शिक्षण घेतलं तर ती बिघडते म्हणून 'न स्त्री स्वातंत्र्यमर्हती' हा दंडक पाळला जात होता. चूल आणि मूल एवढंच तिचं क्षेत्र होतं.

पण मामांना वाटायचं, शिक्षणानं स्त्री बिघडते? शिक्षणाचा हाच परिणाम असेल तर पुरुषही बिघडला पाहिजे. किंबहुना पुरुष बिघडल्याशिवाय स्त्री बिघडूच शकत नाही. बिघडण्याचा आणि शिक्षणाचा काही संबंध नाही. तो प्रश्न संस्कारांचा आहे. आजच्या शाळांतून शिक्षण मिळतं, पण संस्कार होत नाहीत. ते मिळण्यासाठी स्त्रियांच्या गरजा ओळखून त्यांच्यासाठी निराळा शिक्षणक्रम आखला तर?

मामांची धारणा होती, न स्त्री स्वातंत्र्यमर्हती या सुभाषिताप्रमाणे दुसऱ्याही सुभाषिताचा प्रत्यय समाजाला येईल आणि ते म्हणजे-

'यत्र नार्यस्तु पूज्यंते, रमंते तत्र देवता' आणि पूजेबाबत म्हणायचं झालं तर, त्यासाठीही एक सुभाषित आहे 'स्वदेशे पूज्यते राजा, विद्वान सर्वत्र पूज्यते'.

मामांची खात्रीच झाली. पुरुषाप्रमाणे स्त्रियांनासुद्धा शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. पण तो त्यांच्यासाठी राबवणार कोण? सर्वसामान्य मुलींसाठी शिक्षण संस्था स्थापायची तर ते काम बहुजन समाजातील जाणकारानेच सुरू केलं पाहिजे. इतरांना त्याची गरज तरी काय?

ही ज्ञानगंगा दारोदार पोचवायची तर ती राजापुरी गंगेप्रमाणे अधीमधी सवडीनं उगवणारी असून चालणार नाही, ते काम स्वर्गातून भूतळावर गंगा आणणाऱ्या भगीरथाचं आहे. नुसत्या भगीरथानंही भागणार नाही, ती गंगा झेलण्यासाठी जटाधारी शंकरही अवतरला पाहिजे. हे दोन अवतार धारण करणार कोण? त्यासाठी भागीरथी पुत्रच तयार झाला,

भगीरथ होऊन त्यानं गंगा स्वर्गातून खाली आणली आणि ती झेलण्यासाठी तयार झाला तो कमलापतीच! त्यासाठी सर्वस्वाच्या त्यागाची तयारी ठेवून विश्वनाथानं आपल्या जटा झाडल्या आणि गंगेला आवाहन केलं!

ते ऐकून कमळाही लंकेची पार्वती बनायची तयारी ठेवून त्याच्या साथीला सज्ज झाली. मामांना प्रश्न पडला. आपल्या नव्या शिक्षण संस्थेला नाव काय द्यायचं? आपण म्हणतो, नावात काय आहे? पण नावात बरंच काही आहे. तोही प्रश्न आपोआप सुटला. मामांना छत्रपती राजाराम महाराजांनी बोलून दाखवलेली एक खंत आठवली. ते मामांना म्हणाले होते, 'जिच्या पराक्रमाची भाकरी मी खातो, तिच्या पराक्रमाला साजेसं स्मारक जर कुणी केलं तर त्याला मी माझं अर्ध राज्य द्यायला तयार आहे'.

म्हणजे मामांच्या शिक्षण संस्थेचं नाव छत्रपती राजाराम महाराजांनीच सुचवलं होतं नाही का? ताराराणी विद्यापीठ!

**१२. ताराराणी विद्यापीठ :**

'जिच्या पराक्रमाची भाकरी मी खातो, त्या ताराराणीचं यथोचित स्मारक जर कोणी केलं, तर त्याला मी माझं अर्धे राज्य द्यायला तयार आहे'. कोल्हापूर संस्थानचे भूतपूर्व अधिपती श्री. छत्रपती राजाराम महाराज यांचे हे तळमळीचे उद्गार होते.

वास्तविक, त्यांच्या कारकीर्दीत कोल्हापुरात अनेक स्मारकं उभी राहिली. श्री छत्रपती शिवाजी महाराज, राजर्षी शाहू महाराज, आईसाहेब लक्ष्मीबाई महाराज, प्रिन्स शिवाजी महाराज, एक ना दोन, असे अनेक पुतळे कोल्हापूरची शोभा वाढवीत आहेत. त्यांना ताराराणीचा एखादा पुतळा उभा करणं कठीण नव्हतं. पण त्यांना अभिप्रेत होतं ते दगडी स्मारक नव्हे, तर करवीर राज्य संस्थापिका ताराराणीचं जिवंत स्मारक!

श्री राजाराम महाराज अकाली गेले, तरी त्यांच्या या शेवटच्या इच्छेनं कोल्हापुरातील एक तरुण झपाटला गेला. त्याचं शिक्षण कोल्हापुरातच झालं होतं. राजर्षी शाहू महाराजांच्या विचारसरणीत तो वाढला होता. एवढंच नव्हे, तर कोल्हापुरातील एक नामांकित कायदेपंडित म्हणूनही त्याची ख्याती पसरू लागली होती. याच्याच जोडीला कोल्हापूरच्या नगरपालिकेचं आणि इलाखा पंचायतीचं अध्यक्षपदच नव्हे, तर आमदार आणि खासदार पदेही त्याने भूषविली होती. त्या कर्तबगार तरुणाचं नाव होतं रावसाहेब विश्वनाथ तुकाराम पाटील.

आपल्या या साऱ्या वैभवाकडे त्यांनी पाठ फिरविली आणि एकाच विचारानं ते बेचैन झाले. 'रणरागिणी ताराराणीचं यथोचित स्मारक कसं उभं करता येईल?' कारण

ताराराणी ही पहिले राजाराम महाराज यांची धर्मपत्नी म्हणून राणी नव्हती, तर एक मुत्सद्दी आणि राजकारणी स्त्री होती. इतिहासकाळी मराठी दौलत निर्नायक झाली असताना तिनं ती आपल्या पराक्रमानं सावरली होती. राजाराम महाराजांच्या निधनानंतर वयाच्या अवघ्या पंचविसाव्या वर्षी ती विधवा झाली होती, तरी स्वराजाचा कुंकुमतिलक तिनं आपल्या पराक्रमानं भूषविला होता. औरंगजेब बादशहासारख्या बलाढ्य शत्रूशी त्याच्या अखेरीपर्यंत झुंज दिली होती. तो पराक्रम पाहून बादशहानं उद्गार काढले होते, 'शिवाजीची बहू शिवाजीसे बहू निकली'.

अशा युग स्त्रीचं स्मारक करायचं म्हणजे व्ही. टी. पाटलांच्या मनात स्त्री शिक्षणाची कल्पना आली. शिक्षणाचा प्रसार आपल्याकडे मुळातच कमी. त्यात स्त्री शिक्षणाकडे कुणाचं फारसं लक्ष गेलं नव्हतं. या संदर्भात शाहू महाराजांनी प्रांजळपणे म्हटलं होतं, 'कोणत्याही समाजाचा उद्धार ज्याचा त्यानंच करायचा असतो आणि त्यासाठी समाजाला शिक्षित करणं हाच एकमेव उपाय आहे'.

छत्रपतींच्या या प्रेरणेनं कोल्हापुरात काही संस्था शिक्षण देण्याचं कार्य करीत होत्या. पण स्त्री शिक्षणाचं महत्त्व फारसं कोणी ओळखलं नव्हतं. आधीच मुलांच्या मानानं मुलींची संख्या कमी असल्याने शिक्षण पद्धतीत मुली दुर्लक्षित रहातात, पालकांनाही सहशिक्षण पद्धती सहसा आवडत नाही. व्ही. टी. पाटील यांनी नेमकं हेच हेरलं आणि त्यांनी स्त्री शिक्षणाकरिता आमरण वाहून घ्यायचं ठरवलं. त्यांची मनोमन धारणा होती, घरातला एखादा मुलगा शिक्षित झाला तर तो एकटाच सुशिक्षित होतो, पण एखादी मुलगी सुशिक्षित झाली तर सारं घरदार सुशिक्षित होतं. स्त्रियांच्या उद्धाराचा हाच एकमेव मार्ग आहे हे ओळखून...

व्ही. टी. पाटील यांनी १९४५ साली 'ताराराणी विद्यामंदिर' नावाची माध्यमिक शिक्षण संस्था सुरू केली. राजारामपुरीतच एका भाड्याच्या घरात ती सुरू झाली तेव्हा त्या शाळेत अवघ्या बावीस मुली होत्या. आज त्या सरितेचं ज्ञानगंगेत रूपांतर झाले असून आपल्या सहस्त्र मुखांनी ती समाजाभिमुख झाली आहे. ताराराणी विद्यालयाचं रूपांतर ताराराणी विद्यापीठात झालं असून आज त्या विद्यापीठात बालभवनपासून ज्युनिअर कॉलेजपर्यंत चार हजारच्यावर विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत.

या शिक्षण संस्थेचे प्रमुख ध्येय एकच आहे. जास्तीत जास्त मुलींना शिक्षणाचा लाभ झाला पाहिजे. म्हणून या संस्थेत प्रवेश देताना मुलींच्या मार्कांची टक्केवारी बघितली जात नाही. टक्केवारी कितीही असो, ताराराणीत सर्वांना मुक्तद्वार आहे. साहजिकच, या

शिक्षण संस्थेत बहुजन समाजातील मुलींचं प्रमाण सर्वाधिक आहे. व्ही. टी. पाटील अभिमानानं म्हणतात, 'माझ्या संस्थेतून एखादी पांढरपेशी मुलगी युनिव्हर्सिटीत पहिली येण्यापेक्षा तळागाळातल्या पाच-पंचवीस मुली जरी पास झाल्या, तरी मला आनंद आहे' असं असूनही या संस्थेची एस.एस.सी. पास होणाऱ्या मुलींची टक्केवारी लक्षणीय आहे.

यंदा व्ही. टी. पाटील वयाची तिसरी पंचविशी ओलांडून पंच्याऐंशीव्या वर्षांत पदार्पण करीत आहेत. तरीसुद्धा शिक्षणाबाबतची त्यांची स्वप्नं जितकी भव्य, तितकीच दिव्य आहेत. ताराराणी विद्यापीठाचंच उदाहरण घ्या ना. एका भाड्याच्या घरात सुरू झालेल्या या संस्थेनं आता स्वत:च्या मालकीच्या बारा एकर जागेत आपला संसार थाटला आहे. शहराचा गजबजाट नाही किंवा शहरापासून दूरही नाही, अशा राजाराम रोडवर ताराराणी विद्यापीठाची आलिशान इमारत उभी असून प्रांगणात सुशोभित बाग आहे. दुतर्फा उभी असलेली पामची, निलगिरीची, गुलमोहराची झाडे अवघ्या परिसराला अवर्णनीय शोभा देत आहेत.

फाटकातून प्रवेश करताच ताराराणीचा भव्य अश्वारूढ पुतळा दृष्टीस पडतो. कोल्हापुरातील हा ताराराणीचा पहिला पुतळा आहे. रणरागिणीच्या या पुतळ्याचं उद्‌घाटन भारताचे माजी सरसेनापती मेजर जनरल माणेकशा यांच्या शुभहस्ते व्हावं ही किती औचित्यपूर्ण घटना आहे! या पुतळ्याच्या दर्शनानंच माणूस प्रभावित होऊन जातो. मग संस्थेत शिक्षण घेणाऱ्या मुलींना तो आपला आदर्श वाटल्यावाचून कसा राहील? मधूनच वाहत जाणाऱ्या ओढ्यानं ताराराणीच्या परिसराचे दोन भाग केले आहेत. पुढील भागात विद्याशाखांच्या सुंदर वास्तू आहेत, तर मागील भागात वसतिगृहाची तितकीच सुंदर इमारत उभी आहे. दोन्ही भागांतील विस्तीर्ण क्रीडांगणे वृक्षराजींच्या ऊन-सावलीच्या खेळानं मुलींना खेळाचं सतत आवाहन करीत असतात. व्ही. टी. पाटील यांची कल्पना असावी, शाळेत शिक्षक जे शिकवतात त्याहीपेक्षा अधिक काही निसर्ग शिकवीत असतो.

ताराराणी विद्यापीठाची पहिली संस्था ताराराणी विद्यामंदिर १९५२ साली पूर्ण हायस्कूल म्हणून मान्यता पावली. सध्या त्याचं नाव 'उषाराजे मल्टी पर्पझ हायस्कूल' असं असून त्यात दोन हजारच्यावर मुली शिक्षण घेत आहेत. शालेय शिक्षणाबरोबरच चित्रकला, संगीत, व्यापारशास्त्र, टंकलेखन, गृहजीवनशास्त्र , सैनिकी अध्ययन व संगणक इत्यादी विषयांची सोय एकाच परिसरात एकाच संस्थेत करणारी दक्षिण भारतातील ही एकमेव संस्था होय.

ताराराणीच्या सैनिक परंपरेला अनुसरून बौद्धिक व नैतिक विकासाबरोबर

विद्यार्थिनींच्या शारीरिक विकासाकडेही इथं कटाक्षानं लक्ष दिलं जातं. यासाठी वैयक्तिक व सांघिक खेळ, एन. सी. सी., गर्लगाईड इत्यादी विषयांना प्रोत्साहन देऊन त्यांची खास तयारी करून घेतली जाते. याचंच दृश्यफळ म्हणजे गेली कित्येक वर्षे वैयक्तिक व सांघिक क्रीडा स्पर्धेत ताराराणीनं अजिंक्यपदे पटकाविली आहेत.

ताराराणीच्या संस्थापकांनी ओळखलं आहे की, शिक्षिका विनीत असल्याशिवाय खरं शिक्षण देता येत नाही. कोल्हापुरातील विद्यार्थिनींना विनीत होण्यासाठी पूर्वी पुण्यात जावं लागे. पण ते फार खर्चाचं आणि गैरसोयीचं होतं म्हणून संस्थापकांनी 'सौ. वत्सलादेवी देसाई ज्यु. कॉलेज ऑफ एज्युकेशन' ही संस्था १९५१ साली सुरू केली. दरवर्षी दोनशे विद्यार्थिनी या संस्थेत ट्रेनिंग घेतात. आजपर्यंत दोन हजार विद्यार्थिनी अध्ययन पदविका घेऊन खेडोपाडी सेवा करीत आहेत. संलग्न पाठशाळा या अध्यापिका विद्यालयाच्या प्रयोगशाळाच आहेत. म्हणून विद्यापीठानं प्राथमिक आणि पूर्व प्राथमिक विद्यालयेही सुरू केली आहेत.

बालभवन ही ताराराणी विद्यापीठाची सगळ्यात छोटी, सगळ्यात छोट्या बालिकांची आणि सगळ्यात वैशिष्ट्यपूर्ण अशी शाखा. प्रिन्स शिवाजी एज्युकेशन सोसायटीने माँटेसरी पद्धतीनं शिक्षण देणारा एक वर्ग चालविला होता, त्यांचं समाधानकारक काम पाहून कोल्हापूर नगरपालिकेनं राजाराम हॉलमधील आपलाही वर्ग संस्थेच्या हाती सोपवला. १९५१ पासून या दोन्ही वर्गांचे एकीकरण झाले आणि बालभवन जन्माला आले.

सांस्कृतिक कार्यक्रमातून मुलींचा विकास साधणे, हे अध्यापन विद्यालयाचे काम असते. त्यासाठी विद्यापीठाने मुलींच्यासाठी खास वसतिगृह बांधले आहे. ते वीज, फर्निचर, गॅस अशा सोयींनी युक्त असून एक-दोन हजार चौरस फुटांचा हॉल सांस्कृतिक कार्यक्रमासाठी बांधला आहे. त्या हॉलमधील सरस्वती देवीची संगमरवरी मूर्ती अत्यंत देखणी असून कोल्हापुरातील ते एक आकर्षण बनले आहे. व्ही. टी. पाटील यांच्या धर्मपत्नी कै. सौ. सरोजिनी देवी यांच्या नावानं ते ओळखलं जातं. कारण मरणापूर्वी आपली सर्व इस्टेट, राहता बंगला, जमिनी, दागदागिने इत्यादी मौल्यवान वस्तूंचा एक विश्वस्त निधी उभारून त्यांनी विद्यापीठाला अर्पण केला आहे. त्या निधीतून दरवर्षी काही उत्पन्न मिळतं. सरोजिनी देवींना मूलबाळ नव्हतं. म्हणून अनेक नातलगांनी त्यांना दत्तक घेण्याचा सल्ला दिला होता. पण त्यांनी तो मानला नाही. त्या नेहमी म्हणत, 'मी दत्तक घेतला, तर एकाच मुलाचा संसार उभा राहील, आता हजारो मुलींचा संसार उभारण्याचं व्रत माझ्या पतीनं पत्करलं आहे. त्यात सहभागी होणं माझं कर्तव्य नाही का?'

अशा त्यागमूर्ती पत्नीचं स्मारक व्ही. टी. पाटील यांनी 'कमला कॉलेज' सुरू करून नुकतच केलं आहे. कला आणि वाणिज्य अशा दोन्ही शाखा आता तिथं सुरू आहेत. कमला हे सरोजिनी देवींचे पूर्वाश्रमीचं नाव होय. हे पूर्ण कॉलेज होताच या संस्थेचं वैशिष्ट्य म्हणून सांगता येईल 'किंडर गार्डन वर्गापासून पोस्ट ग्रॅज्युएशन'पर्यंतचे शिक्षण देणारी ही महाराष्ट्रातीलच नव्हे, तर भारतातील एकमेव संस्था आहे. किंबहुना हेच व्ही. टी. पाटील यांना अभिप्रेत असावं. ताराराणीत आपल्या आईचा किंवा वडिलांचा हात धरून येणारी चिमुरडी पोर आपल्या पायावर उभी राहून बाहेर पडली पाहिजे. येता-जाता तिच्या समोर एकच आदर्श राहील. पुतळ्याच्या चबुतऱ्यावर कविवर्य ग. दि. माडगूळकर यांच्या शब्दात तो कोरला आहे-

*''सम्राज्ञीना, समरकुशाला लोकनेत्री प्रतापी,*
*सत्ताधांना नमवुनि रणी आपुले राज्य स्थापी,*
*नारी नोहे अमर जगती ज्योत ही पौरुषाची,*
*ताराराणी जननी अमुच्या अस्मितेची, यशाची.*

ताराराणींच्या कर्तृत्वानं मामा एवढे भारले होते की, त्यांनी डॉ. जयसिंगराव पवार या इतिहास संशोधकांना ताराराणीचं चरित्र लिहायला लावलं. ते 'महाराणी ताराबाई' या नावानं ताराराणी विद्यापीठातच प्रसिद्ध केलं आहे.

तद्वत सुप्रसिद्ध नाटककार वसंतराव कानेटकर यांना ताराराणीवर नाटक लिहायला लावलं. प्रभाकर पणशीकर यांनी ते 'जेथे गवताला भाले फुटतात' या नावानं रंगभूमीवर आणलं.

तर मला ताराराणींच्या जीवनावर एक चित्रपट लिहायला प्रवृत्त केलं. 'शिवरायांची सून-ताराराणी' या नावानं ते पडद्यावर अवतरलं आहे. अर्थात त्या चित्राचे स्पॉन्सर आहेत शिवसेनापती बाळासाहेब ठाकरे.

**१३. मौनी विद्यापीठ :**

चातुर्वर्ण्य पद्धतीमुळे विद्यार्जन आणि विद्यादान ही पदवी परवापर्यंत ब्राह्मणांची मक्तेदारी होती. ती भारतात ब्रिटिश राजवट आल्याने मोडीत निघाली. त्यांनी शिक्षण सर्वांना खुले केले आणि ज्ञानगंगा समाजाभिमुख होऊन मुक्तपणे वाहू लागली. परिणामी शिक्षणाच्या शाखा आणि उपशाखा शहरोशहरी स्थापन झाल्या. त्या कल्पनेपोटीच मुंबई इलाख्याकरिता 'मुंबई विद्यापीठ' (युनिव्हर्सिटी) स्थापन झाले. ते विद्यापीठ अवघ्या

इलाख्याकरिता शिक्षणपद्धती ठरवी आणि त्याप्रमाणे परीक्षा घेऊन पदव्या देत असे.

पण अवघ्या इलाख्याकरिता एक विद्यापीठ असल्याने परीक्षा पद्धती अवजड होऊ लागली. परीक्षांचे निकालही घाईगर्दीत जाहीर होऊ लागल्याने त्यात काही त्रुटी राहू लागल्या. त्या नाहीशा करण्यासाठी इलाखा विद्यापीठाऐवजी प्रांतनिहाय विविध विद्यापीठे असावीत, या हेतूने सुरुवातीला पुणे विद्यापीठ स्थापन झाले. त्या सुमारालाच कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजचे प्रिन्सिपॉल डॉ. बाळकृष्ण यांनी दक्षिण महाराष्ट्राकरिता 'शिवाजी विद्यापीठाची' संकल्पना मांडली. ती त्यांच्या मृत्यूनंतर अंमलात आली.

अशी प्रांतनिहाय विद्यापीठे स्थापन होण्यामागे एकच हेतू होता. शिक्षणाचे विषय आणि परीक्षा पद्धती ज्या त्या प्रांताच्या गरजेनुसार ठरवल्या जाव्यात. साहजिकच नवीन विद्यापीठे स्थापन झाल्याने नागरी लोकांना शिक्षण घेणे सुलभ झाले. त्याचा फायदा नागरी लोकांनाच होऊ लागला. विविध विषयांचे पदवीधर-आर्टस्, सायन्स आणि वाणिज्य हे शहरांतूनच तयार होऊ लागले.

वास्तविक आपला देश हा एक खंडप्राय देश आहे आणि तो असंख्य खेड्यांनी व्यापला आहे. त्या खेड्यांच्या शिक्षणाची उपेक्षाच होऊ लागली. ती नाहीशी करण्यासाठी ताराराणी विद्यापीठाचे प्रवर्तक व्ही. टी. पाटील यांनी ग्रामीण विभागासाठी एखादं स्वतंत्र विद्यापीठ असावं, अशी योजना आखली आणि ती कार्यान्वित करण्याचा संकल्प सोडला.

मामा त्या सुमाराला भुदरगड विभागातून खासदार म्हणून निवडून आले होते आणि त्या विभागाच्या विकासासाठी 'भुदरगड सहकारी साखर कारखाना' उभारण्यास त्यांचा महत्त्वाचा वाटा होता. त्या विभागातच मौनी महाराजांचा मठ पाटगावला आहे. तो एकदम आडबाजूला होता. तो कोल्हापुराशी जोडण्यासाठी त्यांनी गारगोटी ते पाटगाव हा रस्ता नव्याने आखला. या सुविधेमुळे त्या भागातील दळणवळण वाढीला लागले. लोकांच्या ध्यानी आले की, पाटगाव हे गाव आणि त्याचा परिसर अत्यंत निसर्गसमृद्ध आहे. वेदगंगेच्या काठी तो वसला असून त्याठिकाणी मौनी महाराजांचा प्रशस्त असा मठ आहे. शाहू महाराजांनी त्या पीठावर क्षात्रजगद्गुरूंची नेमणूक करून मौनी महाराजाचं कार्य लोकांसमोर आणलं.

हे मौनी महाराज कोण कुठले? त्यांचा इतिहासही उद्बोधक आहे. मौनी महाराज हे पूर्वी आजरा तालुक्यातील उत्तूर या गावात बहुजन समाजाच्या जागृतीचे आणि प्रबोधनाचे कार्य करीत होते. त्या जुन्या काळात सनातनी ब्राह्मणांना त्यांचे हे कार्य रूचले नाही. त्यांना वाटलं, आपल्या कामात ढवळाढवळ करणारा हा उपटसुंभ कोण? म्हणून त्यांनी एके

दिवशी मौनी महाराजांना बेदम मारहाण केली आणि ते मेले असं समजून त्यांचा देह उत्तूर गावालगतच्या दक्षिणेकडील ओढ्यात टाकून दिला.

पण मौनी महाराज मेले नव्हते. ते बेशुद्ध झाले होते. पहाटेच्या थंडगार वाऱ्याने मौनी बुवा शुद्धीवर आले आणि उत्तूर गाव सोडायचं ठरवून ते थेट पश्चिमेकडे तोंड करून चालू लागले. चालता-चालता ते पाटगावला पोहोचले. वेदगंगा नदीच्या काठी वसलेला, निसर्ग सौंदर्यानं नटलेला, पवित्र परिसर पाहून त्यांना धन्यता वाटली. मौनी महाराज तेथेच ध्यानधारणा करीत तपश्चर्येला बसले. कालांतराने त्यांना सिद्धावस्था प्राप्त झाली. त्यांनी मौन धारण केलं. मौन धारण करणारा संन्यासी म्हणून लोक त्यांना मौनी महाराज म्हणू लागले.

ही घटना इतिहासाला नवी नाही. तुकाराम महाराजांच्या बाबतीतही असेच घडले नाही का? त्यांची लोकप्रियता सहन न होऊन ब्राह्मणांनी त्यांची गाथा इंद्रायणीत बुडवली, तरी ती लोकगंगेनं तारली, तेव्हा ती घरोघरी पोहोचली. तुकाराम महाराजांचा शेवटही असाच ब्राह्मणांनी केलेल्या त्यांच्या हत्येमुळे घडला आहे. ती हत्या लपविण्यासाठी तुकाराम महाराज सदेह वैकुंठाला गेले, असा त्यांनी बोभाटा केला. आजवर कोणी सदेह स्वर्गाला गेला आहे का?

गोब्राह्मण प्रतिपालक शिवाजी महाराजांच्या वेळीच या दोन्ही घटना घडाव्यात हा योगायोगही विलक्षण म्हटला पाहिजे. १६७६ साली छत्रपती शिवाजी महाराजांना दक्षिण दिग्विजयाची प्रेरणा झाली. त्यांच्या नेहमीच्या प्रथेप्रमाणे त्यांनी अशी मोहीम हाती घेण्यापूर्वी एखाद्या सत्पुरुषाचा आशीर्वाद घेणे योग्य होईल, असं त्यांना वाटलं. शिवाजी महाराजांना मौनी महाराजांचं नाव समजलं तेव्हा छत्रपती शिवाजी महाराज काही निवडक सैन्य आणि अष्टप्रधान मंडळापैकी काही प्रधान बरोबर घेऊन पाटगावला मौनी महाराजांचा आशीर्वाद घेण्यासाठी गेले.

दिवस थंडीचे होते. मौनी महाराज उन्हात बसून राहिले होते. छत्रपती शिवाजी महाराज मौनी महाराजांच्यासमोर पाच तास उभे राहिले. परमेश्वराची प्रार्थना करीत पाच तासानंतर शिवाजी महाराजांनी मनात संकल्प सोडला, 'महाराज, मी दक्षिण दिग्विजयासाठी जात आहे. त्यात मला यश द्यावे आणि आपल्या आशीर्वादाचं निदर्शक म्हणून शुभचिन्ह दाखवावे'.

शिवाजी महाराजांनी हा संकल्प सोडताच मौनी महाराज हसले. हेच शुभचिन्ह समजून शिवाजी महाराजांनी मोरोपंत पिंगळे यांच्या हातातील चाफ्याच्या फुलांचा हार

हाती घेऊन तो मौनी महाराजांच्या गळ्यात घातला. अशा तऱ्हेनं मौनी महाराजांचा आशीर्वाद घेऊन शिवाजी महाराजांनी रायगडला प्रयाण केले आणि सैन्य घेऊन ते दक्षिणेत दिग्विजयाच्या मोहिमेवर निघाले. या मोहिमेत शिवाजी महाराजांनी तंजावरपर्यंतचा सर्व मुलुख जिंकून घेतला आणि परतल्यावर ते पुन्हा एकदा मौनी महाराजांच्या दर्शनासाठी पाटगावला गेले. पण त्यापूर्वीच मौनी महाराजांनी जिवंत समाधी घेतली होती. त्या समाधीचे दर्शन घेऊन महाराज रायगडला परत गेले. जातेवेळी समाधीच्या योगक्षेमासाठी काही उत्पन्न लिहून देऊन त्याप्रमाणे सनद मौनी महाराजांचे शिष्य तूर्तगिरी यांच्या नावे करून दिली.

ही दंतकथा नाही. शिवाजी महाराजांच्या अष्टप्रधान मंडळापैकी एक प्रधान दत्तात्रय त्रिंबक वाकनीस यांनी शिवाजी महाराजांच्या जीवनावर एक ९२ कलमी बखर लिहिली असून त्यामध्ये ७६ व्या कलमामध्ये शिवाजी महाराजांची आणि मौनी महाराजांची भेट झाल्याची समग्र हकीकत लिहून ठेवली आहे.

मामांनी आपल्या इलाखा पंचायतीच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत गारगोटी ते पाटगाव हा बावीस मैलांचा पक्का रस्ता, अनेक पूल, मोऱ्यासहित पक्का करून घेतला होता. त्यामुळे मौनी महाराजांच्या समाधीचं दर्शन घेणं सुकर झालं होतं. पण तेवढ्यानं मौनी महाराजांचं ऋण आपल्या हातून फिटले, असं होईल का? मौनी महाराजांचं जीवनकार्य लोकप्रबोधनाचं. तेच कार्य त्यांच्या नावे एखादी शिक्षणसंस्था स्थापन करून त्या भागात सतत करीत राहणे, हीच खरी मौनी महाराजांबद्दलची कृतज्ञता होईल. त्यासाठी मामांनी १९४६ साली गारगोटी येथे मौनी विद्यापीठाची स्थापना केली. आज ते विद्यापीठ खूप मोठं झालं आहे. भारतीय कीर्तीचं ठरलं आहे.

त्याकरिता मामांनी गारगोटीचा परिसरच का निवडला? त्याचं कारण पूर्वी त्या ठिकाणी गर्ग ऋषींचा आश्रय होता. आश्रमाला कुटी असंही म्हणतात. गर्गकुटी याचा अपभ्रंश होऊन गारगोटी हे नाव आकारला आलं. मामांनी ती जागा निवडली याचं आणखी एक कारण म्हणजे विद्यापीठाकरिता लागणारा ऐसपैस असा परिसर तिथं उपलब्ध होता. त्याची आखणी करून त्या जागी मामांनी ग्रामीण विद्यापीठाकरिता आवश्यक अशा टुमदार शाखा इमारती उभ्या केल्या. बघता बघता एक कॅम्पसच तयार झाला असं म्हणतात. सध्या जिथं विद्यापीठ उभं आहे, तिथं पूर्वी स्मशानभूमी होती. म्हणजे माणूस जिथं अग्निशय्येवर चिरनिद्रा घेत होता, तिथंच आता निद्रिस्त समाज जागा होऊ लागला आहे.

गारगोटीच्या स्मशानभूमीवर मौनी विद्यापीठाचा प्रचंड वृक्ष डौलदारपणे उभा राहून

विद्यार्थ्यांना खुणावीत आहे. प्रायमरीपासून पी.एच्.डी.पर्यंतचं शिक्षण येथे ग्रामीण छात्रांना सुलभ आहे. १) शिशु भवन, २) जवाहन बालभवन (प्राथमिक शाळा), ३) शाहू कुमार भवन (माध्यमिक शाळा), ४) ज्युनियर कॉलेज ऑफ एज्युकेशन, ५) आर्टस् अॅण्ड कॉमर्स कॉलेज, ६) कर्मवीर हिरे रूरल इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन (को-ऑपरेशन), सोशल वर्क व एज्युकेशन स्पेशल बी. ए., बी. टी., समान ५ वर्षांचा कोर्स) यांचे पदवी अभ्यासक्रम, ७) आचार्य जावडेकर विनय भवन (बी. एड्. कॉलेज), ८) इन्स्टिट्यूट ऑफ सिव्हिल इंजिनिअरिंग, ९) ग्रामसेवक सेंटर, १०) पंचायत राज्य ट्रेनिंग सेंटर, ११) कंपोझिट ट्रेनिंग सेंटर, १२) कोरगावकर रिसर्च इन्स्टिटयूट, १३) एक्स्टेंशन विभाग, १४) ऑडिओ व्हिज्युअल विभाग. इतक्या अंगांनी विसाव्या शतकातील संस्कृती आणि विकास, रेल्वेलाईनपासून ३१ मैल दूर असलेल्या या गारगोटी नामे खेड्यात पोहोचला आहे. प्राचीनकाळची गार्ग्यकुटी आता श्री मौनी विद्यापीठात चाललेल्या ज्ञानयज्ञाने पुन्हा गार्ग्यकुटी या परंपरेला शोभेशी झाली आहे. भारतात प्रसिद्धी पावलेली आहे. आपल्या या संस्थेचा मामांना एवढा अभिमान वाटतो की, त्या परिसराला संस्थेचा प्रकल्पक म्हणून आपले नाव दिले आहे-विश्वनाथनगर! खरंच मामांच्या शैक्षणिक कार्याची ताराराणी विद्यापीठ आणि मौनी विद्यापीठ ही चिरंतन स्मारके होत. दोन्ही संस्था बघता बघता लोकादरास पात्र झाल्या आणि मामा शिक्षण महर्षी या पदवीला पोहोचले.

शिक्षण महर्षी ही कोणा विद्यापीठाची पदवी नाही की, शासकीय पुरस्कार नाही. लोकांनी अनाहूतपणे केलेला तो सन्मान आहे. पूर्वीच्या काळी ऋषीमुनी वनात जाऊन देवाची ध्यानधारणा करीत तेव्हा त्यांना एक तपाच्या तपश्चर्येनंतर लोक ऋषी किंवा महर्षी म्हणून आदर व्यक्त करीत. मामांच्या हातून ही तपश्चर्या ताराराणी विद्यापीठ आणि मौनी विद्यापीठ या दोन शिक्षण संस्थांच्या रूपाने घडली आहे. ती एक नाही, चांगली चार-पाच तपाची आहे. त्या योगदानाचा आदर करून लोकांनीच त्यांना 'शिक्षण महर्षी' या पदवीनं गौरवलं आहे. या पदवीनं सन्मानित होणारे व्ही. टी. पाटील हे मराठा समाजातील पहिले शिक्षण महर्षी होत, अशीच नोंद उद्याच्या इतिहासकाराला करावी लागेल.

**१४. मामांचा राजसंन्यास :**

सुप्रसिद्ध आंग्ल लेखक जॉर्ज बर्नार्ड शॉ यांनी म्हटलंय 'देशभक्ती हे लफंग्याचं शेवटचं आश्रयस्थान होय'.

बर्नाड शॉ यांचा नेहमीचा विक्षिप्तपणा सोडला तर त्यांचं हे विधान पटण्यासारखं आहे. म्हणूनच असेल, सज्जन माणसं राजकारणापासून दोन हात दूरच राहतात, पण

त्यातही एक तोटा आहे. या तटस्थेमुळे सज्जनांवर असज्जनांच्या हाताखाली नांदायची पाळी येते. अशावेळी आपद्धर्म म्हणून काही सज्जन माणसंही राजकारणात उतरतात.

मामांचंही अगदी असंच झालं. नामदार भाऊसाहेब हिरे तेव्हा महाराष्ट्राचे महसूलमंत्री होते. मुख्यमंत्री होते ना. मोरारजी देसाई. यावरून वाटतं द्विभाषिक राज्याला शेवटची घरघर लागली तेव्हाचा हा काळ असावा. ना. हिरे कॉंग्रेसचा प्रसार करण्यासाठी कोल्हापूरला आले असताना त्यांनी चौकशी केली, कोल्हापुरातील प्रभावी व्यक्ती कोण कोण आहेत? तेव्हा अनेकांनी व्ही. टी. पाटील यांचं नाव त्यांना सांगितलं. तेव्हा ना. हिरे त्यांना भेटायला त्यांच्या बंगल्यावर आले. ही संधी साधून मामांनी आपल्या दोन्ही संस्था ताराराणी विद्यापीठ आणि मौनी विद्यापीठ ना. हिरे यांना दाखविल्या. त्या संस्था पाहून ना. हिरे एवढे भारावून गेले की, त्यांनी मामांना कॉंग्रेस प्रवेशाचं आवाहन तर केलंच, पण मामांचा बालेकिल्ला जो भुदरगड तालुका त्या मतदारसंघातून त्यांना कॉंग्रेसचे उमेदवार म्हणून निवडणुकीला उभे राहण्यासाठी तिकीटही दिले. अर्थात मामा अपेक्षेप्रमाणे निवडूनही आले-मामा आमदार झाले.

साहजिकच विधिमंडळाच्या अधिवेशनाकरिता मामांना वरचेवर मुंबईला जावे लागे. अशावेळी मामा आमदार निवासात उतरत, पण ना. हिरे यांनी त्यांना आमदार निवासात उतरू दिलं नाही. ते मामांना आपल्या बंगल्यावरच घेऊन जात. एवढेच नव्हे, तर ना. हिरे जेव्हा महसूलमंत्री म्हणून कोल्हापूरला भेटी देत, तेव्हाही ते मामांच्या बंगल्यावर उतरत. वास्तविक, मंत्र्यांच्या निवासाकरिता ताराबाई पार्कात 'सर्कीट हाऊस' आहे. पण नाही-ना. हिरे मामांच्या 'सरोज' या निवासस्थानाचा'सर्कीट हाऊस' म्हणून उपयोग करीत. अशावेळी मामांचं घर कसं अहोरात्र गजबजलेलं असे. सकाळपासून पार मध्यरात्रीपर्यंत.

मी तेव्हा मामांच्या घरीच रहात होतो. माझं बिऱ्हाड मी मुंबईला हलवलं असल्याने मामांच्या घरी राहूनच अनेक चित्राचं दिग्दर्शन केलं आहे. एकदा ना. हिरे आले असताना मामांनी माझाही त्यांच्याशी परिचय करून दिला. 'हा माझा मेव्हणा. सरोजचा धाकटा भाऊ. चित्रपट लेखक-दिग्दर्शक आहे. मला अभिमान वाटतो याचा'.

मा. हिरेही तेव्हा म्हणायचे, 'मी पाहिलीत यांची काही चित्रं. मला आवडली'.

मी पाहिलं, मामांचा आणि हिऱ्यांचा एवढा घरोबा असताना त्यांनी हिऱ्यांच्या ओळखीचा गैरफायदा कधी घेतला नाही. जर काही मागितलंच असेल तर ते आपल्या संस्थेच्या 'ताराराणी विद्यापीठा'च्या वा 'मौनी विद्यापीठा'च्या उत्कर्षासाठीच! स्वतःचा असा स्वार्थ त्यांना राहिला होताच कुठं? मामा जगत होते, जागत होते आपल्या दोन

संस्थांच्या अभ्युदयासाठीच!

मामांची ही शैक्षणिक विधायक कार्ये पाहून ना. हिरे यांनी मामांचं नाव एखाद्या मंत्रीपदाकरिता सुचवून पाहिले. पण ना. मोरारजी देसाई यांनी ते नाकारलं. कारण काय तर 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे ही तेव्हा जनतेची एकमुखी मागणी' होती. अर्थात त्याला ना. देसाई यांचा तीव्र विरोध होता. मुंबई ही महाराष्ट्राचीच नव्हे, तर भारताची आर्थिक राजधानी असल्याने मोरारजींना ती आपल्या ताब्यात हवी होती.

स. का. पाटील तेव्हा मुंबई काँग्रेसचे सर्वेसर्वा होते. त्यांनीही पक्षनिष्ठा म्हणून जाहीर केलं, आम्ही मुंबई सोडणार नाही. 'यावत् चंद्रदिवाकरौ' जणू काय सूर्यचंद्र हे त्यांच्या जन्माच्या वेळीच उगवले आणि त्यांच्या मरणाबरोबर मावळणार आहेत. पक्षनिष्ठा कशी काम करते पहा. ना. यशवंतराव चव्हाणही तेव्हा म्हणाले होते, 'मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे'. मी विचारतो, याचा एवढा आग्रह का?

तेव्हा आचार्य अत्र्यांचा 'मराठा' घरोघर पोहोचला होता. आपल्या 'मराठा'तून त्यांनी यशवंतरावांची खिल्ली उडविली. 'चव्हाणांच्या नावातच 'च' आहे तो वगळून पहा, काय बाकी उरतं ते?'

एक गोष्ट खरी. मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे याचा जो प्रचार आचार्य अत्र्यांनी केला त्याला तुलना नाही. शासकीय प्रतिनिधी म्हणून संयुक्त महाराष्ट्राचा मंगल कलश भले चव्हाणांनी आणला, तरी त्याची प्रतिष्ठापना झाली ती आचार्य अत्र्यांच्या वेदमंत्रांनीच!

पूर्वेतिहास मी एवढ्यासाठी सांगितला की, मामा जेव्हा काँग्रेसमध्ये दाखल झाले, तेव्हा मा. भाऊसाहेब हिरे यांनी त्यांचं नाव एखाद्या मंत्रीपदासाठी सुचवलं होतं तेव्हा मोरारजी देसाई यांनी ते नाकारलं. कारण काय तर, त्यांनी प्रांतात दारूबंदी केली असताना मामा दारूचे 'परमीट होल्डर' होते. याचा अर्थ इतर मंत्री मद्यपान करीत नव्हते असा नाही. ते रोज रात्री मद्यपान करीत, पण परमीट न काढता. म्हणजे, मामांनी कायद्याचं पालन केलं हा त्यांचा गुन्हा!

वास्तविक, मद्यपान ही आजकालची एक फॅशन झाली आहे. शाळा-कॉलेजांतील मुलं-मुलीही परमीट रूम्सना सर्रास भेटी देताना दिसतात. अतिमद्यपान हे शरीराला बाधक खरंच. पण ते कायद्यानं न थांबविता लोकांच्या मतपरिवर्तनानच थांबलं पाहिजे. त्याकरिता 'अल्काहोलीक ॲनॉनिमस'सारख्या संस्था अविरत कार्यरत आहेत. माझ्या मते दारू ही

पिणाऱ्या माणसापेक्षाही न पिणाऱ्यांनीच अधिक बदनाम केली आहे. याचा अर्थ मी मद्यपानाचं समर्थन करतो असा नाही. पण दारू ही माफक प्रमाणात घेतली तर प्रकृतीला हितकारक आहे, असं काही डॉक्टरांचं मत आहे. म्हणून तर ते परमीटची शिफारस करतात.

तसं पाहिल्यास अतिरेकी मद्यपानच का? जास्ती जेवणसुद्धा आरोग्याला बाधक आहे म्हणून तर म्हणतात पचेल तेवढंच खावं. तद्वत दारूसुद्धा झेपेल एवढीच घेतली पाहिजे. बाटलीबरोबर पिणाराही आडवा होणार नाही, एवढं पाहिलं पाहिजे.

दारूबंदी करून दारू थांबणार नाही. कारण दारूबंदी झाली की, माणसं हातभट्टीकडे वळतात आणि हातभट्टी तर दारूपेक्षा शरीराला घातक! म्हणून मद्यपान हे प्रमाणात पाहिजे. मी पाहायचा-मामा रोज मोजकंच मद्यपान करीत. एखाद-दुसरा पेग म्हणजे डोक्यावरून पाणी. काही वेळा मीही त्यांच्या सोबत बसायचो-तेव्हा पहायचा जेवणाआधी पाचक म्हणून! पण हे मोरारजींना सांगणार कोण? ते एकदम हेकेखोर. दारूबंदी म्हणजे दारूबंदी. याचा अर्थ मोरारजी काही पीत नव्हते असा नाही. ते पीत होते-पण रात्री नव्हे, सकाळी! त्या निरूपद्रवी द्रवाचं नाव आहे शिवांबू! शिवांबू म्हणजे सकाळची आपली पहिली लघवी! ती प्रकृतीला हितकारक आहे, असं ती पिणारे म्हणतात. पण अद्याप एकाही डॉक्टरने ती प्रिस्क्राईब केलेली नाही. इतकं साधं आणि स्वस्त-नव्हे मोफतच औषध असताना 'पदरचं द्या नी हालवून घ्या' म्हणत डॉक्टर लोक औषधाची बाटली का देतात?

परमीट होल्डर म्हणून मामांना मंत्रीपद मिळालं नाही हे एक परीनं ठीकच झालं. आमदार का, खासदार होऊनही त्यांनी पाहिलं, राजकारण हा आपला प्रांत नव्हे. तिथं तत्त्व निष्ठेपेक्षा पक्षनिष्ठा महत्त्वाची. समजा, पक्षनिष्ठा पाळली आणि एखादी खुर्ची मिळाली तरी मंत्रीपद मिळाल्यावर तो पहिलं काम काय करतो? तर निवडून येण्याकरिता जो अमाप खर्च झाला तो भरून काढतो आणि पुढील निवडणुकीकरिता होणारा तितकाच खर्च, त्याची बेगमी करतो. असं ऐकतो की मंत्रीपदाचं वाटपही जाहीर लिलावाप्रमाणं केलं जातं. म्हणजे कोणत्या खात्यात पैसा खाण्याची किती संधी आहे, त्या प्रमाणात मंत्रीपदाचा सौदा केला जातो. विशेष म्हणजे खुर्चीवर बसताच तो कसा भरून काढायचा याचा सल्लाही अनाहूतपणे दिला जातो. हे काम करतात मंत्रालयातले सचिव, मंत्र्यांपेक्षा ते जास्ती अनुभवी असल्याने त्यांचा हितोपदेश मंत्र्याला ऐकावा लागतो. म्हणजे मंत्र्याला आपण जनतेचा सेवक म्हणतो, पण खुर्चीवर बसताच तो स्वयंसेवक होतो आणि 'चॅरिटी बिगिन्स ॲट होम' या न्यायानं जनतेचा सेवक नकळत स्वयंसेवक बनतो. याला काही अपवाद असतील . पण अपवादच ते!

इतकं करूनही मंत्रीपदाची खुर्ची ही तात्पुरतीच असते. चार-पाच वर्षे झाली की, पुनश्च हरि ओम! बुडाखालची खुर्ची गेली की, मंत्र्याला मग संत्रीसुद्धा विचारीत नाही. उलट तो अभिमानानं सांगत सुटतो, 'अरे असे कैक मंत्री आले नि गेले. सारे टेंपरवारी. मी एकटाच पर्मनंट आहे'.

मामांना या गोष्टीच्या कल्पनेनेच उबग आली. त्यांना पटलं, वारांगणेसम नृपनीति म्हणतात ते खोटं नाही. वारांगणा निदान पोटासाठी देहविक्रय करते. आपण बुद्धिविक्रय करतो एवढाच फरक! याचा विचार करताना मामांच्या हेही ध्यानी आलं, आपण वकिली करतो म्हणजे तरी काय करतो? आपल्याकडे येणाऱ्या अशिलाची आपण न्यायालयात तरफदारी करतो. वकिलाकडे येणाऱ्याला अशील म्हणतात. आपलं शील गमावून जो वकिलाकडे येतो तो अशील! तो पैसे देईल त्या प्रमाणात त्याची तरफदारी करायची. ती करताना पवित्र गीतेवर हात ठेवून 'देवाशपथ खरं सांगेन, खोटं सांगणार नाही' म्हणून खोटं बोलायला सांगायचा. कोर्टासमोर येणाऱ्या विरुद्ध बाजूच्या साक्षी फोडायच्या, पुरावे नष्ट करायला सांगायचे आणि आपल्या बुद्धीच्या बळावर आपल्या अशिलाची केस जिंकून दाखवायची. त्याहीसंदर्भात मामा एकदा म्हणाले होते, त्यांच्या घरीच मी 'कोर्टाची पायरी' ही चित्रकथा लिहिली होती. त्यावेळचे त्यांचे उद्‌गार आहेत, 'वकील कितीही हुशार असो, तो फार तर खोट्याचं खरं करू शकेल, पण खऱ्याचं खोटं करणारा वकील अद्याप जन्मायचा आहे'.

मामांना हेही पटलं, राजकारण काय किंवा कोर्टातील वकिली काय, एक विक्रयच आहे. बाजारु वेश्या आपलं शरीर विकते. कारण विकण्यासारखं तिच्याजवळ दुसरं काही नसतं. म्हणून तिला पापी म्हणायचं. आपण तर बुद्धी विकतो. म्हणजे एक महापापच करतो नाही का? बस्स, ठरलं. यापुढं राजकारण बंद, वकिली बंद. आपल्या सोन्यासारख्या शिक्षण संस्था आहेत, त्यांच्यासाठीच जगायचं, त्यांच्यासाठीच मरायचं!

**१५. कृतघ्नते, तुझं नाव जे. पी. नाईक :**

घर फिरलं की घराचे वासेही फिरतात, अशा अर्थाची एक म्हण आहे. मला वाटतं, त्याचप्रमाणे वेळ फिरली की जवळची माणसंही फिरत असावीत. जवळची म्हणजे नात्यातली नव्हे, मैत्रीच्या मिषानं जवळ येणारी! अशी माणसं जवळ येताना बोलतात गोड-पाठीवर शाबासकीही देतात. पण शाबासकी देता देता पाठीत कधी खंजीर खुपसतील, याचा नेम नसतो. याचा प्रत्यय मामांना घ्यायचा होता. त्यांची जन्मकुंडली मला ठाऊक नाही, पण त्यांच्या जन्मराशीत एका पापग्रहाने प्रवेश केला असावा -तो आला जे. पी.

नाईक यांच्या रूपानं!

तो समय १९४२ चा असावा. जे. पी. नाईक तेव्हा कोल्हापूरच्या रिजन्सी कौन्सिलमध्ये शिक्षण सचिव म्हणून काम करीत होते. त्या रिजन्सी कौन्सिलने मामांना ताराराणी विद्यापीठ आणि मौनी विद्यापीठ या दोन शिक्षण संस्थांसाठी जागा मिळवून दिली. यात नाईकांनी काय विशेष केलं? पोस्टातला तिकीट विक्रेता गिऱ्हाईकांना हवी तेवढी तिकिटं, कार्ड, पाकिटं देतो. तो काय उपकार करतो काय? ही त्याची नोकरीच आहे. तद्वत नाईकांनी आपल्या नोकरीचं काम केलं, त्यात विशेष काय केलं? असं तर नाही केलं? रिजन्सी कौन्सिलनं नकार दिला असताना नाईकांनी तो बदलायला लावला? पण नाही.

मामांना वाटलं, जे. पी. नाईक आपल्या संकल्पित कार्याचे चाहते आहेत. त्यांना जे. पी. ओळखताच आले नाहीत. जे. पी. ना. बरोबर ओळखलं तेव्हाच्या छत्रपती शहाजी महाराजांनी. ते छत्रपती पदावर येताच त्यांनी पहिलं काम कोणतं केलं असेल, तर जे. पी. नाईकांना संस्थांनी नोकरीतून कमी केलं. शहाजीराजे समोरच्या माणसाला पाहताक्षणीच पारखत असत. शेक्सपिअर आपल्या 'ज्युलिअस सीझर' नाटकात सीझरच्या रूपानं म्हणतो, 'ब्रूटस्, माझ्यासभोवती नेहमी उंच आणि राजस माणसं ठेव'. यावरून शेक्सिपिअरचं मत व्यक्त होतं, बुटकी आणि खडमी माणसं घातक असतात. त्यापासून दूर राहणं चांगलं.

छत्रपतींनी 'चले जाव' म्हणताच, नाईक मोठ्या तोऱ्यात पुण्याला गेले. त्यांना वाटलं, आपल्या हुशारीनं आपण कुठंही चमकू. पण त्यांना दिसून आलं, पुण्या-मुंबईला त्यांच्यापेक्षा सवाई माणसं पैशापासरी आहेत. पुण्याला आपली डाळ शिजत नाही हे पाहून नाईक परत कोल्हापूरला आले आणि वासरात लंगडी गाय शहाणी म्हणून आपल्या अकलेचे दिवे पाजळू लागले. त्यांनी मामांना गाठलं आणि आपली एक इच्छा व्यक्त केली. पाटगावच्या मौनी महाराजांच्या समाधीचं दर्शन घेण्याची! प्रत्यक्षात नाईकांनी कधी देवासमोर धूप जाळला असेल, असं नाही. तो माणूस मौनी महाराजांच्या समाधीचं दर्शन मागतो, यात त्याचा काही डाव असला पाहिजे, हे मामांनी ओळखायला हवं होतं. पण म्हणतात ना, दुर्योधनाला सर्वत्र दुर्जन दिसले, तर धर्मराजाला सर्वत्र सज्जन दिसले. दुर्योधन धर्मराजाचं सोंग घेतो आहे, हे मामांनी ओळखायला हवं होतं. पण मामा पडले धर्मराज! त्यांनी नाईकांच्या मतलबी बोलण्यावर विश्वास ठेवला आणि त्यांना स्वतःच्या गाडीनं पाटगावला नेलं. नाईकांच्या सोबत ऐनवेळी नवगिरे नावाची कोणी बाई होती. पत्नी नसताना तिच्यासह देवदर्शन घेण्याचं प्रयोजन काय? कारण, मामांनीच पुढं काही दिवसांनी आपल्या

पन्हाळ्याच्या बंगल्यावर जे. पी. नाईकांचं लग्न लावून दिलं होतं. 'काही' का प्रयोजन असेना, म्हणून मामांनी त्या दोघांना आपल्या गाडीनं पाटगावला नेलं आणि त्यांना मठाच्या पुरोहिताकडून प्रसादाचा नारळ देवविला. एवढं पुण्यकर्म पदरी बांधून नाईक परत आले.

पुन्हा त्यांनी कोल्हापूर सोडताना नाटक केलंच. त्यांनी मामांच्याकडून काही दिवसांकरिता म्हणून एक हजार रुपये हातउसने मागितले. मामांनी ते गेले समजूनच दिले. कारण नाईकांकडून ते वसूल करायला एक वर्ष लागलं! जे. पी. नाईक मुंबईला गेले. तेथे त्यांनी 'इंडियन इन्स्टियूट ऑफ एज्युकेशन' नावाची एक संस्था सुरू केली, पण दारावर पाटी लावून संस्था तयार होत नाही. त्यासाठी तपस्या करावी लागते. ती करायची कुणी?

संस्था स्थापन करण्याची कुवत अंगात नाही. तेव्हा ती बळकावता तरी येते का, बघू या हे अजमावण्यासाठी नाईकांनी एक प्रयोग आरंभिला. ग्रामीण शिक्षणाच्या प्रयोगाला उपयुक्त आहे, असं म्हणून ते मामांना म्हणाले, 'आपल्या मौनी विद्यापीठात मला सहभागी करून घ्या. संस्थेत मला सत्ता नको. माणसं तुम्हीच नेमा, मला फक्त एक शैक्षणिक प्रयोग करण्याचं स्वातंत्र्य द्या'.

माणसं तुम्ही नेमा म्हणणारे नाईक येताना आपल्या 'इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन आणि कोरगावकर धर्मादाय संस्था' संगती घेऊनच मौनी विद्यापीठात समाविष्ट झाले. माझ्यावर विश्वास ठेवा म्हणत विश्वासघाताची योजना आखूनच आले. नाईकांना वाटलं, आपला अंतःस्थ हेतू कोणाला कळणार आहे?

मामांनी नाईकांच्या दोन्ही संस्थांनी मौनी विद्यापीठात सहभागी करून घ्यायला संमती दिली. तरी त्यांचे एक नातलग, मित्र आणि शिक्षकतज्ज्ञ प्राचार्य सी. रा. तावडे यांनी नाईकांचा कावा ओळखला. ते मामांच्या बंगल्यावर गेले तेव्हा तेथे आचार्य भागवत व जे. पी. नाईक हेही हजर होते. मामांनी त्यांना नाईकांची इच्छा ऐकवली. तेव्हा तावड्यांनी नाईकांच्या प्रस्तावाला सक्त विरोध केला. कारण, त्यांचा नाईकांच्यावर विश्वास नव्हता. 'मौनी विद्यापीठा'त नाईकांना एक पाय ठेवायला जागा देऊ नका, म्हणून बजावलं तरी म्हणतात ना, आधी जाते बुद्धी मग जाते भांडवल, असं मामांचं झालं.

मामांनी नाईकांना मौनी विद्यापीठात प्रवेश दिला. मात्र-पाठोपाठ त्यांच्या पत्नी सौ. चित्रा नाईक याही तिथं संचालक म्हणून दाखल झाल्या. कोणत्याही ब्राह्मणाला तुम्ही श्राद्धाकरिता बोलवा. येताना त्याला पाच ब्राह्मण संगती घेऊन यायला सांगा. तो सारी माणसं आपल्या घराचीच घेऊन येतो. पत्नीसह प्रवेश मिळताच नाईकांनी आपले खायचे दात बाहेर काढले आणि मौनी विद्यापीठ हळूहळू घशात घालायला सुरुवात केली. तेथे

त्यांना निरंकुश सत्ता हवी होती.

साहजिकच, मामांच्यात आणि नाईकांत वितुष्ट वाढू लागले. त्याचे पर्यवसान शेवटी नाईकांच्या गच्छंतीत झाले. नाईक वचनाला जागले असते, तर दोघांची मैत्री अतूट राहिली असती. मैत्रीचा एक आदर्श जगाला दिसला असता.

यासंदर्भात मला माधवराव बागलांची याद येते. प्रजा परिषदेच्या वेळी ते मामांचे विरोधक होते. तरी मामांनी जेव्हा त्यांना पटवून दिले की, छत्रपती हे प्रतिगामी होऊ शकत नाहीत, तेव्हा मामांचे आणि बागलांचे मतभेद मिटले आणि दोन विरोधक एकमेकांचे मित्र झाले. एवढे घनिष्ठ की बागलांनी आपला सारा चित्रसंग्रह ताराराणी विद्यापीठाला देऊन टाकला आणि ते देशभक्त म्हणून गर्जू लागले. मामांनाही त्यांचा चित्रसंग्रह ताराराणी विद्यापीठाच्या सभागृहात मांडून सभागृहाला माधवराव बागल आर्ट गॅलरी असं नाव देऊन बागलांची स्मृती चिरंतन केली आहे.

जे. पी. नाईकांच्या बाबतीतही असंच झालं असतं, पण बागलांत आणि नाईकांत मोठा फरक होता. बागल विरोधक असले तरी मतलबी नव्हते. उलट नाईक हे मैत्री जमताच मतलबी झाले आणि मला वाटतं, विद्वान माणसं मतलबी होतात तेव्हा ती तितकीच घातकी ठरतात.

मौनी विद्यापीठातून जे. पी. नाईक निघून गेले, तरी त्यांनी पेरलेली त्यांची खास माणसं विद्यापीठात मोक्याच्या जागी होती. त्यांनी विद्यापीठात एक दंगल माजवून, त्यात एका विद्यार्थ्याची हत्या घडताच मामांच्या विरोधकांनी एकच गदारोळ माजवला. परिणामी मामांच्या माणसांना संस्था सोडावी लागली. मामांचा माणूस म्हणून प्रा. अंबादास माडगूळकरसारख्या प्राध्यापकालाही मौनी विद्यापीठ सोडावं लागलं. हा सूड इतका खुनशी होता की, नाईकांच्या बगलबच्चांनी मौनी विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावरची पाटीही तोडून-मोडून टाकली. त्या पाटीवर संस्थेचं संस्थापक म्हणून मामांचं नाव होतं. 'मौनी विद्यापीठ विश्वनाथ नगर'. ही पाटी तोडणं म्हणजे बापाला बाप न म्हणण्यासारखा कृतघ्नपणा होता.

तरी सारे जग ओळखून आहे व्ही. टी. पाटील हेच मौनी विद्यापीठाचे जनक आहेत. नाईक जनक असते तर त्यांनी मौनी विद्यापीठ हे नाव न देता गार्गी विद्यापीठ किंवा संत रामदास विद्यापीठ हे नाव दिलं असतं. नाईकांचा जातीय दंभ हेच सांगतो की, ब्राह्मण विद्वान असो वा संत असो-त्याला जातीय दंभ कधी सुटत नाही. रामदास एवढे राष्ट्रीय संत-ही बिरूदावलीही त्यांना ब्राह्मण इतिहासकारांची दिली आहे म्हणा. त्यांची मुक्ताफळंच वाचा-

*गुरू तो सकलांशी ब्राह्मण ।*
*जरी तो झाला क्रियाहीन ।*
*तरी तयासीच शरण ।*
*अनन्यभावे असावे ।*
*ब्राह्मण ते वेद मूर्तिमंत ।*
*ब्राह्मणची ते भगवंत ।*
*पूर्ण होती मनोरथ ।*
*विप्र वाक्यें करूनी ॥*

अशा जातीयवादी संताला राष्ट्रसंत कसं म्हणता येईल? आणि हे म्हणे शिवाजी महाराजांचे गुरू! रामदास शिवरायांचे गुरू होते, तर त्यांच्या राज्याभिषेकाच्या वेळी तत्कालीन ब्राह्मणांनी जी खळखळ केली, त्यावेळी का हे गुरू मूग गिळून स्वस्थ बसले होते? त्यासाठी काशीच्या गागा भट्टांना बोलवावं लागलं.

माझ्या मते शिवरायांचे खरे गुरू दोनच-१) जन्मदाते शहाजीराजे आणि २) जन्मदात्री जिजामाता. शहाजीराजे विजापूरच्या आदिलशाहीत सरदार होते. ते त्या आदिलशासाठी लढत होते, तेव्हा देशभर यावनीसत्ता असली तरी त्यांच्यामध्ये लढाया होत होत्या. त्या लढणारे, जिंकणारे मराठेच होते. त्यांनी लढाया जिंकायच्या आणि आपल्या धन्यांना 'गणपती बसविल्याप्रमाणे' त्यांच्या गादीवर बसवायचं हा सर्रास प्रघात होता.

तो मोडण्यासाठी शहाजी राजांनी आपल्या बाळराजांना पुण्याला आपल्या आईकडे पाठवलं. तेव्हा जिजाबाईंनी बाळ शिवाला आपले रामायण व महाभारत हे ग्रंथ ऐकविले आणि प्रेरणा दिली. रोज घडणारी बाटवाबाटवी, बायकांची विटंबना थांबविण्यासाठी तुम्हालाच शस्त्र घेऊन उठलं पाहिजे. त्याप्रमाणे त्यांनी स्वराज्याची शपथ घेतली आणि तोरणा किल्ला जिंकून स्वराज्याचे तोरण बांधलं. हे कळताच आदिलशहाने शहाजींना जाब विचारला, 'आपल्या पोराला आवरा, नाहीतर परिणाम भोगावे लागतील'.

शहाजी राजांनी सांगून टाकले, 'पोरगा माझं ऐकत नाही' आपणच त्याचं हवं तसं पारिपत्य करा..माझी ना नाही'.

याचा अर्थ-गुरू घरचेच असावे लागतात-असतात. रामदासासारख्या संतांचाही जातीय दंभ पाहिला की, वाटतं त्यापेक्षा आपला संत तुकाराम हजार पटीने बरा. ते स्पष्टपणे सांगतात, 'बरा देवा, कुणबी झालो, नसता दंभे असतो मेलो'.

ब्राह्मणाला जवळ केल्याने मामांना मौनी विद्यापीठ सोडावं लागलं, तरी जगजाहीर आहे, व्ही. टी. पाटील हेच मौनी विद्यापीठाचे जनक आहेत. दारावरला बोर्ड बदलून जनकत्व नाकारता येत नाही. हे ओळखून नाईकांनी जर दगलबाजी केली नसती, तर माझी खात्री आहे मामांनी बागलांची ज्याप्रमाणे ताराराणी विद्यापीठात स्मृती जपली आहे, त्याप्रमाणे मामांनी जे.पीं.चीही स्मृती कृतज्ञपणे जपली असती. पण म्हणतात ना, दैव देतं, पण कर्म नेतं-तसं झालं. तरी हेही तितकंच खरं म्हणा. नात्यातल्या घरच्या माणसांचा सल्ला न मानता, मामांनी दारातला माणूस जवळ केला. त्याची अद्दल मामांना घडली, पण किती महागात?

मौनी विद्यापीठापाठोपाठ मामांना कोल्हापुरातूनही उठवून लावायची योजना जे. पी. नाईकांपाशी तयार होती. त्याकरिता 'तुका म्हणे ऐशा नरा, मोजून माराव्या पैजारा' या आदेशानं तावडेबाबा व ग. गो. जाधव यांचं सहकार्य त्यांना हवं होतं. पण जेव्हा त्यांनी 'तुका म्हणे ऐशा नरा मोजून माराव्या पैजारा' या आदेशानं पायातला जोडा हातात घेतला, तेव्हा जे. पी. नाईक गुमान बसले. शहाण्याला शब्दाचा मार म्हणतात. शिक्षणतज्ज्ञाचं सोंग घेऊन येणाऱ्या गारद्यांना पैजाराचीच भाषा समजते. हॅम्लेट नाटकात गोंधळलेला नायक म्हणतो, 'फ्रेल्टी, दाय नेम ईज वूमन!' त्याप्रमाणे म्हणावे लागतं, 'कृतघ्नते, तुझं नाव जे. पी. नाईक!'

## १६. आक्का-मामांचा संसार :

प्रेमोत्तर विवाह की विवाहोत्तर प्रेम - या विषयावरल्या चर्चा मी शाळा-कॉलेजात केल्या आहेत, ऐकल्या आहेत. आता मला त्या निरर्थक वाटतात. कारण मी अनेकदा पाहतो, प्रेमोत्तर विवाह करणाऱ्यांचं प्रेम विवाहानंतर टिकून राहतच नाही, आणि विवाहानंतरचं प्रेमही अनेकदा आपली उत्कटता गमावून बसतं. त्रेसष्टचं रुपांतर कधी छत्तीसात होतं, हेही कळत नाही.

मामांचं लग्न प्रेमोत्तर होतं की विवाहोत्तर होतं? मी निश्चित सांगू शकत नाही, तरी त्यांनी आपलं प्रेम कायम टिकवलं, हे निश्चित ! याचं प्रमुख कारण म्हणजे उभयतांनी मनोमन ओळखलं होतं, प्रेम करणं म्हणजे दुसऱ्यासाठी जगणं. नवरा-बायको स्वत:साठी न जगता एकमेकांसाठी जगू लागली, की ते प्रेम अखंड टिकतं. स्वत:साठी जगा - तुम्ही दु:खी व्हाल ; दुसऱ्यासाठी जगा, तुम्ही सुखी व्हाल, असं म्हणतात ते याच अर्थानं !

मला यावर बोलण्याचा अधिकार काय? असं कोणी म्हणेल. पण पहात आलो

आहे. आक्का मामांचं प्रियाराधन लग्नाआधी सुरु होतं. त्यांचा प्रेमोत्तर संसार शनवारात सुरू झाला, आणि तो शुक्रवारात भराला आला. शुक्रवारात रहात असताना मामा वकील म्हणून लोकमान्यता पावले. त्या बळावर त्यांनी म्युनिसिपालटीच्याच नव्हे, तर इलाखा पंचायतीपासून, आमदार-खासदारकी पर्यंतच्या निवडणुका जिंकल्या, त्यानंतरही त्यांनी ताराराणी विद्यापीठ आणि मौनी विद्यापीठाचे संसार उभे केले, यशस्वी करुन दाखवले.

प्रत्येक यशस्वी पुरूषाच्यामागे एक स्त्री उभी असते, असं म्हणतात. मामांच्या यशामागे आक्का सतत कर्तव्य बुद्धीनं उभ्या राहिल्या. तशा त्या अशिक्षित होत्या, म्हणूनच असेल - शिक्षण महर्षी पतीच्या पाठी निष्ठेनं उभ्या राहिल्या. या यशामागचे गमक एकच- मामांचा हरेक शब्द त्यांनी झेलला. वास्तविक, दोघांच्या शिक्षणात दोन ध्रुवांचं अंतर! तरी हे दोन ध्रुव दूर राहूनही एकमेकांस तेजाची साद देत राहिले.

कुणी म्हणेल, मामांनी बंगला बांधला, त्यानंतर मामा आणि मी अलग झालो. मग त्यांच्या संसाराबद्दल बोलण्याचा मला अधिकार काय? तो अधिकार मी मिळवला तो असा-मी सिनेमात प्रवेश करताच मा. विनायकांच्यासह पुणे-मुंबई फिरलो. अखेर मुंबईला स्थिरावलो. कारण मला कळून चुकलं की सिनेमात रहायचं तर मुंबईशिवाय पर्याय नाही. कोल्हापूरात राहून सिनेमाला लागणारा फायनान्स मिळवणं महाकर्म कठीण! कोल्हापूर ही सिनेमाची गंगोत्री असली तरी मुंबई हीच सिनेमाची बाजारपेठ आहे. त्याकरताच मी मुंबईकर झालो.

तरी चित्रपटांच्या चित्रणाकरता मी कोल्हापूरला येत असे. त्यावेळी माझा मुक्काम ''लॉजिंग बोर्डींग फ्री'' म्हणून मामांच्या बंगल्यावरच असे. शारदा, राम राम पाव्हणं, पाटलाचा पोर ही तीन चित्र मी मामांच्या ''सरोज'' बंगल्यावर राहूनच केली. ''सरोज'' हे बंगल्याचं नावच आक्का-मामांच्या प्रेमाची ग्वाही देणारं आहे, अनेकांना बायकोला एवढं प्राधान्य देणे आवडत नाही ते मग ''जीवन साफल्य'' किंवा आई-वडिलांची जोडनावही देतात. मामांनी आक्कांचं नाव बंगल्याला दिलं, कारण मामा आक्कांच्यासाठी जगत होते. तद्वत, आक्का मामांच्यासाठी जगत होत्या. त्यामुळे दोघे एकमेकांना पूरक झाले.

याचा प्रत्यय मी त्यांच्या बंगल्यावर रहात असताना घेतला. मी पहात होतो, पतिपत्नी असतानाही कधी उभयतांमध्ये कसली धुसफुस झाली नाही, कधी तोंड जोरानं वाजली नाहीत. दोघे एकत्र रहात, एकत्र जेवत. मी रहायला होतो तेव्हा मीही त्यांच्याबरोबर सकाळचा चहा, नाष्टा, रात्रीचं जेवणही घ्यायचा, दुपारचं माझे जेवण कंपनीत व्हायचं. तेव्हा मला पटलं, एकत्र खाणंपिणं हेच गृहशांतीचं पहिलं लक्षण आहे. ही गृहशांती एकमेकांनी

एकमेकांकरता जगल्याशिवाय लाभत नाही.

गृहशांती असली तरी त्यांच्या संसारात एकच उणीव होती. त्यांना मूलबाळ कधी झालं नाही. मोठ्या माणसांना तो शापच आहे की काय कोण जाणे! महाराष्ट्राचे तेव्हाचे मुख्यमंत्री ना. यशवंतराव चव्हाण हेही निपुत्रिकच होते. मी पहायचा, सार्वजनिक ठिकाणी सौ. वेणूताई यांच्याशिवाय ते कधी दिसले नाहीत. त्याचप्रमाणे महाराष्ट्राचे लाडके व्यक्तिमत्व पु.ल. देशपांडे हेही निपुत्रिकच होते. त्यांची धर्मपत्नी सौ. सुनीता त्यांची हरेक बाबतीत मार्गदर्शक होती. तरी मुलाची उणीव त्यांना कधी जाणवली नाही.

त्यावेळी अनेकांनी मामांना सल्ला दिला, "तुम्ही दुसरं लग्न का करीत नाही?" पण मामांना ती कल्पनाच अभद्र वाटायची. ते ही सूचना या कानानं ऐकून त्या कानानं सोडून देत. त्याचप्रमाणे अनेकांनी आक्कांना विचारणा केली, " तुम्ही एखादा दत्तक का घेत नाही?" त्यांना उत्तर देत, 'दत्तक घेऊन कोण सुखी झाला आहे?' त्यांनी पाहिलं होतं, आमच्याच एक जामदार मामी होत्या. त्यांनी एक दत्तकही घेतला होता. पण दत्तक आईचे उद्‌गार ऐकून त्या एकदा म्हणाल्या होत्या "मी दत्तक घेतला म्हणून दोन वेळा जेवतोस, नाहीतर भीक मागत फिरला असतास."

त्याबरोबर तो दत्तक मुलगा समोरचं ताट भिरकावून जो घराबाहेर पडला, तो कधीच परत आला नाही. शिवाय दुसरी गोष्ट अशी - आक्का त्यांना ऐकवत, "मी दत्तक घेतला तर मला एकाच मुलाचा लाभ होईल. त्यापेक्षा माझ्या नवऱ्यानं ज्या ताराराणीच्या अनेक मुली मला दिल्यात, त्या कोणाच्या आहेत?" आक्का मामांच्या ध्येय धोरणांशी किती एकरुप झाल्या होत्या, याचीच ही साक्ष नाही का?

तरी वाढत्या वयाबरोबर माणसाच्या शरीरात काही व्याधी निर्माण होतात. अशा वेळी राजारामपुरीतले डॉ. जमेनीस हे धावून येत आणि औषधोपचार करुन उभयतांना बरे करीत. अनेकदा त्यांना हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हावं लागे. त्याकरता ते पुण्यालाही जात. तरी घटप्रभेच्या कनार्टक सॅनिटोरियमचे डॉक्टर माधवराव वैद्य यांचेवर उभयतांचा विश्वास होता. आक्का काय, किंवा मामा काय, दुखण्याचे वेळी वैद्यांकडे धाव घेत, आणि तेथे उपचार घेऊन बरे होताच करवीरी परत येत. एक तर मला वाटतं, घटप्रभेची हवा कोरडी असल्याने प्रकृतीला साधक होती. शिवाय, डॉक्टरवरील श्रद्‌धा होतीच. या श्रद्‌धेपोटीच डॉक्टर रोग्याला देवदूत वाटतो.

बरी आठवण झाली. आक्कांची दत्तावर अपार श्रद्‌धा होती. दर गुरूवारी त्या नरसोबाच्या वाडीला जाऊन दत्ताचं दर्शन घेत. दत्ताची षोडशोपचारे पूजा करुन, दत्ताचा

प्रसाद घेऊन येत. तरी म्हणतात ना, माणसाला देहधर्म टाळता येत नाहीत. आक्कांना तसे अनेक विकार होते. ब्लडप्रेशर, डायबेटीस, त्यांची वाढ झाली म्हणून एकदा आक्का आजारी पडल्या असताना घटप्रभेत वैद्यांच्या दवाखान्यात दाखल झाल्या. त्यापैकी मी त्यांना एक-दोनदा भेटूनही आलो. तेव्हा वाटलं, त्याही पाठोपाठ बऱ्या होऊन येतील.

या नेहमीच्या रीवाजाप्रमाणे मी कामाला लागलो. मला तो दिवस नक्की आठवतो. त्या दिवशी माझ्या नव्या चित्राचा ''कोर्टाच्या पायरी''चा जयप्रभा स्टुडिओत मुहूर्त होता. क्षात्रजगद्गुरुंच्या शुभहस्ते मी त्या चित्राचा मुहूर्त केला. कोर्टाच्या पायरीचा विषय माझ्या घरचाच होता. घरच्याच एका दत्तकाच्या खटल्यात माझ्या वडिलांना - आण्णांना - आपलं अर्ध आयुष्य घालवावं लागलं होतं. त्यात मी दाखवलं होतं - जो खटला हरतो तो ठार मरतो आणि जो जिंकतो तोही अर्धमेला होता. माझी सारी चित्रं यशस्वी झाली याचं कारण हेच होतं. माझं हरेक चित्र प्रत्यक्ष घडलेल्या घटनेवर आधारित होतं. त्याच श्रद्धेनं मी कोर्टाच्या पायरीचा मुहूर्त साजरा केला न केला तोच स्टुडिओचा नोकर धावत माझ्याकडे आला आणि म्हणाला, ''पाटील, तुमचा फोन आहे.''

मी ऑफिस जवळच्या खोलीत जाऊन फोन घेतला. फोनवर जगद्गुरूंचे धाकटे चिरंजीव विजय बेनाडीकर बोलत होते. ''दादा अत्यंत वाईट बातमी आहे.''

''काय झालं?''

''आक्का गेल्या!''

मला विलक्षण धक्का बसला. तरी माझ्यापेक्षा मोठा धक्का निर्माते एस. आर. पाटील यांना बसला. कारण त्यांना आठ दिवसाचं शूटींग दाखवल्या नंतरच पुढील फायनान्स मिळणार होता. मी त्यांना म्हणालो, ''घाबरू नका. मी आक्कांचं नुसतं दर्शन घेतो आणि येतो.''

मी त्यांच्या गाडीनंच ''सरोज'' बंगल्यावर गेलो. दारात माणसं जमली होती. शवयात्रेची तयारी चालू होती. मी त्यातून वाट काढत माडीवरील हॉलमध्ये गेलो. पाहिलं तर आक्कांचा पार्थिव देह तक्क्याला टेकवून ठेवला होता. वाटत होतं, डोळे मिटून त्या देवासमोर ध्यानस्थ बसल्या आहेत. मी आक्कांच्या मायांवर मस्तक ठेवून वंदन केलं. तेव्हा मामा सद्गदित होऊन एवढंच म्हणाले, ''दिनकर, तुझी बहीण नाही - माझी आई गेली.''

मला एकदम आठवलं. आचार्य अत्र्यांनी आपल्या ''लग्नाची बेडी'' या नाटकात

एक चमकदार वाक्य लिहिलं आहे, "स्त्री ही क्षणाची पत्नी आणि अनंत काळची माता आहे." आचार्य अत्र्यांनी एक चिरंतन सत्य केवढ्या सोप्या शब्दांत सांगितलं आहे. आपण लग्न करतो, परक्या घरची एक मुलगी पत्नी म्हणून घरी येते. आल्यावर ती किती काळ पत्नी असते? समागमाच्या एका क्षणापुरतीच! त्यानंतरचं अवघं जीवन ती माता म्हणूनच जगत नाही का? समागमाच्या क्षणीही ती आत्मसमर्पणच करीत असते. म्हणूनच असेल, एक तपस्वी सांगतात, "संभोग ही एक समाधि आहे, जी फक्त स्त्रीच घेऊ शकते." म्हणूनच असेल, परमेश्वरानं मातृत्वाची जबाबदारी स्त्रीवर सोपवली आहे. म्हणूनच म्हणतात, "बालपणी आई जाऊ नये, तरुणपणी नवरा जाऊ नये आणि वृध्दापकाळी मुलगा जाऊ नये." वृध्दापकाळ हे सुद्धा एक बालपणच नाही का? आक्का गेल्याने मामा एकदम पोरके झाले. एकाकी पडले. संसार रथाचं एक चाक निखळून पडलं होतं, तरी मामा निःशंक होते. त्यांनी उभारलेल्या संस्था चालवायला, त्यांनी निवडलेली माणसं समर्थ होती.

तेव्हा पासून मी पहात आलो आहे. रोज मामा सकाळी शेजारच्या श्रीमान शेट लोहिया यांच्या घरी जात. तेथे गुजगोष्टी करुन ताराराणीत येत आल्या आल्या प्रवेशद्वारा समोरच्या मंदिरात शिवदर्शन घेत. ऑफिसात ते कधीच बसले नाहीत. मागच्या बाजूला एक प्रशस्त पार आहे. त्या पारासमोर खुर्ची टाकून बसलेले असत. अनेकदा मी त्यांना तिथंच भेटत असे. एकदा ते मला म्हणाले होते, "आपण म्हणतो, दीर्घायुष्य लाभावं." पण मला वाटतं, दीर्घायुष्य हा सुद्धा एक शाप आहे. आयुष्याचा जोडीदार गेल्यावर तर तो शाप खराच वाटू लागतो. गडकरी म्हणतात तेच खरं. जगण्यासारखं जवळ आहे, तोपर्यंतच मरणात मौज.

मामांची जणू जगण्याची उमेदच नाहीशी झाली. त्यामुळे शरीरधर्मानुसार तेही आजारी पडू लागले. ज्यानं आयुष्यभर ध्येय धोरणासाठी सतत धावपळ केली, त्याच्यावर अंथरुणावर पडायची पाळी आली.

म्हणतात वृद्धत्व हे दुसरं बालपण. कारण बालपणी आपण परावलंबी असतो. तेच परावलंबित्व म्हातारपणी वाट्याला येतं. अशा वेळी पत्नी जिवंत असती तर तिने मनोभावे आपली सेवा केली असती. पण तीच आधी गेल्यावर?

त्यावेळी मी साईक्स एक्सटेंशनच्या "शकुंतला" अपार्टमेंटमध्ये रहात होतो. रोज संध्याकाळी मामांना भेटून घरी यायचा. राजर्षी शाहू या अनुबोधपटाचं चित्रण चालू होतं. काम नसलं की मी उशीरा उठतो. मात्र त्या दिवशी सकाळी सकाळीच फोन वाजला. माझा

मुलगा प्रकाश त्यानं तो घेतला. फोनवरली बातमी ऐकून त्याला धक्काच बसला. त्यानं मला सांगितलं, "काका उठा, मामा गेले."

मामा गेलें? मी उठून धावतच सरोजवर गेलो. पाहिलं तर दारात माणसं जमली होती आणि खाली सोप्यात एका कॉटवर मामांचा पार्थिव देह लोकांच्या दर्शनाकरता ठेवला होता. प्रथम तो ताराराणी विद्यापीठात आला. त्याबरोबर मुलींनी एकच आकांत केला. दु:खावेग आवरुन नंतर त्यांनी पुकार केला, "काकाजी अमर रहे."

शवयात्रा तेथून बाहेर पडून पापाची तिकटी मार्गे स्मशानभूमीवर आली. मी तिथं आधीच पोचलो होतो. चिता रचून ठेवली होती. त्यावर मामांचा पार्थिव देह ठेवला गेला. भडाग्नी दिला गेला. आम्ही एकाकी परतलो. तिसऱ्या दिवशी राख पंचगंगेत विसर्जित केली गेली. तरी मामांच्या इच्छेप्रमाणे त्यांच्या अस्थी त्यांच्या जन्मगावी शिगांवला नेण्यात आल्या. हिंदु मनाच्या श्रद्धेप्रमाणे मामांच्या अस्थी गंगेत विसर्जन करणे शक्य होतं. तरी त्यांच्या इच्छेनुसार त्यांच्या अस्थी वारणेत विसर्जित करण्यात आल्या. वारणेला गंगेचं माहात्म्य प्राप्त झालं. वारणा गंगा बनून वाहू लागली.

माझी श्रद्धा आहे. आक्कांच्या अस्थी पंचगंगेत विसर्जित झाल्या, तरी "आकाशात् पतितं तोयं, सागरं प्रति गच्छति" या न्यायानं त्या सागराला पोचल्या असणार. मामांच्या अस्थीही त्यांच्या ओढीनं सागराला पोचणार आणि आक्कांच्या नि मामांच्या अस्थी - माझी श्रद्धा आहे, कधी तरी कोठे तरी - एकमेकांस भेटणार!

मामा वारणा काठी जन्मले, वारणेच्या पाण्यात डुंबले. त्याचं जीवन पंचगंगेच्या काठी शतधारांनी संपन्न झालं आणि अखेरी वारणेच्या पाण्यातच विसर्जित झालं! एक संपन्न जीवनचक्र पूर्ण झालं. त्याची कक्षा एवढी मोठी आहे की, कमलापती विश्वनाथ हे नाव सार्थ वाटतं!

◆◆◆